12-07-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

DGS/ 12:00

07-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A 1

DGS/ SBT/ MHM/ 12:00

<u>सभापतीस्थानी मा. सभापती</u>

पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या कामकाजाचे दूरचित्रवाणीवरुन प्रक्षेपण करण्यासंबंधीची घोषणा.

सभापती : सभागृहातील सर्व माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी घोषणा करीत आहे. आज दिनांक 7.12.2005 रोजी सभागृहाच्या केवळ प्रश्नोत्तराच्या तासाचे प्रायोगिक तत्वावर प्रक्षेपण करण्यास "सहारा समय मुंबई" ला अनुमती देण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्नोत्तरे

पृ.शी. मु.शी : तोंडी उत्तरे

मुंबईतील राहत्या इमारतींच्या जागांवर घालण्यात आलेले आरक्षण

(१) * ९२६७ श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत , श्री. अनंत तरे : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ७० ते ८० वर्षापूर्वीच्या जुन्या उपकरप्राप्त सुमारे ११४ इमारतींच्या जागी क्रिडांगणे, उद्याने, शाळा व रुग्णालये यांची आरक्षणे शासनाने दाखविली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्तित्वात असलेल्या इमारतींच्या जागांवर शासनाने आरक्षणे टाकण्याची काय कारणे आहेत,

(३) असल्यास, सदर ११४ इमारतींच्या जागेवर आरक्षण टाकल्याने त्यांची दुरुस्ती करण्यास म्हाडा तयार नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईच्या १९९१ च्या विकास आराखडयात बदल करुन या इमारतींच्या जागेवर आरक्षणे दाखविण्यात आली आहेत हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर आरक्षणांची शासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री. दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे. सुमारे ६९ जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या जागी, क्रिडांगणे, उद्याने, शाळा व रुग्णालये यांची आरक्षणे दाखविली आहेत.

(२) विकास योजना तयार करताना, विद्यमान सार्वजनिक सुविधा आणि नियोजन प्रमाणकानुसार आवश्यक असलेल्या सार्वजनिक सुविधा यांचा विचार करुन, आरक्षणे प्रस्तावित केली जातात.

(३) हे खरे नाही, शासनाच्या मानकाप्रमाणे उपलब्ध निधीमधून आवश्यक असल्यास, उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

* ९२६७...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, तिसरा प्रश्न असा विचारला आहे की, असल्यास, सदर 114 इमारतींच्या जागेवर आरक्षण टाकल्याने त्यांची दुरुस्ती करण्यास म्हाडा तयार नाही हे ही खरे आहे काय? याला उत्तर देतांना असे म्हटले आहे की, अंशत: खरे आहे. सुमारे 69 जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या जागी, क्रिडांगणे, उद्याने, शाळा व रुग्णालये यांची आरक्षणे दाखविली आहेत. ही आरक्षणे दाखविण्याची कारणे काय? या 69 इमारतींमध्ये एकूण किती भाडेकरु आहेत. आणि तिसरा प्रश्न असा की, कधी ना कधी तरी डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये जे आरक्षण ठेवले आहे ते आरक्षित करण्यासाठी या इमारती मोकळया कराव्या लागतील . त्यासाठी या 69 इमारतीतील भाडेकरुंना पुर्नरचित इमारतीत नेण्यासाठी कोणत्या जागा देणार आहात?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, 1991 साली प्लॅनिंग कमिटीच्या वतीने मुंबईचा आराखडा राज्य सरकारकडे पाठविण्यात आला. साधारणपणे अशाप्रकारे आराखडा राज्य सरकारकडे पाठविण्यात आल्यानंतर राज्य सरकार तो डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर करते. त्या प्लॅनमध्ये किती लोकसंख्येला किती मोकळी जागा असली पाहिजे अशाप्रकारचे एक कोष्टक या प्लॅनिंग कमिटीच्या वतीने दिलेले असते. त्या कोष्टकाप्रमाणे वेगवेगळया ठिकाणी आारक्षण दाखविली जातात. ही गोष्ट खरी आहे की, या मोडकळीस आलेल्या इमारतीपैकी अनेक इमारती या आरक्षणामध्ये दाखविल्या आहेत. त्यामुळे म्हाडाच्या वतीने रिडेव्हलपमेंटचे काम करणे त्यांना शक्य झालेले नाही. म्हणून त्या संदर्भात प्लॅनिंग कमिटीला गाईडलाईन्स द्यावयास पाहिजेत. परंतु एक मोकळी जागा असतांना व तिचे प्लॅनिंग करीत असतांना त्या मोकळया जागेवर शाळा, इमारती केल्या पाहिजेत ही बाब त्यामध्ये शक्य आहे. परंतु त्याठिकाणी पूर्वी ज्या इमारती झालेल्या आहेत अशाठिकाणी अशाप्रकारचे आरक्षण टाकलेतर डेव्हलपमेंटला मोठी अडचण निर्माण होते ही वस्तुस्थिती मी नाकारीत नाही. म्हणून निश्चितपणे ज्या इमारती आपल्याला विकसित करता येऊ शकतात, त्या सर्व इमारतींचे प्रस्ताव म्हाडाने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना त्यांना दिल्या आहेत. त्याप्रमाणे त्यावरील आरक्षण उठविण्याची प्रक्रिया राज्य सरकार निश्चितपणे करील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, या 69 इमारतींमध्ये किती रहिवाशी आहेत, त्यांची लोकसंख्या किती आहे, त्या चाळी किती वर्षाच्या जुन्या आहेत. या चाळी इतकी वर्षे जुन्या झाल्या त्या काळात या डेव्हलपमेंटच्या योजना किती वेळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आखल्या गेल्या? ही योजना 1991 सालची असेल तर महाराष्ट्र सरकारने या इमारतींना संरक्षण द्यावे, तेथील भाडेकरुंना संरक्षण द्यावे. त्यांचे स्थलांतर दूरवर करु नये व त्यांचे जीवन उध्वस्त करु नये. यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, साधारणपणे या एकूण इमारतींमध्ये 1006 असे जुने भाडेकरु आहेत व ते अजून संक्रमण शिबिरामध्ये आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क.9267 . . . .

श्री.विलासराव देशमुख . . . .

म्हणून मी आपल्याला सांगितले की, त्यांना पूर्णपणे संरक्षण रहाणारच आहे. कारण त्यांना जेव्हा त्यांच्या घरातून बाहेर काढले, तेव्हा नियमाप्रमाणे आपण त्यांना जेवढे घर देतो, तेवढे त्यांना मिळाले पाहिजे. यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. म्हणून जेवढया प्लॉटमध्ये अशा प्रकारच्या रिझर्वेशनमुळे विकास होऊ शकत नाही, तेथील विकास थांबलेला आहे. त्याचे रिझर्वेशन आम्ही नक्की उठवू. परंतु काही प्लॉट छोटे आहेत आणि नवीन डेव्हल्पमेंट प्रमाणे 6-6 मीटरची जागा कॉर्पोरेशनला सोडावी लागते. त्यात ती इमारत बसत नाही किंवा अर्धा प्लॉट रोड वाईडींगमध्ये गेला असेल तर तेथेही आपल्याला काही करता येत नाही. असे जे प्लॉट आहेत जे आपल्याला अनेक कारणांमुळे री-डेव्हल्प करताच येऊ शकत नाहीत अशा ठिकाणच्या भाडेकरुंसाठी पर्यायी व्यवस्था करुन त्यांचे लवकरात लवकर पुनर्वसन केले जाईल. शक्यतो त्यांना त्याच क्षेत्रात सामावण्याचा प्रयत्न करु. पण सगळयांना त्याच क्षेत्रात सामावता येईल त्याबद्दल नक्की सांगता येणार नाही. शेवटी आमचा प्रयत्न असा आहे की, जर त्या क्षेत्रामध्ये जागा उपलब्ध असेल तर अवश्य त्या लोकांना तेथे सामावण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करु. पण यामध्ये काही अडचणी आल्या तर आम्हाला त्यांची इतर ठिकाणी व्यवस्था करावी लागेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील दोन वर्षामध्ये 69 इमारतींपैकी किती इमारतींची म्हाडाने दुरुस्ती केलेली आहे ? आपण दुरुस्तीचे काम मान्य केले आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, या इमारती रि-डेव्हल्पमेंट करता येत नाहीत यातूनच मूळ प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण त्याठिकाणी रिझर्वेशन आहे. मोडकळीस आलेल्या इमारतीतील भाडेकरुंना सुरक्षित स्थळी हलविणे, त्यांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये हलविण्याचे काम आपण नक्कीच हातात घेतलेले आहे. परंतु प्रामुख्याने या इमारतींचे रि-डेव्हल्पमेंट होऊ शकत नाही कारण तेथे रिझर्वेशन दाखविलेले आहे आणि ते का दाखविले हाच प्रश्न उपस्थित झालेला आहे. मी मघाशी सांगितले की,टोटल टाऊन प्लॅनिंग करत असताना आणि विकास आराखडा मंजूर करीत असताना अमुक इतकी जागा सोडली पाहिजे. केवळ म्हाडाच्याच जागेवर नव्हेतर इतर इमारतींच्या जागेवर अशा प्रकारचे रिझर्वेशन दाखविलेले आहे. जेव्हा नवीन डेव्हल्पमेंट प्लॅन तयार होईल तेव्हा आम्ही प्लॅनिंग कमिटीला सुधारित सूचना देणार आहोत. अशा

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क.9267 . . . .

श्री.विलासराव देशमुख . . . .

पध्दतीने जेथे पूर्वीची इमारत आहे आणि तेथे जर रिझर्वेशन दाखविले तर केवळ तांत्रिकदृष्टया आम्ही इतकी मोकळी जागा सोडली आहे असे कागदावरुन समाधान होईल. पण प्रत्यक्षात ती मोकळी जागा मिळणारच नाहीत. म्हणून याबाबतीत तांत्रिकदृष्टया असा प्लॅन करुन चालणार नाही. म्हणून आम्ही त्यांना काही सुधारित सूचना देऊ आणि त्यादृष्टीने आम्ही याचा विचार करु.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मूळ प्रश्न असा आहे की, विकास आराखडयाचे प्रारुप तयार होत असताना ज्याठिकाणी मोकळी जागा आहे, तेथे रिझर्वेशन टाकले जाते. परंतु 70-80 वर्षापूर्वीच्या इमारतींच्या जागेवर रिझर्वेशन ठेवण्याचे प्रयोजन काय आहे ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, एखाद्या शहराची वाढ होत असताना, तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात काही मोकळया जागा असल्या पाहिजेत. विशेषत: मुंबईसाठी वेगळा नियम आहे. पण आपण ग्रामीण भागामध्ये गेलो तर अधिक जागा . . . .

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जेव्हा या इमारती बांधल्या, तेव्हा तशा प्रकारचा विचार केला नव्हता का ? त्यावेळी मोकळी जागा सोडली नव्हती का?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, जेथे पूर्वीच्या इमारती आहेत, त्या इमारतींच्या जागेवर रिझर्वेशन ठेऊन आमचा प्रश्न सुटत नाही. म्हणून जेथे सुधारीत इमारती झालेल्या आहेत, त्या भागाचा डेव्हल्पमेंट प्लॅन करणे म्हणजे आपण जसे सिडको निर्माण केले आहे. तेथे सगळी जागा रिकामी होती, त्यानुसार प्लॅनिंग करणे, अशा प्रकारे आपण या दोन्ही भागांना एकच नियम लावलेले आहेत. परंतु या दोन्ही भागांसाठी भिन्न नियम असण्याची गरज आहे. याबाबतीत आम्ही आमच्या नियोजन विभागामार्फत आणि नगरविकास विभागामार्फत टाऊन प्लॅनरकडून त्याचा अभ्यास करुन आम्ही संबंधितांना सुधारित सूचना देऊ.

. . . .बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(2) * 11977 **श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ : तारांकित प्रश्न क्रमांक 7866 ला दिनांक 13 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील वाढत्या बेसुमार लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याबाबत सर्व संबंधित विभाग व प्राधिकरणाकडून पाठविण्यात आलेले अहवाल विचारार्थ् ठेवण्याकरिता सर्वसंबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याची करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, सदर बैठकीमध्ये कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1) नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) या प्रकरणी बैठक लवकरात लवकर घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, मुंबईमधील लोकसंख्या वाढत आहे. अशा वेळी याला आळा घालण्यासाठी शासनाने सर्व संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याचे ठरविले होते. पण त्याप्रमाणे लोकप्रतिनिधींची बैठक घेतलेली नाही. मुंबईतील लोकसंख्येला आळा बसण्यासाठी आपण लोकप्रतिनिधींची बैठक घेणार आहात का ? ही बैठक केव्हा घेण्यात येणार आहे ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 2001 मध्ये मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईच्या सर्व पक्षीय आमदार, खासदार, मंत्रिमंळातील अनेक सदस्यांची बैठक झालेली होती. त्यावेळस अनेक मते व्यक्त केलेली होती. उपस्थित झालेल्या मुद्यांच्या संदर्भात पाच-सहा विभागाकडून अभिप्राय मागविलेले होते. काही विभागांकडून अभिप्राय आलेले आहेत. काही विभागांकडून येत आहेत. माझी आणि माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झालेली आहे. एक महिन्याच्या आत या संदर्भात बैठक घेण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : मुंबईच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या संदर्भातील विषय आहे. यामध्ये दोन गोष्टी आहेत.एक म्हणजे परप्रांतियांचा लोंढा रोखणे आणि समान नागरी कायदा आणून सर्वांसाठी कुटुंब नियोजन करणे. या दोन्ही गोष्टी सरकार करत नाही. माझा प्रश्न असा आहे की, लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी 1995 पूर्वीच्या झोपड्यांना आपण अधिकृत केले. त्यानंतरच्या झोपड्यांना आजही अधिकृत केलेले नसतांना व तसा कायदा केलेला नसतांना अनधिकृत झोपड्या पाडण्याचे काम थांबविलेले आहे. आता नव्याने झोपड्या बांधण्याचे काम दैनंदिन सुरु आहे. त्या संदर्भात ताबडतोबीने कोणती कारवाई करणार आहात ? हेच लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याचे मूळ कारण आहे.

श्री.राजेश टोपे : मूळ प्रश्न हा मुंबईतील लोकसंख्येवर नियंत्रणाच्या संबंधिचा आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी अनधिकृत झोपड्यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. निश्चितपणे 1995 च्या अगोदरच्या झोपड्यांना आपण संरक्षण दिलेले आहे. त्यानंतर सन 2000 पर्यन्तच्या झोपड्यांना संरक्षण द्यायचे की नाही, या संदर्भातील प्रकरण कोर्टामध्ये प्रलंबित आहे. शासनाने कोर्टामध्ये आपले म्हणणे मांडलेले आहे. या संदर्भाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी आहे....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अधिकृत झोपड्यांच्या संबंधाने कायदा या विधिमंडळामध्ये केलेला आहे. त्या कायद्यानुसार 1995 पूर्वीच्या सर्व झोपड्या अधिकृत केलेल्या आहेत. त्यानंतरचे सर्व बांधकाम तोडण्याचे ठरले. आता मंत्रीमहोदय जाणीवपूर्वक 2000 सालच्या अनधिकृत झोपड्यांच्या संदर्भातील मुद्दा काढत आहेत. त्याला कोणत्याही प्रकारचा पुरावा नाही. एम.एम.आर.डी.ए जागेचे सर्व्हेक्षण करतांना त्यांच्या जागेवर झोपड्या असतील तर त्या रेग्युलराईज करण्याच्या संबंधातील जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. एम.एम.आर.डी.ए ने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11977 (पुढे चालू...
श्री. अरविंद सावंत (पुढे सुरु.....

मुंबईमध्ये प्रकल्पाचे जोरात काम सुरु केलेले आहे त्या प्रकल्पाचे काम करत असतांना, सर्व्हेक्षण करत असते. त्या संदर्भात त्यांची सर्व्हेक्षण करणारी समिती आहे. ती समिती जेव्हा सर्व्हेक्षणासाठी जाते, तेव्हा त्या ठिकाणी झोपड्या किंवा बांधकामे काहीही दिसले तरी....त्या झोपड्या जरी 1995 नंतरच्या असल्या तरी त्यांना अधिकृत करत आहे. या संदर्भाने लोकसंख्या वाढीच्या संदर्भातील बैठक घेऊन चालणार नाही तर त्यावर कृती सरकार करत नाही ती कृती केव्हा करणार आहात, त्याचे उत्तर द्यावे.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी पूर्ण उत्तर ऐकून घेतले तर बरे होईल. आपण 2000 नंतरच्या कोणत्याही झोपड्यांना संरक्षण दिलेले नाही. कोणत्याही परिस्थतीत वॉर्ड ऑफीसर किंवा असिस्टंट कमिशनर म्हटले जाते ते, पोलीस चौकीमधील जे पी.आय आहेत, त्यांच्यावर आपण जबाबदारी निश्चित केलेले आहे. त्या ठिकाणी जर झोपड्या झाल्या तर ते जबाबदार राहतील, त्यांच्यावर जी काही कायदेशीर कारवाई करायची असेल ती केली जाईल, अशाप्रकारचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. फक्त मुंबईतील इन्फ्रास्टक्चर प्रोजेक्टच्या संदर्भात एम.यु.आय.पी. आणि एम.यु.टी.पी.चे काम चालू आहे. या एम.यु.आय.पी. आणि एम.यु.टी.पी. यांच्या अंतर्गत ज्या काही झोपड्या, बांधकामे अनधिकृत येतात. ते जरी अधिकृत असतील किंवा अनधिकृत असतील, त्यांना निश्चितपणे त्या ठिकाणी पुर्नस्थापित करत आहोत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येबद्दल चिंता व्यक्त केलेली आहे. यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. दिवसेंदिवसय मुंबईची लोकसंख्या वाढत आहे, मुंबईचे पुढे काय होणार आहे, अशाप्रकारची चिंता सगळ्यांना भेडसावत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, जिथे अनधिकृत झोपड्या झाल्या असतील, तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. आज मुंबईमध्ये अनधिकृत बांधकामे ज्या गतीने वाढत आहेत हे पाहिल्यानंतर याकडे सरकार गांभीर्याने लक्ष देत आहे, महानगरपालिका गांभीर्याने लक्ष देत आहे असे मानण्याचे कारण नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: म्हटले आहे की, दररोज मुंबईमध्ये 1 हजार कुटुंबे येत आहेत. ती कुटुंबे कोठे रहातात, याचाही सरकारने मागोवा घ्यावा. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, अनधिकृत झोपड्या झाल्यानंतर आतापर्यन्त किती अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे, किती केसेस कोर्टामध्ये दाखल केलेल्या आहेत, किती अनधिकृत बांधकामांना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्टे घेतलेला आहे ? (यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

तेव्हा आपण माझ्या स्पेसिफिक प्रश्नाला उत्तर द्यावे. ठाणे-मुंबईत किती अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, त्यांच्या विरुध्द कुठली कारवाई झाली आणि आतापर्यंत बांधकाम झाल्यानंतर किती अधिका-यांना सस्पेंड केले आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एवढी विस्तृत माहिती मी आता देऊ शकत नाही ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबईचा ऱ्हास होण्याचे कारण अनधिकृत बांधकाम हे आहे. अनधिकृत बांधकाम महापालिकेचे अधिकारी पाठिशी घालतात....

(काही सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलत असतात)

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेले प्रश्न अतिशय महत्वाचे आणि गंभीर आहेत. त्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत ते वस्तुस्थितीवर आधारित आहेत. या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे तेवढयापुरती मर्यादित माहिती राज्यमंत्र्यांकडे आहे त्यामुळे या प्रश्नासंबंधीची सगळी माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे त्यांनी सांगितलेले आहे. मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, या सदनाने ज्या स्पिरीटमध्ये,ज्या उद्देशाने एकमताने हा कायदा मंजूर केला त्या कायद्याची अंमलबजावणी जेवढया प्रभावीपणे व्हायला हवी होती तेवढया प्रभावीपणे ती होऊ शकलेली नाही, हे मी मान्य करतो. जेव्हा एक मताने निर्णय होतो त्यावेळी त्याबाबतीत राजकीय भूमिका घेण्याची गरज आहे असे मी सुध्दा मानीत नाही. याठिकाणी बेसिक प्रश्न विचारण्यात आला की, त्या कायद्याखाली किती अधिका-यावर कारवाई केली. कारण त्यामध्ये अधिकारी पण तेवढाच जबाबदार आहेत. झोपडी बांधणारा जेवढा जबाबदार आहे तेवढाच त्याला मदत करणारा सुध्दा जबाबदार आहे. म्हणून या कायद्याची एनफोर्समेंट तितक्या प्रभावीपणे होऊ शकलेली नाही. म्हणून मी सदनाला सांगू इच्छितो की, त्याचे एनफोर्समेंट प्रभावीपणे करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी लागेल. जे काम ज्यांच्याकडे आहे तेवढयापुरते ते काम करतात काही वेळा ते काम आपण करतो. दुस-या दिवशी परत त्या ठिकाणी झोपडी यावयाला सुरुवात होते त्याच्या विरुध्द कारवाई होते आणि तेच तेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11977...

श्री. विलासराव देशमुख....

काम महापालिकेचे अधिकारी किंवा रेव्हेन्यूचे अधिकारी असतील त्यांना करावे लागते. यामध्ये मूलभूत प्रश्न असा आहे की, हा कायदा करीत असतांना ही भूमिका घेतली गेली होती की, ठराविक तारखेपर्यंतच्या सर्व झोपडयांना संरक्षण द्यावे आणि त्या ठिकाणी नवीन झोपडया किंवा अनधिकृत बांधकाम होणार नाही यासंबंधी सर्वांनी दक्ष असले पाहिजे. लोकांचा यामध्ये सहभाग असणे आवश्यक आहे. माझ्या वॉर्डात माझ्या क्षेत्रात कुठली झोपडी झाली हे लगेच आपल्या लक्षात येते. म्हणून सर्वांना बरोबर घेऊन ही मोहीम जोरदारपणे राबवावी लागेल.याबाबतीत सरकाकरची भूमिका स्पष्ट आहे. कायद्याची अंमलबजावणी नीटपणे करण्याच्यादृष्टीने त्यामध्ये आणखी काही तृटी असतील तर त्या दूर करण्यासाठी वेगळी बैठक घेऊन या सर्वांना कामाला लावण्याची भूमिका राज्य सरकारची राहील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही.

सभापती :सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारलेला आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनीही तो मान्य केलेला आहे. परंतु केवळ तो मान्य करुन समस्या सुटणार नाही. दिलासा ही त्यातील महत्वाची गोष्ट आहे.कमिशनर, उपायुक्त आणि पोलीस ऑफिसर यांच्यावर काय कारवाई केली आहे ? किती जणांना सस्पेंड केले आहे ? माननीय राज्यमंत्र्यांनी दुसरी एक माहिती अशी दिली की, एमएमआरडीए मार्फत कार्यक्रम राबविला जातो. तेथील झोपडया पाडण्यासाठी आणि त्या लोकांना अल्टरनेटीव्ह जागा देण्यासाठी स्पार्क नावाची कंत्राट कंपनी नेमलेली आहे. हे स्पार्कचे लोक कोण आहेत या बद्दल पूर्वीच्या राज्यमंत्र्यांबरोबर मी चर्चा केली होती. आणि ही यंत्रणा काढून टाका असे मी सांगितले होते. परदेशाशी संबंध असणारी यंत्रणा आजही काम करते. त्याचा परिणाम म्हणून झोपडपट्टया प्रतिदिन वाढत आहेत. आणि त्याबाबत कोणावरही कारवाई झालेली नाही. याबाबतची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाला आणि महापालिकेला द्यावी असे माननीय मुख्यमंत्र्यंनी म्हटले आहे. मी तुम्हाला यासंबंधीची किती पत्रे आणून दाखवू. तुम्ही म्हणाल त्या दिवशी माझा सगळा पत्र व्यवहार घेऊन मी आपल्याकडे येतो. आपण त्यांना कारवाईचे आदेश द्यावेत किंवा हे काम आमच्याकडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11977..

श्री. मधुकर सरपोतदार...

होणार नाही असे तरी म्हणा. या सदर्भातील कारवाई कशी करणार ? हा मुंईच्या लोकसंख्येचा प्रश्न आहे. मुंबई स्फोटक परिस्थितीच्या टोकावर उभी आहे. प्रतिदिन लोकसंख्या वाढत आहे. हे आपणही मान्य करता आपण म्हणालात की, दीड हजार कुटुंब रोज मुंबईत येत आहेत. या परिस्थितीवर इलाज काय ? तो इलाज करण्यासाठी हा प्रश्न उपस्थित केला आहे. हा इलाज कशा पध्दतीने करण्यात येणार आहे ? कुठली यंत्रणा राबविणार आहात आणि कारवाई केव्हा पासून सुरु करणार आहात ?

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 11977 .....) पुढे सुरु.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मला प्रथम एमयुआयपी आणि एमयुटीपी या दोन प्रकल्पांच्या संदर्भात खुलासा केला पाहिजे. कारण एमयुआयपी हा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहकार्याने आपण मुंबई शहरात सुरु केलेला आहे. या प्रकल्पाचा सर्वे पूर्ण झाला त्यावेळी त्यामध्ये येणाऱ्या अतिक्रमीत झोपडया वगैरे यांच्या पुनर्वसनाचा पोर्शन त्यांनी मान्य केला होता. म्हणून एखादा रस्ता आपण एमयुटीपीखाली रुंदीकरणासाठी घेतला आणि त्यामध्ये अस्तित्वात असलेली वस्ती येत असेल तर त्या वस्तीचे देखील पुनर्वसन आपल्याला करावे लागेल. पण अशा प्रकारचा पुनर्वसनाचा मुद्दा हा एमयुआयपीमध्ये येत नाही.

श्री. अरविंद सावंत : महोदय, मी सातत्याने या विषयाच्या संदर्भात सभागृहात बोलत आहे. जागतिक बँकेकडून हा प्रकल्प आलेला आहे हे आम्हाला मान्य आहे. एमयुटीपीमध्ये आपण सांगितल्याप्रमाणे प्रकल्प राबवितांना अस्तित्वात असलेली वस्ती रेग्युलराईज्ड करतो हा मुद्दा जो आहे तो सन 1995 च्या कायदयाला कॉन्ट्रॅडिक्ट करणारा आहे, तो आपण काढणार की नाही ? कारण ज्यावेळी स्पार्क या संस्थेची माणसे तेथे जातात त्यापुर्वीच त्या ठिकाणी झोपडया उभ्या राहिलेल्या दिसतात, अशा झोपडयांचे पुनर्वसन आपण या एमयुटीपीच्या अनुषंगाने करतो. सन 1995 च्या कायदयाला हा मुद्दा विसंगत आहे असे मला म्हणावयाचे आहे. कारण सन 2005 च्या झोपडया सुध्दा त्यामुळे रेग्युलराईज्ड होतात, म्हणूनच या कायदयामध्ये बदल करणे आवश्यक आहे, तो शासन करणार काय ?

श्री. विलासराव देशमुख : जागतिक बँकेला ज्यावेळी आपण प्रस्ताव पाठविला त्या तारखेला जी वस्तुस्थिती होती तेवढाच आधार आपण घेतलेला आहे. आज कोणी नव्याने झोपडया बांधत आहेत, अशा तक्रारी आमच्यापर्यंत अजून तरी आलेल्या नाहीत आणि तशा तक्रारी जर सन्माननीय सदस्यांकडे आल्या असतील तर त्यांनी त्या शासनाकडे द्याव्यात, त्यासंदर्भात चौकशी करण्यात येईल. कुठल्याही संस्थेच्या पाठीमागे शासन उभे नाही. म्हणून आपल्या यासंदर्भात काही सूचना वगैरे असतील तर त्यांचाही विचार करु. मुंबईमध्ये रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे असेल तर एका योजनेखाली पुनर्वसन करतो आणि दुसऱ्या योजनेखाली पुनर्वसन करीत नाही त्यामुळे प्रचंड संघर्ष होतो, मग त्यांना हटविणे कठीण होते. त्यामुळे ती कामे थांबविली. तसेच यामध्ये केवळ एवढाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 11977 .....) पुढे सुरु. श्री. विलासराव देशमुख .....

मुद्दा नसून प्रोजेक्ट अफेक्टेड पर्सन (पीएपी) हा आधार देखील घेतलेला आहे. इतर ठिकाणी आपण सन 1995 चा कायदा अंमलात आणतो, त्याची मर्यादा 2000 सालापर्यन्त वाढविलेली नाही, त्यासाठी हायकोर्टाने हस्तक्षेप केला आहे आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती देखील आपण नेमली असून अशा लोकांसाठी तेथे काय व्यवस्था करावी लागणार आहे यासंदर्भात जे धोरण कोर्टाच्या सल्ल्याने ठरेल त्याची अंमलबजावणी केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी यासंदर्भात उदाहरणादाखल सांगू इच्छितो की, मुंबईत मानखुर्दजवळील हायवेवर दीड महिन्यापासून झोपड्या तसेच गॅरेज तयार झालेले आहे. मनोरा आमदार निवासाच्या पाठीमागे सन 1999 नंतरच्या झोपड्या झालेल्या आहेत, हे शासनाला कळत नाही काय ? या अतिक्रमणाच्या संदर्भात आपण संबंधित अधिकाऱ्यांवर कुठलीही कारवाई केली नाही. याला जबाबदार जे कोणी असि. कमिशनर वगैरे असतील त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी एक गोष्ट सदनाला सांगू इच्छितो की, ही सर्व अतिक्रमणे मुंबईत होत आहेत त्याची प्राथमिक जबाबदारी ही मुंबई महानगरपालिकेची आहे. या सर्व गोष्टींवरील नियंत्रण महानगरपालिकेचे असते. तसेच शासनाची जमीन म्हणून आपण महसूल विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी ते अतिक्रमण हटविण्याचे काम करतात. आपण म्हणालात त्याप्रमाणे एखादया ठिकाणी नव्यानेच अतिक्रमण झाले असेल तर त्यासंदर्भात निश्चित चौकशी होईल व संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, यामध्ये कोणालाही स्पेअर करण्याचे काहीच कारण नाही. परंतु मी अगोदरच मान्य केले आहे की, जेवढया प्रभावीपणे या कायदयाची अंमलबजावणी होणे आवश्यक होते तेवढया प्रमाणात ती झालेली नाही, हे राज्याचा एक प्रमुख म्हणून मी सांगतो याचा अर्थ आपण समजून घ्या, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई शहरातील मिठी नदी किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामामुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास व मुंबईवर ओढावलेले संकट

(3) * 9280 **श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. कन्हैयालाल गिडवानी , श्री. धोंडीराम राठोड , श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , मेजर सुधीर सावंत , श्री. यशवंतराव गडाख , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता , श्रीमती कांता नलावडे , श्री. गुरुमुख जगवानी , डॉ. दिपक सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री. मधुकर सरपोतदार** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील मिठी नदी किनाऱ्यावरील अवैध कारखाने तसेच व्यापारी गाळे बंद करण्यासाठी राज्य शासनाने व राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी तसेच नदीच्या परीसरात यापुढे अवैध बांधकामे होवू नयेत याची काळजी घ्यावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने ऑगस्ट,2005 मध्ये दिले असतानाही शासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय, नसल्यास, कोणती कारवाई करण्यात आली,

(2) शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(3) सदरहू आदेशानुसार सत्वर कारवाई होण्याचे दृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे,

(4) असल्यास, उपरोक्त बांधकामांवर वेळीच कारवाई का करण्यात आली नाही ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (1) व (2) मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विना परवाना व्यावसायिक उद्योगधंदयावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मिठी नदीकिनारी नवीन अनधिकृत बांधकामे आढळून आलेली नाही.

(3) व (4) मुंबई शहरातून वाहणाऱ्या मिठी नदीच्या विकास व तीचे संरक्षण करण्यासाठी दिनांक 11.8.2005 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. मुंबई महानगरपालिकेकडून याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

1) मिठी नदी परिसरातील विनापरवाना व्यावसायिक उद्योगधंद्यावर कारवाई करण्यात आली.

2) मिठी नदी परिसरातील दत्तकवस्ती योजनोमार्फत कचरा उचलण्याची व साफसफाई करण्याची उपाययोजना राबविण्यात येत आहे.

3) मल:निसारण पाणी नदीच्या पात्रात जाणार नाही याची काळजी घेतली जात आहे.

4) काठावरील अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबतची कारवाई लवकरच सुरु होणार आहे.

5) मिठी नदी परिसरात शौचकूप अस्तित्वात असून व लोकसंख्येनुसार वाढीव शौचकूप बांधण्याबाबतची प्रक्रिया चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9280..... पुढे सुरु .

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, अतिशय महत्वाचा प्रश्न या मिठी नदीच्या संदर्भात या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. मा. मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी कृपया या प्रश्नाकडे जातीने लक्ष द्यावे. या प्रश्नाला या ठिकाणी दिशाभूल करणारेच उत्तर शासनाने दिलेले आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "मिठी नदी परिसरातील दत्तक वस्ती योजनेमार्फत कचरा उचलण्याची व साफसफाई करण्याची उपाययोजना राबविण्यात येत आहे. मल:निसारण पाणी नदीच्या पात्रात जाणार नाही याची काळजी घेतली जात आहे तसेच काठावरील अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबतची कारवाई लवकरच सुरु होणार आहे" या उत्तराचा संबंध प्रश्नाशी कोठेही येत नाही, असे मला वाटते. यासंबंधी 24 मार्च 1981 रोजी ता. प्र. क्र. 7407 हा प्रश्न श्री. राम नाईक यांनी विचारला होता आणि त्यावेळी श्री. चंद्रकांत त्रिपाठी हे मंत्री होते. त्यांनी सांगितले होते की, मिठी नदीच्या पात्रातील अडथळे दूर करणे, रस्ता सरळ करणे, नदीच्या बाजूला असलेला रस्ता 35 फूट रुंद करणे, अशा प्रकारचे उत्तर त्यांनी दिले होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात काहीही केले नसून या ठिकाणी या प्रश्नाच्या संदर्भात चूकीची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. शासन चांगल्या प्रकारची कामे करीत नाहीत त्यामुळे लोकांना नाईलाजास्तव कोर्टात जावे लागत आहे. महाराष्ट्राचा कारभार आता हायकोर्टालाच चालवावा लागणार आहे की काय,असे वाटू लागले आहे. आपण चांगल्या प्रकारची कामे करीत नसल्यामुळेच कोर्टाला आदेश द्यावे लागत आहे. 450 अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात अनंत चर्तुदशीच्या नंतर कारवाई केली जाणार होती, आपण कोणती कारवाई केली आहे ? आपण ज्यावेळी या ठिकाणची पाहणी केली त्यावेळी आपल्याला किती अनाधिकृत बांधकामे आढळून आली? या ठिकाणी जी अनाधिकृत बांधकामे आढळून आली होती त्यांच्यावर आपण कारवाई का केली नाही? हा माझा सवाल आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा होत आहे. विशेषत: मिठी नदी ही मुंबई शहराच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाची नदी आहे. या नदीचा उगम विहार जलाशयातून झालेला आहे. या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे, अतिक्रमण, अनाधिकृत उद्योग व इंडस्ट्रीयल वेस्टच्या संदर्भात उपाययोजना झाली पाहिजे. मिठी नदीमध्ये ॲफल्युएन्ट वॉटर जात आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मिठी नदीच्या संदर्भात आम्ही स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात स्पेसिफिक उत्तर द्यावे अशी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात काय केलेले आहे याची थोडक्यात मी माहिती देत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मिठी नदीसाठी महानगर पालिकेने 16 कोटी रुपये खर्च केलेले आहे. परंतु असे असतांनाही मिठी नदीच्या नाल्यावर फळया, पत्रे टाकून अनाधिकृत बांधकामे तसेच व्यवसाय केले जात आहे. या ठिकाणी जी 450 अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यांच्यावर आपण कोणती कारवाई केलेली आहे? या अनाधिकृत बांधकामावर कारवाई केली नसल्यास आपण त्यांच्यावर कारवाई का केली नाही ? हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 9280.....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी 512 अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली आहे. उत्तरामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात ब-याच गोष्टींची माहिती दिलेली आहे. या ठिकाणच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने म्हटले आहे की, या ठिकाणी 150 व्यवसाय चालत होते. वॉटर ॲक्टच्या 33 (ए) कलमाप्रमाणे हे अनाधिकृत उद्योग बंद करण्यात आले आहे. या ठिकाणी जे अनाधिकृत बांधकामे होती त्याचे निष्कासन करण्यासाठी चितळे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमलेली आहे. तसेच मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून त्यांनी आयआयटीला एनव्हायरमेन्ट स्टडी करण्याच्या दृष्टीने.....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी जी अनाधिकृत बांधकामे आहेत ती अद्यापपर्यंत तोडण्यात आलेली नाहीत.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या संदर्भातच मी उत्तर देत आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9280....

श्री.राजेश टोपे ....

सभापती महोदय, मी स्पेसिफिक उत्तर देत आहे. हा आकडेवारीचा खेळ नाही. हायड्रोलॉजीसंबंधी देखील अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी CPWRS ला काम देण्यात आलेले आहे. त्यांचा अंतरिम अहवाल आलेला आहे. फायनल रिपोर्ट एक महिन्यामध्ये अपेक्षित आहे. हायड्रोलॉजीचा अभ्यास केल्यानंतर, एन्व्हॉयरमेंटसंबंधीचा आय.आय.टीकडून अभ्यास केल्यानंतर किती अनधिकृत बांधकामे काढावयाची हे ठरवावे लागेल. नदीच्या पात्रापासून किती मीटर अंतरावरील बांधकाम ठेवावे यासंबंधीचा स्टडी रिपोर्ट आल्यानंतर कलेक्टरांच्या माध्यमातून अतिक्रमणे काढण्यात येतील. आजही तेथे जे अतिक्रमण झाले आहे, ते काढण्याचे काम चालू आहे. फायनल रिपोर्ट आल्यानंतर BMC, MMRDA व कलेक्टर यांच्यामार्फत अतिक्रमणे काढण्यात येतील.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, 17 ऑक्टोबर रोजी मुंबई हायकोर्टाने आदेश दिला आहे. अल्डस हक्सले या लेखकाच्या वचनाचा उल्लेख करून हायकोर्टाने निदेश दिला आहे. मिठी नदीचा विषय हा गंभीर आहे. लेखी उत्तरामध्ये अधिकृत बांधकामे मिठी नदीच्या प्रवाहाला अडथळा निर्माण करीत आहे उल्लेख देखील नाही. एवढेच नव्हे तर ज्या अनधिकृत बांधकामामुळे मिठी नदीच्या पात्राला अडथळा निर्माण झाला आहे, त्याचा देखील उल्लेख नाही. सदर बांधकामे मुंबईच्या जीवनाचा सत्यानाश करीत आहेत. ती हटविली पाहिजेत. ज्यांचे बांधकाम अधिकृत आहे, त्याला शासन पर्यायी जागा देणार आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, मिठी नदीच्या पात्राला ज्या अनधिकृत व अधिकृत बांधकामुळे अथडळा निर्माण होणार आहे ती बांधकामे शासनाने पाडून टाकली पाहिजेत. जी बांधकामे अधिकृत आहेत, त्यांना पर्यायी जागा देण्यात येईल असे शासनाने वस्तुत: कबूल केले आहे. हायकोर्टाने देखील सांगितले आहे. पण त्याचा उत्तरामध्ये उल्लेख नाही. ही जी संदिग्धता आहे ती आपल्याला परवडणारी नाही.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मिठी नदीच्या पात्रावर अतिक्रमण झालेले आहे. त्यामुळे मुंबईचे जीवन उध्वस्त झालेले आहे हे पावसाळयामध्ये आपण अनुभवले आहे. म्हणूनच हा विषय शासनाने गांभीर्याने घेतलेला आहे. यासंबंधी मंत्रिमंडळामध्ये देखील चर्चा होऊन मिठी नदीच्या सुरक्षिततेसाठी प्राधिकरण स्थापण्याचा निर्णयसुध्दा घेण्यात आलेला आहे. मधल्या काळामध्ये काही जण कोर्टामध्ये गेले. कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी मुंबई महापालिकेने तंतोतंत केली आहे. मिठी नदीच्या तीरावर जवळ जवळ 512 कमर्शिअल युनिटस् आहेत. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9280...

श्री.विलासराव देशमुख....

त्यापैकी 461 कमर्शिअल युनिटस् निष्कासित केली आहेत. 50 बांधकामे ही प्रत्यक्षात तोडण्यात आलेली आहेत. म्हणजे 512 पैकी 511 बांधकामावर कोर्टाच्या आदेशाप्रमाणे मुंबई महानगरपालिकेने कारवाई केली आहे. तसेच पर्यावरण विभागाने 11 इल-लिगल केमिकल्स इंडस्ट्रीज चालवित आहेत त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. त्यांच्याविरूध्द कारवाई चालू आहे. दिनांक 31 मे 2006 पूर्वी आम्ही मिठी नदीसाठी एक कार्यक्रम आखत आहोत. मिठी नदीच्या बॉटल नेकमध्ये पाण्याचा प्रवाह वाहून जाण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. त्यासाठी कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्याला अंतिम रूप देण्याचे काम चालू आहे. या कामाला प्रत्यक्षात सुरूवात जानेवारी महिन्यामध्ये करण्यात येणार असून मे 2006 पर्यंत मिठी नदीच्या पाण्याचा प्रवाह समुद्राला सुरळीतपणे मिळण्यासंबंधीची दक्षता राज्य सरकारने घेतलेली आहे. मिठी नदीच्या पात्रा जवळील 15 मिटर पर्यंतची अतिक्रमणे हटविली जातील. त्यामध्ये 1995 पूर्वीच्या झोपडया असतील तर त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. त्यासंबंधीचा देखील कार्यक्रम आखला आहे. 31 मे पर्यंत मिठी नदीचे पाणी समुद्राला जाऊन मिळावे व मुंबईत पूर परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी राज्य सरकार दक्षता घेणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मिठी नदीच्या पात्रामध्ये 500 पेक्षा अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यासंबंधी मुंबई महानगरपालिकेने कारवाई केली आहे, असे सांगण्यात आले आहे.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / शोधनासाठी नाही

ता.प्र.क्र..9280

श्री.पांडुरंग फुंडकर.....

ज्यावेळी मिठी नदीला पूर आला त्यावेळी मी स्वत: त्या परिसरात जाऊन आलो. त्याठिकाणी एअरपोर्ट ऑथॉरीटीने कोणतीही परवानगी न घेता कंपाऊंड वॉलचे बांधकाम केलेले आहे. तसेच नदीचा प्रवाह दुसऱ्या बाजुला वळविण्यात आलेला आहे. माझ्या माहिती प्रमाणे या बांधकामासाठी एअरपोर्ट ऑथॉरिटीने महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. दुसऱ्या बाजुला नदी हटवून त्याठिकाणचा भूखंड एका बिल्डरला देण्यात आलेला आहे. तेथे एक मोठे हॉटेल उभारण्यासाठी सपाटीकरणाचे काम सुरु झाले होते. त्या नदीचे बॅकवॉटर झाले आहे. माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, एअरपोट ऑथॉरिटीने कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेतली होती काय ? परवानगी घेतली नसल्यास ते बांधकाम पाडण्यात येईल का ? तेथे सपाटीकरण चालू आहे त्याठिकाणी हॉटेल उभारण्यास परवानगी देण्यात आलेली आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, त्याठिकाणी एअरपोर्ट ऑथॉरिटीने काही बांधकाम केलेले आहे. नदीचा प्रवाह 90 अंशांमध्ये बदलण्यात आलेला आहे. त्याचा फार मोठा फटका बसलेला आहे. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या जमिनी आहेत त्यावर हे बांधकाम आहे. त्यास नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या परवानगीची आवश्यकता नाही. परंतु जनतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन आम्ही महानगरपालिकेच्या वतीने "स्टॉप वर्क" नोटीस जारी केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : कंपाऊंड वॉलचे बांधकाम झालेले आहे.

श्री.विलासराव देशमुख : त्यांनी नदीमध्ये पिलर्स उभारुन नवीन काम सुरु केले होते. एनजीओकडून आलेल्या तक्रारी, लोकांच्या सूचना लक्षात घेऊन यातून मार्ग काढण्यासाठी एअरपोर्ट ऑथॉरिटीचे अधिकारी आणि एनजीओ बरोबर बैठक बोलाविली होती. आम्ही एअरपोर्ट ऑथॉरिटीला सांगितलेले आहे की, तुम्हाला काम करता येणार नाही. जनतेचा विचार करुन त्यांना नोटीस जारी केलेली आहे. एअरपोर्ट ऑथॉरिटीच्या अधिकाऱ्यांबरोबर सगळ्या प्रश्नासंदर्भात चर्चा करुन मार्ग काढणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9280.....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आज मिठी नदी ही नदी राहिलेली नाही. या मिठी नदीचे रुपांतर नाल्यामध्ये झालेले आहे. या नदीमध्ये जे पाणी दिसते ते अतिशय काळेकुट्ट आहे. त्यास पाणी म्हणावे की अन्य काही म्हणावे हे मला समजत नाही. पूर्वी या नदीमध्ये मच्छिमार लोक मासे पकडत असत. माझा माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे की, या नदीचे नाल्यामध्ये रुपांतर होईपर्यंत महानगरपालिकेचे अधिकारी झोपले होते काय ? त्या नदीत ॲफ्ल्युएन्ट वॉटर जात आहे. हे प्रदूषण युक्त पाणी नदीत सोडण्या अगोदर त्या पाण्यावर केमिकल प्रक्रिया करुन ते पाणी नदीत सोडले पाहिजे असा कायदा आहे. असे असताना एम.पी.सी.बी.ने नोटीसेस का इश्यू केल्या नाही ? याकडे ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्यांचेवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? आता त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आपण ही अनधिकृत बांधकामे केव्हा निष्कासित करणार आहात ? ज्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने ही बांधकामे उभी राहिली त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निष्कासीतासंदर्भात सांगितले आहे. त्यांनी सांगितले की, 512 पैकी, 461 गाळे रिकामे करण्यात आले आणि 50 गाळयांवर निष्कासनाची कारवाई झाली आहे. या ठिकाणी चुकीचे काम झाले होते. अनधिकृत बांधकामे झाली होती आणि विनापरवाना लायसन्सद्वारे त्या ठिकाणी काम केले जात होते. त्यामुळे बीएमसी ने त्यांचे गाळे बंद केले आहेत. त्यांच्या कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज बंद केल्या असून, निष्कासनाचे काम सुध्दा निश्चितप्रकारे केले जाईल.

श्री.अनिल परब : या ठिकाणी मिठी नदीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. मिठी नदीला पूर आल्यानंतर आपण त्या ठिकाणी भेट दिली असावी. परंतु मी तर मिठी नदीचे पाणी माझ्या स्वत:च्या घरातून उपसले आहे, त्यातील डेडबॉडी मशिनद्वारे बाहेर काढल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 512 अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्याचे सांगितले. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी त्या 512 बांधकामाची माहिती द्यावी. कोणत्याही बांधकामावर कारवाई झालेली नाही, आणि त्यांच्यावर जरी कारवाई झाली असली तरी ती बांधकामे पुन्हा नव्याने उभी राहिली आहेत. केवळ थूक लावण्याचा कार्यक्रम शासनाकडून राबविला जात आहे. अजूनही त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. त्यामुळे सरकारला अशी चुकीची माहिती देणाऱ्या कामचुकार अधिकाऱ्यांवर किती दिवसात कारवाई करणात आहात ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सदनाला जी माहिती दिली जाते ती अतिशय जबाबदारीने दिली जाते. सदनाचा सदस्य जेव्हा एखादा मुद्दा उपस्थित करतो त्यावेळी त्यांच्याकडे असलेली माहिती ग्राहय धरली जाते. त्यातल्या त्यात सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब हे त्याच भागातील आहेत. त्यामुळे 512 अनधिकृत बांधकामाबाबतची यादी आम्ही त्यांना देऊ. आज जर त्या ठिकाणी पुन्हा बांधकाम झाले असेल किंवा त्यांच्यावर कारवाई झाली नसेल आणि अधिकाऱ्यांनी जर चुकीची माहिती पुरविली असेल तर तो अधिकारी त्या क्षणी निलंबित होईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या दुसऱ्या प्रश्नाला असे उत्तर दिले आहे की, नवीन अनधिकृत बांधकाम झाले नाही आणि चौथ्या प्रश्नाला उत्तर दिले आहे की, अनधिकृत बांधकामे जी उभी आहेत ती लवकरच तोडण्यात येतील. महोदय, या दोन्हीही उत्तरांमध्ये विसंगती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9280....

श्रीमती सुधा जोशी....

आहे. माझा माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, ही अनधिकृत बांधकामे केव्हापासूनची आहेत आणि किती दिवसात ती तोडण्यात येतील ? तसेच दत्तकवस्ती योजनेचे स्वरुप काय आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ही अनधिकृत बांधकामे केव्हाची असतील हे आज सांगू शकणार नाही.

श्रीमती सुधा जोशी : नवीन बांधकामे झाली नाही हे निश्चित आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अनधिकृत बांधकाम त्या ठिकाणी राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे. कोणत्याही परिस्थितीत येथून पुढे अनधिकृत बांधकाम होणार नाही किंवा या घटनेच्या नंतर झालेले नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी सांगितले त्यानुसार सदनाच्या कोणत्याही सदस्याला वाटले की, त्या ठिकाणी काहीतरी होत आहे व याबाबत जर त्यांनी माहिती दिली तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी दत्तकवस्ती योजनेच्या स्वरुपाबाबत माहिती विचारली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, दत्तकवस्ती योजनेंतर्गत 26 एन.जी.ओ.च्या माध्यमातून स्वच्छतेचे काम त्या ठिकाणी सुरु झाले आहे.

श्री.नितीन गडकरी : या प्रकरणासंदर्भात अनेक कमिटया झाल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, हा विषय आम्ही गंभिरपणे आणि गांभीर्याने घेतला आहे. गांभीर्याचा आणि सरकारचा काय संबंध आहे हे शोधण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. आता पुढील पावसाळा जून महिन्यात सुरु होणार आहे. जानेवारीमध्ये शासन कार्यवाहीस सुरुवात करणार आहे. या बांधकामांबाबत रिट पिटीशन दाखल होते. त्यानंतर अनधिकृत बांधकामे पाडण्याचा आदेश आल्यानंतर राज्यमंत्री त्याला स्थगिती देतात. त्यामुळे सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन कोणाचीही मूर्वत न करता, जून महिन्यापूर्वी सर्व कार्यवाही करा. पावसाळयामध्ये कोणाचेही नुकसान होणार नाही यादृष्टिकोनातून प्रयत्न करा. जे कोणी आड येतील त्यांच्यावर कारवाई करा. जुलै महिन्यामध्ये कोणतेही नुकसान होणार नाही याबाबत बैठक घेऊन कडक कारवाई करा.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9280 श्री.नितीन गडकरी ....

माननीय मुख्यमंत्री हे अनेक कामामध्ये व्यस्त असतात.मला हे माहीत आहे की, काही आमदारांनी या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांना पत्र दिले होते आणि त्यावर त्यांनी स्थगनादेश मिळवला आहे.या ठिकाणी जी अतिक्रमण आहेत ती काढल्यानंतर इतर काही लोकांनी खालच्या कोर्टाचा स्टे घेऊन ठेवलेला आहे आणि हे मॅटर सबज्युडियस असल्यामुळे अधिका-यांना काही करता येत नाही. मिठी नदीमध्ये पाणी नाही. मध्यंतरी बान्द्रा -वरळी सागरी महामार्गाचे अलाईनमेन्ट निश्चित करण्याकरिता सर्व्हे करण्यासाठी मी तेथे लॉचमधून गेलो होतो. त्या ठिकाणी मोठे गटार आहे. मी माझ्याबरोबर काही पत्रकारांनासुध्दा घेऊन गेलो होतो.पर्यावरणाचा एक मुद्दा त्या वेळी उपस्थित करण्यात आला होता.त्या ठिकाणाहून मासोळी पकडता येणार नाही असा मुद्दा मांडण्यात आला होता. तेव्हा मी विचारले की, या गटरात मासोळी मिळते काय ?ही संपूर्ण गटार समुद्रापर्यन्त गेलेली आहे . माहीम खाडीपर्यन्त ही सगळी गटार असून त्या गटारातील पाण्याला घाण वास येत असतो. या निमित्ताने मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, जून महिन्याच्या आत मिठी नदीच्या सापळयातून मुंबई मुक्त होईल आणि पुढच्या पावसाळयात कितीही मोठा पाऊस पडला तरी मुंबईकर या संकटात सापडणार नाही अशा प्रकारे नि:संदिग्ध आश्वासन, जबाबदारीने गंभीरतापूर्वक आणि गांभीर्याने देण्यात येणार आहे काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी जे सांगत आहेत तीच भूमिका या सरकारची आहे. त्या दृष्टीने सरकार सातत्याने फॉलोअप करीत आहे. या संदर्भात कोणती उपाययोजना केली पाहिजे हे सांगण्याकरता वेगवेगळया तज्ज्ञांच्या समित्या नेमण्यात आलेल्या आहेत.व त्यांच्याकडून माहिती मागविण्यात येत आहे.....

श्री.नितीन गडकरी :शासनाने आतापर्यन्त एकूण 9 कमिटया नेमलेल्या आहेत.

Where there is a will, there is a way. If there is no will, there is only discussions, committees, seminars, study groups and research groups.आतापर्यन्त फॉरिनच्या अनेक तज्ज्ञांच्या समित्या नेमण्यात आलेल्या आहेत आणि एक रुम पूर्णपणे भरुन जाईल एवढे या समित्यांचे अहवाल आलेले आहेत.तेव्हा हे तज्ज्ञ हटविण्यात येऊन वॉर फुटींगवर हे काम करण्यात आले पाहिजे अन्यथा हे तज्ज्ञ लोक आपल्याला काम करु देणार नाहीत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9280..

श्री.विलासराव देशमुख : त्या तज्ज्ञांवर आपण तज्ज्ञ आहोत.हा प्रश्न आपण सहजपणे सोडून देत नाही. या संदर्भात आपली एकच भूमिका आहे. मिठी नदी डेव्हलप करण्याचे काम कमी वेळात होणे शक्य नाही. त्या ठिकाणी अडथळे असल्यामुळे त्या नदीच्या पात्रातून पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होत नाही. अशा प्रकारे ज्या ठिकाणी बॉटल नेक आहेत त्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे ताबडतोबीने दूर करणे , तेथील पात्र खोल करणे, तेथील रुंदी वाढविणे .ही कामे युध्द पातळीवर आपण घेणार आहोत. त्याचप्रमाणे जून महिन्यापूर्वी ही सगळी कामे करुन तेथील भाग सुस्थितीत आणणे हे काम आम्ही पहिल्यांदा करु. .दुर्देवाने अतिवृष्टी झाली तर त्या पाण्याचा निचरा व्यवस्थितपणे करण्याकरिता ही सगळी व्यवस्था एकाच वेळी होईल असा दावा मी करणार नाही. आज परिस्थिती अशी आहे की, थोडा जास्त पाऊस पडला तरी तेथे पूर येतो. 20-22 वर्षापूर्वी असा प्रकार घडत नव्हता. आपलेसुध्दा वास्तव्य या मुंबईत 20-22 वर्षापासून आहे. तेव्हा पासून आपले जाणे येणे येथे आहे.पूर्वी असे घडत नव्हते. परंतु हल्ली असे दिसून येत आहे की ,50 एम.एम पाऊस पडला तरी फलडींग होत असते व त्यातून नवीन प्रश्न निर्माण

झालेला आहे. तेव्हा असा प्रकार पुन्हा घडता कामा नये.नॉमल रेनप्रमाणे मुंबईमध्ये 2000 मि.मि. पाऊस वर्षभरात पडत असतो. तेव्हा त्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था निश्चितपणे केली जाईल.मी स्वत: या बाबतीत मॉनेटरिंग करीत आहे.एवढे आश्वासन मी या निमित्ताने आपल्याला देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..

मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती खाली करण्याबाबतचा ॲक्शन प्लॅन

(४) * १११३९ श्रीमती सुधा जोशी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. धोंडीराम राठोड , श्री. यशवंतराव गडाख , श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती खाली करण्यासाठी माहे ऑगस्ट, २००५ महिन्यात ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती इमारती खाली करण्यात आल्या आहेत व त्यांचे पुनर्वसन कोणत्या स्वरुपात करण्यात आले आहे,

(३) तसेच रिकाम्या करण्यात आलेल्या इमारती किती दिवसात विकसीत करण्यात येणार आहे,

(४) अद्यापपर्यंत धोकादायक इमारती खाली करण्यात आल्या नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. दयानंद मस्के,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) होय.

(२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत उत्तर व दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींपैकी १०७ इमारती धोकादायक स्थितीत आढळल्या होत्या. त्यापैकी ४५ इमारती खाली करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीमधील ६१६ भाडेकरु/रहिवाशांनी संक्रमण शिबिरातील गाळे स्वीकारुन वा स्वत:ची पर्यायी व्यवस्था करुन जागा खाली केलेल्या आहेत.

(३) सदर धोकादायक इमारतींपैकी दुरुस्ती पलीकडे गेलेल्या ज्या इमारती म्हाडा अधिनियम १९७६ कलम ८८ (३)(अ) अन्वये "धोकादायक" म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. अशा इमारतींची पुनर्रचना वा पुनर्बांधणी महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्यावर करण्यात येईल.

(४) धोकादाय आढळलेल्या काही इमारतीतील रहिवाशांनी त्यांच्या स्वत:च्या जागा खाली करण्यास नकार दिलेला आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१) गणेश उत्सव, नवरात्री, दिवाळी, रमझान इ. सणांमुळे रहिवाशांनी मंडळाने वाटप केलेल्या संक्रमण शिबिरामध्ये जाण्यास प्रखर विरोध केला.

२) काही इमारतींमधील रहिवासी / भाडेकरुंचा आग्रह त्यांच्या इमारतीच्या जवळपास असलेल्या संक्रमण शिबिरात जागा उपलब्ध करुन द्यावी असा आहे.

३) रहिवासी / भाडेकरुंच्या मुलांच्या शाळा त्यांना वितरित करण्यात येणा-या संक्रमण शिबिरापासून लांब असल्यामुळे नविन शाळेत प्रवेश मिळविणे व प्रवासाच्या दृष्टीने गैरसोईचे होते.

४) काही सहिवासी / भाडेकरुंच्या कुटुंबात वृध्द व आजारी व्यक्ती रहात असल्याने उपनगरात राहून वैद्यकीय सेवा मिळविण्यास गैरसोय निर्माण होते.

५) काही रहिवासी / भाडेकरुंचा त्याच इमारतीत व्यवसाय असल्याने, तसेच नोकरी करीत असल्याचे नोकरीचे ठिकाण जवळपास नसल्याने सदर जागा सोडून इतरत्र जाण्यास नाखुष असतात.

तथापि, याबाबत लोकप्रतिनिधी, रहिवासी / भाडेकरु यांच्यासोबत बैठका घेऊन धोकादायक इमारती खाली करण्याबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे पुन्हा प्रयत्न करण्यात येईल.

४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी :सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की," त्या ठिकाणच्या इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. अशा इमारतींची पुर्नरचना वा पुर्नबांधणी महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्यावर करण्यात येईल." तेव्हा मुंबई महानगरपालिकेची मंजुरी मिळावी यासाठी अर्ज केला आहे काय ? केला असल्यास तो केव्हा केला होता ? त्याचप्रमाणे त्यांच्या स्वत:च्या ज्या जागा आहेत त्या रिकाम्या करण्यास रहिवाशांनी नकार दिला आहे. व त्याची कारणेसुध्दा उत्तरामध्ये देण्यात आलेली आहेत. ही कारणे काहीही असोत. ही कारणे कदाचित खरी असतील वा योग्य असतील .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु तरीही रहिवाशांच्या जीविताला धोका आहे हे नाकारता येत नाही. तेव्हा अशा परिस्थितीत रहिवाशांच्या जागा खाली करून घेण्यासाठी मंडळ कोणत्या प्रकारचे ठोस प्रयत्न करीत आहे आणि कोणता मार्ग यातून निघणार आहे हे कृपया मंत्री महोदयांनी सांगावे.

(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, म.न.पा.कडे तसा अर्ज अजून केलेला नाही आणि ..

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी देऊ इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती, दुर्दैवाने मधल्या काळामध्ये त्यातील 3-4 इमारती कोसळल्या आहेत आणि त्यात काही माणसे मृत्यूमुखी पडली आहेत., तर अशा मोडकळीस आलेल्या इमारतीतील मूळ भाडेकरूंची अडचण अशी आहे की, त्यांना असे वाटत असते की, आम्ही उद्या संक्रमण शिबिरामध्ये गेलो तर आमच्या मूळ जागेमध्ये आम्हाला परत आणले जाईल की नाही, मालक किंवा विकासक ती जागा गिळंकृत तर करणार नाही ना ? अशा प्रकारची एक भीती अशा इमारतीतील मूळ भाडेकरूंच्या मनामध्ये घर करून असते. ज्या परिसरामध्ये, विशेषत: दक्षिण मुंबईमध्ये अशा इमारती संख्येने जास्त आहेत आणि दक्षिण मुंबईमध्ये संक्रमण शिबिरे फारशी उपलब्ध नाहीत. त्यामुळे तेथील मूळ भाडेकरूंना दूरवरील संक्रमण शिबिरामध्ये नेऊन ठेवावे लागते आणि त्यासाठी ते लोक तयार होत नाहीत. कारण त्यांच्या कामाची जागेपासून नव्याने मिळणारी संक्रमण शिबिरातील जागा दूर वर असल्याने येण्या-जाण्यासाठी होणारा त्रास, मुलांच्या शाळा वगैरे सारख्या कौटुंबिक अडचणी ते लोक आमच्यासमोर मांडतात आणि त्या अडचणी तसे पाहिले तर खऱ्याही आहेत. त्यामुळेच इमारत राहण्यासाठी कितीही धोकादायक असली तरी काही वेळेस सक्तीने लोकांना त्यातून बाहेर काढण्याचा आपण प्रयत्न केला तर काही लोकांनी त्याला विरोध करून ॲफिडेव्हिट करून दिले आहे की, आम्ही आमच्या जबाबदारीवर या धोकादायक जागेमध्ये रहात आहोत आणि उद्या या ठिकाणी काही बरेवाईट झाले तर त्याची जबाबदारी सरकारवर असणार नाही. म्हणजे एका बाजूला अशी भूमिका या धोकादायक असलेल्या, मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवासी घेत आहेत. म्हणून मग आता आम्ही असा निर्णय घेतला आहे की, दक्षिण मुंबईमध्येच अशा इमारतीतील रहिवाशांसाठी संक्रमण शिबिरे बांधावयाची आणि त्यामध्ये त्या लोकांना जागा द्यावयाची. त्या दृष्टीने

..... के 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण म्हाडाला सूचनाही दिलेल्या आहेत आणि त्या परिसरामध्येच संक्रमण शिबिरे तातडीने उपलब्ध होतील अशी व्यवस्था आम्ही केलेली आहे तसेच इतर ठिकाणीही बांधकाम करण्यासंबंधी देखील तातडीने पावले उचलावित अशा सूचनाही दिलेल्या आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांच्या दृष्टीने आपण एक चांगला निर्णय घेतला आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, पावसाळा आल्यामुळे अशा 45 इमारती आपण शोधून काढल्या आणि त्यामध्ये जवळपास 616 भाडेकरू आहेत. परंतु त्यापूर्वीचेही अनेक भाडेकरू असे आहेत की, जे आपल्या संक्रमण शिबिरांमध्ये 5-5, 10-10 नव्हे तर 15-20 वर्षापासून रहात आहेत आणि अजूनही ते आपल्या मूळ जागांमध्ये परत आलेले नाहीत, येऊ शकलेले नाहीत. तेव्हा आता आपण जो प्लॅन केलेला आहे तो किती वर्षाचा आहे की ज्यासाठी 3 कोटी रूपये लागणार आहेत. तसेच हे पैसे आपण कसे उपलब्ध करणार आहात आणि त्यातून किती गाळे उपलब्ध होणार आहेत ? सभापती महोदय, आपण येथे म्हटले आहे की, अशा इमारतींची पुनर्रचना वा पुनर्बांधणी महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्यावर करण्यात येईल. त्या संबंधात माझा प्रश्न आहे की, आताच माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, महापालिकेकडे त्यासाठी अर्ज केलेला नाही. तर मग यासाठी महापालिकेकडे अजून प्लॅन तयार करण्यासाठी का दिला नाही ? या इमारतींचा प्लॅन आणि एस्टिमेट तयार झालेले आहे का ? नसल्यास, का नाही ? आणि नसेल तर इतक्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, ही जी योजना आहे त्यात दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक वर्षांपासून अनेक लोक आपल्या संक्रमण शिबिरांमध्ये त्यांच्या मूळच्या इमारतींचे पुनर्रचनेचे वा पुनर्बांधणीचे काम पूर्ण झालेले नाही म्हणून रहात आहेत. त्यातील काहींच्या इमारती पूर्ण झाल्या आहेत आणि तरीही ते लोक संक्रमण शिबिरातील जागा सोडण्यास तयार नाहीत. म्हणजे यामध्ये ही देखील एक बाजू आहे. एका बाजूला लोक विचारतात की, आम्ही ट्रांझिट कॅम्पमध्ये किती दिवस रहावयाचे ? आणि त्याचवेळेस दुसरी बाजू अशीही आहे की, मूळ इमारतींचे काम पूर्ण झालेले असल्याने आता ट्रांझिट कॅम्प सोडण्यासंबंधीचे पत्र देऊनही ट्रांझिट कॅम्पमधील जागा सोडण्यास अनेक जण तयार नाहीत. तेव्हा या दोन्ही बाजूंचा विचार केला पाहिजे. त्यासाठीच आता आपण अल्पकालीन आणि एक दीर्घकालीन योजना आखलेली आहे.

..... के 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साधारणत: 120 इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम आपण प्रस्तावित केलेले आहे आणि त्यासाठी 3 कोटी रूपये खर्च येणार आहेया बाबतची माहिती मी आपल्या एका बैठकीमध्ये दिलेलीच आहे.

(यानंतर श्री. सरफरे ..... एल 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

आणि म्हणून या कामासाठी साधारणपणे उपकराव्दारे आणि शासनाकडून प्राप्त होणारा पैसा हा 170 कोटी आहे. आणि निधीतून उपलब्ध होणारा पैसा साधारणपणे 130 कोटी आहे. शासनाकडून त्यांना जे थकित देणे आहे ते देण्याचे आम्ही मान्य केले आहे. ती व्यवस्था आम्ही निश्चितपणे करु. शेवटी म्हाडा आणि शासन या दोन्हींमधील हा व्यवहार असल्यामुळे म्हाडाला सांगितले आहे की, तुम्ही आमच्या निधीची वाट न पहाता तुम्ही तुमच्या पैश्यामधून खर्च करा. सरकार ती रक्कम आपल्याला नंतर देईल. त्यामुळे पैश्यामुळे हे काम थांबले आहे असे मला वाटत नाही. दुसरे असे की, दीर्घकालीन योजनेमध्ये आपल्याला 1 लाख घरे बांधावी लागणार आहेत. ती 5 हजार कोटींची योजना असून त्यामध्ये 1 हजार इमारती बांधाव्या लागणार आहेत. त्यामध्ये 50 टक्के सहभाग हा राज्य सरकारने उचलण्यासंदर्भात आम्ही भूमिका घेतली आहे. त्याप्रमाणे 750 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. त्यामध्ये केंद्र सरकारचा सहभाग 35 टक्के रहाणार असला तरी इतर वित्तीय संस्थांकडून पैसे उपलब्ध करुन घेतले जातील. या रिडेव्हलपमेंटच्या संदर्भात दोन टप्प्यामध्ये म्हाडाने प्लॅनिंग केले आहे. दुसरा प्रश्न महानगरपालिकेकडून परवानगी मिळण्यास विलंब लागतो, त्यामुळे काम रेंगाळते याबाबत विचारला आहे. त्यामध्ये तांत्रिक अडचणी असल्या तरी म्हाडा हे बांधकाम करीत असल्यामुळे एक इमारत पाडल्यानंतर त्या ठिकाणी नवीन इमारत बांधत असतांना नवीन नियम लागू होतात. इमारती सभोवती सहा मीटर इतकी जागा सोडावी लागते. म्हणून नवीन इमारतीच्या बाबतीत ही अडचण आहे. परंतु ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अडचण नाही अशा इमारतींचे काम सुरु करण्यासाठी त्या इमारतींच्या प्लॅनला मंजूरी देण्याच्या बाबतीत महानगरपालिकेने कार्यवाही करावी अशा सूचना महानगरपालिकेला देवू.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, नवीन इमारतींचे बांधकाम करतांना 6 मीटर जागा सोडावी लागते असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आज आपण सायन येथील संक्रमण शिबिरामध्ये जावून पहावे. 35 वर्षापूर्वी बांधलेले हे बैठया चाळींचे संक्रमण शिबीर असून त्यांचे पुर्नवसन करण्याची गरज आहे. त्या संक्रमण शिबिराला अतिशय गलिच्छ स्वरुप प्राप्त झाले आहे. तेव्हा या संक्रमण शिबिराचे आपण पुर्नवसन करणार काय? आणि मुंबई महानगरपालिकेने एक महिन्याच्या आत प्लॅन मंजूर केला पाहिजे अशाप्रकारची सक्ती महानगरपालिकेवर घालणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : मुंबई महानगरपालिकेने एक महिन्याच्य आत म्हाडाचा प्लॅन मंजूर केला पाहिजे अशापध्दतीचे बंधन निश्चितपणे महानगरपालिकेवर घालू. सायन येथील ट्रॅंझिट कॅंपचे फेज-1 चे काम पूर्ण झाले आहे व फेज-2 चे काम प्रगतिपथावर आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परभणी जिल्हयात मार्च 2005 मध्ये झालेंली गारपीट

(5) * 9286 प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) परभणी जिल्हयामध्ये मार्च 2005 मध्ये मोठया प्रमाणावर गारपीट होवून त्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गारपिटीमध्ये झालेल्या नुकसानीचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणीने शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, शेतकऱ्यांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी अद्याप परभणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी वर्ग करण्यांत आला नाही, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, हा निधी केव्हापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येत आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) होय.
(2) होय.
(3) व (4) आपादग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी संबंधितांना खर्च करण्यास दिनांक 28.11.2005 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, क्या यह सच है कि परभणी जिले में दुष्काल पड़ा, दो बार गारपीट हुई और दो बार अतिवृष्टि हुई और जिसकी वजह से किसान कहीं का नहीं रहा ? मैं यह जानना चाहती हूं कि, जब शासन की स्टेण्डिंग पॉलिसी है कि आपदग्रस्तों मदद की जाए और शासन के द्वारा मदद की जाती रही है, तो इस बार मार्च में गारपीट होने के बाद आपदग्रस्तों को मदद करने के लिए 28.11.2005 को यानी देर से शासन आदेश जारी किया गया है, तो इस विलंब का क्या कारण है और आपदग्रस्तों को कब तक मदद मिलेगी, क्या शासन की ओर से तुरंत मदद दी जाएगी ? दूसरा मेरा यह प्रश्न है कि खरीफ हंगाम में पूर्णा, गंगाखेड और सोनपेट के किसानों को दुबार पेरणी हेतु मदद करने के लिए कृषि विभाग को डेढ़ करोड रुपये दिए गए थे. यह रकम जिलाधिकारी के पास पड़ी हुई है. अगर यह पैसा किसानों को देने के लिए शासन द्वारा आदेश जारी हो जाए तो किसानों को पैसा मिल सकता है. क्या शासन इस संबंध में जल्द से जल्द आदेश जारी करेगा ?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मार्चमध्ये जी गारपीट झाली, त्यात जे नुकसान झाले, ते अंदाजे 2 कोटी 66 लाखाचे आहे. याठिकाणी मदत वितरीत करण्याचे काम पुढच्या सात दिवसात सुरु करु आणि ते डिसेंबर महिन्यामध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुबार पेरणीच्या बाबतीत किंवा अतिवृष्टीच्या बाबतीत विषय मांडला आहे. त्याबद्दलची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. मी ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

उप सभापती : मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.दिलीप वळसे-पाटील(ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे सन 2004-2005 चे वार्षिक विवरणपत्र (अंदाजपत्रक) सभागृहा-समोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक विवरणपत्र (अंदाजपत्रक) सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

पृ.शी./मु.शी.: उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.शांताराम करमळकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

उप सभापती : उपविधान समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

. . . .एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, काय योगायोग आहे मला माहिती नाही. पण डिसेंबर महिन्याची सात तारीख आहे आणि मार्गशीर्ष महिन्यातील सप्तमी आहे. सन 1660 मध्ये याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला होता आणि त्या संदर्भात प्रतापगड उत्सव समितीने अनंत यातनांना तोंड देऊन त्याठिकाणी शिवप्रताप दिन सोहळा सुरु केला आहे. अशा वेळी मला आनंदही आहे आणि विषादही आहे. मला आनंद यासाठी आहे की, गेल्या वर्षापासून शासनाच्या माध्यमातून शिवप्रताप दिन सोहळा सुरु झाला आहे आणि विषाद या गोष्टीचा आहे की, प्रतापगड उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांना सकाळी 7.00 वाजल्यापासून दुपारी 2.00 वाजेपर्यंत त्याठिकाणी जाण्यास बंदी आहे. प्रतापगड उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी अनंत यातना सहन करुन सांगितले की, याला शिवप्रताप दिन म्हणावे, त्याच कार्यकर्त्यांवर ही बंदी का ? गेल्या वर्षी जो प्रकार घडला, तो अतिशय निंदनीय आहे. गेल्या वर्षी त्याठिकाणी मला बोलण्यास तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिबंध केला होता. मला असा सवाल करावयाचा आहे की, शासन याबाबतीत जर हायजॅकींग करीत असेल तर असे म्हणावे लागेल की, "मेहनत करे मुर्गा और अंडा खाये फकीर" असे असेल तर बाहेर हा मॅसेज चांगला जाणार नाही. म्हणून मला औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून ट्रेझरी बेंचला विचारावयाचे आहे की, त्याठिकाणी सामान्य नागरिकांना भवानीमातेचे, शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे दर्शन घेण्यासाठी बंदी का करीत आहात?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी सगळयांना सहभागी होण्याची संधी द्यावी, त्याचबरोबर पुन्हा प्रतापगड उत्सव समितीच्या लोकांमुळेच अफझलखानाचा उरुस बंद पडलेला आहे. सरकारने अधिकृतपणे घोषणा करावी. ते अर्ज करत नाहीत, म्हणून उरुस होत नाही. सभागृहाची सगळयांची समान भावना आहे. तेथे फक्त भवानीमातेचा आणि शिवाजी महाराजांचा जयजयकार झाला पाहिजे, अफझलखान आणि मोगल राज्याचा जयजयकार होता कामा नये. आज शिवप्रताप दिन असल्यामुळे मी मुद्दाम आपल्या माध्यमातून समोरच्या व्यक्तींना विनंती करत आहे, कृपया आपण या संबंधात आदेश द्यावा.

उपसभापती : या प्रकरणी शासनाने योग्य ती भूमिका घ्यावी.

आता सन्माननीय सदस्या नीलम गोऱ्हे यांना सांगायचे आहे की, त्यांना औचित्याच्याद्वारे जो विषय उपस्थित करायचा होता, त्याच संदर्भात विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी मागितलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्या नीलम गोऱ्हे यांचाही तो मुद्दा आहे, तोही विचारात घेतला जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कालचा 6 डिसेंबरचा दिवस हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणीचा दिवस होता. काल 6 डिसेंबरला कोकणातील रत्नागिरीजवळ नाणीज म्हणून गाव आहे. त्या नाणीज पीठाचे शंकराचार्य माननीय नरेंद्रजी महाराज हे लखनौवरुन मुंबईला यायला निघाले. परंतु लखनौच्या विमानतळावर त्यांचा ब्रह्मदंड विमानतळावरील ऑथरटीने आत नेऊ नका, अशाप्रकारची मनाई केली आणि त्यांना त्या ठिकाणी थांबविण्यात आले. त्यानंतर मुंबईमधील त्यांच्या भक्तगणांना, शिष्यांना हे समजले. ते भक्तगण मुंबईच्या विमानतळावर त्यांना घ्यायला आले होते. त्यांना ही बातमी समजली, त्यावेळेला त्यांनी शांततामय मार्गाने निदर्शने करण्याचा प्रयत्न केला. ही निदर्शने विमानतळाच्या बाहेर होत असतांना पोलिसांनी अत्यंत निघृणपणे त्यांच्यावर लाठीमार केला. रात्री टी.व्ही.वरील बातम्यामधून ती घटना मी पाहिली. निघृणपणे त्या शिष्यगणांना पोलीस मारत होते. अशा प्रकारे 300 ते 400 शिष्य हे लाठी हल्ल्यामध्ये जखमी झाले. या भक्तगणांबरोबर तेथील प्रवाशांनाही मार बसला. पोलिसांनी योग्य तऱ्हेने हे प्रकरण हाताळावयास पाहिजे होते. सभापती महोदय, 19 ऑक्टोबर रोजी अशाच प्रकारे मुंबईच्या विमानतळावर घटना घडलेली होती. ज्योतिष पीठाचे द्वारकेचे शंकराचार्य मुक्तेश्वरानंदजी सरस्वती ज्यावेळेला मुंबईच्या विमानतळावरुन परत जायला निघाले. ते

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

विमानात जाऊन बसले. त्यानंतर श्री. आर.सिंग नावाच्या कॅप्टनने सांगितले की, हा ब्रह्मदंड आपल्यला विमानातून नेता येणार नाही. त्याबरोबर पोलिसांबरोबर चर्चा झाली. त्यावेळेस त्यांना सांगण्यात आले की, हा ब्रह्मदंड लगेजमध्ये टाका. त्यावर वाद झाला. त्यानंतर एअरपोर्ट ॲथॉरटीला त्या प्रकाराबद्दल शंकराचार्यांची माफी मागावी लागली. सभापती महोदय, अशा घटना वारंवार होतात. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या संतांच्या भूमीमध्ये संतांचाच अवमान व्हायला लागला आणि प्रशासनाच्या माध्यमातून त्या संदर्भातील कोणतीच कार्यवाही होत नसेल तर हिंदूंचे जे संत आहेत, त्यांच्यावर अशाप्रकारची अवमानाची पाळी येणार आहे. म्हणून मुंबईच्या या घटनेची संपर्णपणे चौकशी केली पाहिजे. ज्या ॲथॉरटीने हा ब्रह्मदंड अडविला त्यांची चौकशी झाली पाहिजे. त्या घटनेची पुनरावृत्ती झालेली आहे. मुंबईच्या विमानतळावर जेव्हा हा ब्रह्मदंड रोखला होता, त्यावेळेला तेथील एअरपोर्ट ॲथॉरटीला माफी मागावी लागली होती. अवघ्या दोन महिन्यामध्ये पुन्हा अशाप्रकारची घटना घडलेली आहे. या संदर्भातील चौकशी करुन असे प्रकार पुन्हा घडणार नाहीत, याबद्दल शासनाला निर्देश द्यावेत, अशाप्रकारची मी मागणी करतो.

उपसभापती : या प्रकरणाबद्दल बोलतांना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी संत महात्म्यांबद्दल आदर व्यक्त केला. अशाच प्रकारचा आदर निश्चितपणे मलासुध्दा आहे. मला मात्र एक गोष्ट निश्चितपणे् सांगावीशी वाटते की, त्या ठिकाणी जे काय झाले, त्या दोन्ही गोष्टींची निश्चितपणे चौकशी करु. मला स्वत:ला काही अनुभव आहे. तो असा की, आपण जेव्हा विमान प्रवास करतो, त्यावेळेला एअरपोर्ट आथॉरटीचे नियम आहेत, त्या नियमांचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक आहे-मग प्रवासी कोणताही असो, सामान्य असो किंवा व्ही.आय.पी. असो.

यानंतर कु.थोरात.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

उपसभापती .....

त्यामुळे मला असे वाटते की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी माहिती दिली त्याची चौकशी करणे येथपर्यंत ठीक आहे. ते मी मान्य करतो. माझा स्वत:चा अनुभव असा आहे की, आत्ताचे ऊर्जामंत्री एकदा विमानतळावर विमानात बसण्यासाठी आलेले असतांना त्यांच्या बॅगेमध्ये कुठल्याही प्रकारचे रिव्हाल्व्हर नव्हते. परंतु त्यांच्याकडे रिव्हाल्व्हरची काडतूसे होती. ती काडतूसे एअरपोर्ट ॲथॉरिटीने काढून घेतली होती. त्या वेळी देखील त्यांनी कसल्याही प्रकारचा आक्षेप घेतला नव्हता. येथे दोन प्रकार झालेले आहेत. एक म्हणजे त्या ठिकाणी नरेंद्र महाराजांचा ब्रहमदंड काढून ठेवायला सांगितला आणि तो घेऊन जाण्यास त्यांना मनाई केली. दुस-या बाजूने विमानतळावर भक्तांनी निदर्शने केली म्हणून त्याठिकाणी लाठीमार झाला. या ठिकाणी दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. विमानतळावर भक्तांवर लाठीमार होऊ नये याच्या बाबतीत मी विरोधीपक्ष नेत्यांशी पूर्णपणे सहमत आहे. परंतु त्यामुळे विमानतळावर अनेक नागरिकांची गैरसोय
झाली. शासन म्हणून या ठिकाणी पोलिसांनी जी भूमिका बजावली असेल ती योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार मला नाही. तो अधिकार शासनाला आहे. त्यामुळे मला असे वाटते की, यासंदर्भात एअरपोर्ट ॲथॉरिटीचे निश्चितपणे काय नियम आहेत हे देखील शासनाने निश्चितपणे तपासून बघावेत. आणि एअरपोर्ट ॲथॉरिटी त्यांचे कर्तव्य बजावत असतांना जर त्यांच्याकडून काही चूक झाली असेल तर त्यांना शासन व्हायला पाहिजे पण कर्तव्य बजावत असतांना जर कां तसे झाले नसेल तर त्यांना आपण काही शिक्षा केली असा अन्याय शासनाकडून होता कामा नये. या दोन्ही गोष्टी नीट तपासून पहाव्यात.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधीच एअर पोर्ट ॲथॉरिटीला दि .19.10.2005 रोजी माफी मागावी लागली होती. त्यावेळी देखील अशाच प्रकारे ब्रहमदंड अडविण्यात आला होता. तेव्हा ते शंकराचार्य अडून बसले. त्यानंतर त्याची चौकशी झाली. त्यावेळेला त्या ॲथॉरिटीला माफी मागावी लागली होती. ही दोन महिन्यापूर्वी घडलेली घटना आहे.

उपसभापती :तपासून बघा असे मी सांगितलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी स्वत: काल चॅनल 7 वर हा प्रसंग बघितला, तो अस्वस्थ करणारा होता. हरियाणामध्ये हिरोहोंडाच्या कामगारावर लाठीचार्ज करण्यात आला होता, त्या घटनेची काल पुन्हा आठवण झाली. मी तो प्रसंग टी.व्ही.वर बघत होतो. ही फार गंभीर घटना आहे. एका महिला आडवी पडली आणि लाठीचार्ज करणारा जवान तिच्या अंगावर जाऊन पडला असे दृश्य मी काल चॅनेलवर बघितले. त्यां पोलिसांनी काही पत्रकारांना मारहाण केली. एकंदरीतच तो लाठीचार्ज असा होता की, तेथे जे प्रवाशी उभे असतील तेथे जाऊन त्यांना दोन-तीन लाठया मारण्यात आल्या. खरे म्हणजे याबाबतीत आपण सांगितली ती गोष्ट बरोबर आहे. स्फोटक पदार्थ असेल, बारुद असेल, पेट्रोल असेल, शस्त्र असेल. बंदूक असेल, ब्लेड असेल, कात्री असेल तर ते अडविले पाहिजे. पण हा ब्रहमदंड आहे. हा शस्त्रामध्ये मोडत नाही आणि याबाबतीत ऑलरेडी एअरपोर्ट ॲथॉरिटीने दोन महिन्यापूर्वी क्षमा मागितलेली आहे. ही वस्तुस्थिती असतांना तो ब्रहमदंड अडविल्यानंतर आणि त्यांनी याबाबतीत वारंवार सांगितल्यानंतरही त्यांना त्रास दिला गेला ही गोष्ट स्वागतार्ह नाही. त्यांनी जुना रेफरन्स सांगितला होता. आज सकाळी महाराजांच्या शिष्यमंडळींचे मला फोन आले त्यावेळी मी त्यांच्याकडून माहिती घेतली की, दोन महिन्यापूर्वी अशी घटना घडली होती, त्यासंबंधात तुम्ही सांगितले नाही काय? त्यांनी दोन महिन्यापूर्वीची घटना सांगितली परंतु त्यांच्याशी एकंदरीतच वागणूक ही अतिशय असभ्य प्रकारची
झालेली आहे.त्यामुळे आता मी या ठिकाणी बोलायला उभा राहिल्यानंतर देखील महाराजांचे हजारो शिष्यगण एअरपोर्टवर गोळा झालेले आहेत. वातावरण स्फोटक आहे. ठिकठिक्राणी याचे पडसाद उमटत आहेत.मला वाटते यासंदर्भात जसे शिख धर्मामध्ये त्यांचे पंथप्रमुख जातात तेव्हा त्यांचे कृपाण असते. या कृपाणाचा मधल्या काळात काही प्रश्न निर्माण ----
झाला होता.तेव्हा सरकारने कृपाणाच्या संदर्भातील क्लॅरिफिकेशन देऊन कृपाणाच्या बाबतीत धार्मिक सॅन्टीटी लक्षात घेता कृपाण घेऊन जाण्यास परवानगी दिलेली होती. मला असे वाटते की, आपण म्हटले ते बरोबर आहे.

यानंतर श्री. खर्चे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. नितीन गडकरी.....

महोदय, मी आता सभागृहात येण्यासाठी निघालो त्यावेळी मला गेटवर गाडीची तपासणी करण्यासाठी थांबविले असता मी ऑब्जेक्शन घेतले नाही. कारण ज्यावेळी सुरक्षेचा प्रश्न येतो त्यावेळी आपण देखील सहकार्य केले पाहिजे या भूमिकेशी मी सहमत आहे. पण दोन महिन्यापूर्वी मुंबई विमानतळावर जी घटना घडली होती त्या घटनेनंतर विमानपत्तन प्राधिकरणाला कळले की या ब्रह्मदंडामुळे कुठलीही बाधा नाही त्यानंतर त्यांनी तसा निर्णय घेतला व माफी मागितली होती. आता नुकत्याच मिळालेल्या बातमीवरुन या कालच्या घटनेचे पडसाद म्हणून संभाजीनगरला गोंधळ झाला. अशा प्रकारे राज्यात जर या घटनेचे तीव्र पडसाद उमटू लागले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या दोन्ही ठिकाणी झालेल्या गडबडीचा परिणाम म्हणून आता मुंबई येथील विमानतळावरील वातावरण सुध्दा खराब आहे म्हणून माननीय गृहमंत्र्यांना या प्रकरणाची माहिती तातडीने देण्यात यावी, जेणेकरुन राज्यात इतरत्र परिस्थिती बिघडणार नाही यासंबंधी दक्षता घेता येईल, व याबाबत सभागृहाला माहिती मिळावी म्हणून त्यांनी निवेदन करावे, असे आदेश आपण द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. उल्हास पवार : हा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तसेच माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. दोन महिन्यापूर्वी जी घटना मुंबईत घडली त्या घटनेची मला माहिती आहे. त्यावेळी जगत्गुरु श्री. शंकराचार्य व द्वारकापीठाचे स्वामी स्वरुपानंद सरस्वती हे माझ्याशी बोलले होते. त्यासंदर्भात मी स्वत: केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, स्वामी शंकराचार्यांबद्दल मलाही आदर आहे परंतु विमानतळ प्राधिकरणाचे काही नियम आहेत, त्यांचे उल्लंघन करुन काही वेगळे आदेश आम्ही देऊ शकत नाही असेही ते मला फोनवर बोलले होते. जी घटना त्या ठिकाणी घडली होती त्याबद्दल ऑथॉरिटीने माफी मागितली होती. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, मी स्वत: सभागृहात बैठकीसाठी येत असतांना विधानभवनाच्या गेटवर तपासणीसाठी गाडी थांबवावी लागली व त्याला ऑब्जेक्शन घेतले नाही, कारण हा सुरक्षेचा प्रश्न आहे त्यामुळे अशा तपासणी करण्यात काहीच वावगे नाही. पण कालच विधानसभेत जो प्रसंग निर्माण झाला होता तशा प्रकारचे प्रसंग निर्माण होऊ नयेत म्हणून सिक्युरिटीच्या संदर्भात आपण सर्वांनीच साथ दिली पाहिजे, जेणेकरुन असे प्रसंग होणार नाहीत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

तसेच शेवटी विमानतळाची सिक्युरिटी देखील आपल्याला लक्षात घेणे आवश्यक आहे. लाल दिव्याची गाडी लावून लोकसभेमध्ये अतिरेकी घुसतात ही घटना आपणा सर्वांनाच माहिती आहे, म्हणून अशा घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने सहकार्य करणे आवश्यक आहे. मी माननीय विरोधी पक्षनेते, माननीय श्री. गडकरी साहेब तसेच आपण जी भावना व्यक्त केली त्या भावनेशी सहमत आहे. शेवटी केंद्र शासनाच्या सिक्युरिटीशी राज्य शासनाचा संबंध आहे की काय हे देखील पहावे लागेल, असे मला वाटते.

उपसभापती : या दोन्ही घटनांबाबत संबंधितांनी चौकशी करावी असे मी सांगितलेच आहे. सन्मानीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सुचविले की या संपूर्ण प्रकाराची संबंधित विभागाच्या वतीने माहिती घेऊन चौकशी करावी व लवकरात लवकर सभागृहात निवेदन करावे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था पुढेही धोक्यात येऊ नये याकडेही लक्ष द्यावे आा प्रकारची सूचना मी गृहमंत्र्यांना देत आहे.

डॉ. नीलम गो-हे : औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मला दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. काल 6 डिसेंबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन होता आणि लाखो लोक चैत्यभूमीवरती गेले होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्रीमती निलम गो-हे ....

थोर विचारवंतांचा आदरसत्कार करण्यासाठी शासनाच्या काही प्रथा, परंपरा आहेत. दर वर्षाप्रमाणे काल मुंबईतील चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. चैत्यभूमीच्या कार्यक्रमाला मुंबईच्या पालकमंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते परंतु मुंबईचे पालकमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नव्हते. सामाजिक न्यायमंत्री, इतर मंत्री तसेच काही आमदार या कार्यक्रमाला उपस्थित होते. शासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली व्यक्त करण्यासाठी मुंबईच्या पालकमंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते परंतु ते उपस्थित नव्हते म्हणून चैत्यभूमीवर जमलेल्या लोकांनी यासंदर्भात नाराजी व्यक्त केलेली आहे. 6 डिसेंबर रोजी मुंबईच्या चैत्यभूमीवर हजारो लोक जमत असतात. काल सांताक्रुझ एअरपोर्टवर नरेंद्र स्वामींच्या संदर्भात जो प्रकार घडला तसेच काल ट्रेनमध्ये एका महिलेवर बलात्काराचा प्रयत्न देखील झालेला आहे. त्यामुळे यातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण एका परीने जातीच्या पलीकडे पोहचण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कार्यक्रमाला उपनगराचे पालक मंत्री श्री. हंडोरे साहेब उपस्थित होते. मा. मंत्रीमहोदय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर हे मुंबईचे पालकमंत्री आहेत. मुंबईत जेव्हा 26 सप्टेंबर रोजी अतिवृष्टी झाली त्यावेळेस सुध्दा मुंबईचे पालक मंत्री मुंबईमध्ये हजर नव्हते. त्यावेळी मुंबईचे पालकमंत्री बेपत्ता होते त्यामुळे "आपण यांना कोठे पाहिले आहे का" असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे पालकमंत्र्यांनी चैत्यभूमीवर आणि इतरत्र उपस्थित राहिले पाहिजे यासंदर्भात मुंबईच्या पालकमंत्र्यांना समज द्यावी असे मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, परवा जे.जे.हॉस्पीटलमध्ये जो प्रकार घडलेला आहे त्याच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे..

तालिका सभापती : आता आपण नियम 93 अन्वये सूचना घेणार आहोत. आपण जे.जे. हॉस्पीटलच्या संदर्भात नियम 93 अन्वये निवेदन दिलेले आहे त्यामुळे आता आपल्याला औचित्याच्या मुद्यावर बोलाता येणार नाही. जर आपण औचित्यांच्या मुद्यावर बोलणार असाल तर 93 चे निवेदन येणार नाही. यासंदर्भात निवेदन येणारच आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, नियम 93 अन्वये जी सूचना दिलेली आहे ती दोन दिवसानंतर चर्चेला येणार आहे. त्यावर प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळेलच असे सांगता येणार नाही त्यामुळे मला या मुद्याच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्याची संधी द्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. मी आपल्याला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देते परंतु आपण केवळ मुद्दाच उपस्थित करावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, जे.जे. हॉस्पीटलमध्ये जी घटना घडली आहे ती वैद्यकीय क्षेत्राला लांच्छनास्पद आहे. कारण बाहेरुन येणा-या परप्रांतीय मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी मराठी वैद्यकीय विद्यार्थ्यांना तीनदा मारल्यानंतर त्या ठिकाणी हिंदी भाषिक अधिकारी येऊन त्यामध्ये हस्तक्षेप करुन त्यांनी घटनेचा क्रम बदलला व त्यामुळे या मराठी विद्यार्थ्यांना कोठडी मिळाली यासंदर्भात कोर्टाने निर्णय दिला आहे की, 14 दिवसापर्यंत या मराठी मुलांनी पोलीस स्टेशनवर रोज हजेरी लावली पाहिजे. मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनवर हजेरी लावणे ही लांच्छनास्पद गोष्ट आहे. जसे एखाद्या अपराध्याला पोलीस स्टेशनवर हजेरी लावावी लागते तशीच हजेरी मेडिकलच्या मुलांना पोलीस स्टेशनवर जाऊन लावावी लागत आहे. कोर्टाच्या निर्णयावर भाष्य करता येत नाही हे मला माहिती आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

तरी देखील मला माझ्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. हॉस्पिटलचे डीन आणि स्टाफ यांनी अधिकाऱ्यांना भेटून सांगितले की, अशाप्रकारचा निर्णय देणे चुकीचे आहे. मराठी डॉक्टरांना तीन वेळा मारहाण करण्यात आलेली आहे. त्यानंतर मग घोषणाबाजी आणि फलक लावण्याचे काम झालेले आहे. हॉस्पिटलच्या आवारात 'जय बिहार' असा फलक लावण्यात आला. एवढेच नव्हे तर डीनच्या नावाने अश्लील घोषणा लिहिल्या गेल्या आहेत. मेडिकल कॉलेजला ही शोभणारी गोष्ट नाही. तेव्हा यामध्ये आपण हस्तक्षेप करून मुख्य अधिकारी व संबंधित मंत्र्यांना बोलावून एक बैठक घेऊन त्यातून मार्ग काढावा अशी मी विनंती करीत आहे. पर-राज्यातील अनेक डॉक्टर्स एम.बी.बी.एस., एम.एस.चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी मुंबईत येतात. तेव्हा नेहमी असे प्रकार घडतात. आज तेथील स्टाफ हा प्रचंड दबावाखाली आहे. तेव्हा यात कायमस्वरूपी तडजोड होण्यासाठी काही तरी मार्ग काढावा म्हणून मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

तालिका सभापती : या प्रकरणी कोर्टाने निर्णय दिलेला असल्यामुळे त्यामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही. तरी देखील तेथे जो प्रकार झाला आहे, त्याची चौकशी करून शासनाने यामध्ये लक्ष घालावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, मी मुंबईच्या पालकमंत्र्यांसंबंधीचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी शासनाकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर आलेले नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याची शासनाने नोंद घेऊन त्यावर निर्णय द्यावा.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, श्रीकांत जोशी व इतर यांनी "चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार शासनाने दिनांक 21.11.2005 रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामुळे हजारो कायम कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर आलेली गदा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर यांनी "दयानंद कॉलेज,मुंबई, सी.एच.एम.कॉलेज, उल्हासनगर, इत्यादी महाविद्यालयांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीररित्या शुल्क वसूल केल्यामुळे विद्यार्थी संघटनांनी सुरू केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांनी "शिवडी, मुंबई येथील म्हाडाच्या ज्ञानेश्वर नगर बहुमजली संक्रमण शिबिराच्या इमारतीची अत्यंत विस्कळीत व धोकादायक झालेली परिस्थिती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपला निर्णय देण्यापूर्वी आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे अशी मी आपल्याला विनंती करीत आहे. शिवडी येथील म्हाडाच्या इमारतीत राहणाऱ्या लोकांवर आज रस्त्यावर राहण्याची पाळी आली आहे. लोकांच्या डोक्यावर, स्वयंपाक घरात वरच्या मजल्यावरील शौचालयाचे पाणी येत आहे. यासंबंधीचे फोटो देखील आता माझ्याकडे उपलब्ध आहेत. सहा महिन्यापूर्वीच ज्ञानेश्वर नगर, शिवडी, मुंबई येथे म्हाडाने इमारत बांधलेली आहे. तेव्हा या इमारतीला कोणत्या अधिकाऱ्याने एन.ओ.सी.दिलेली आहे. आज या इमारतीतील रहिवाशी रस्त्यावर आले असल्यामुळे यासंबंधी शासनास सोमवारी निवेदन करण्यास सांगावे अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिली आहे तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, हा विषय गंभीर असल्यामुळे शासनाने सोमवारी निवेदन करावे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती पुढे सुरू.....

यानंतरची माननीय सदस्य सर्वश्री डॉ.दीपक सावंत व इतर सन्माननीय सदस्यांनी "दिनांक 3 डिसेंबर 2005 रोजी ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई येथे किरकोळ कारणावरून परप्रांतीय डॉक्टरांच्या जमावाने हॉस्टेल सेक्रेटरी तसेच अन्य विद्यार्थ्यांना केलेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व इतर सन्माननीय सदस्यांनी "विना अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील शासकीय कोटयातील शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागातर्फे अद्यापही शैक्षणिक शुल्क न मिळाल्याने त्यांच्यावर परीक्षेस मुकण्याची आलेली वेळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती.....

माननीय सदस्य श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी "कोल्हापूर जिल्ह्यातील किणी नाक्यावरील पथकर बंद करावा अशी जनतेची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " दिनांक 5.12.2005 रोजी इगतपुरी ते कल्याण दरम्यान "पवन एक्सप्रेस"मध्ये गुंड लोकांनी मध्य प्रदेशमधील महिला प्रवाशाला चाकुचा धाक दाखवून केलेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचना दालनात नाकारण्यात आलेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील बी.एस.एन.एल.चा मनोरा नक्षलवाद्यांनी उडविण्याचा केलेला प्रयत्न.

मु.शी.: गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील बी.एस.एन.एल.चा मनोरा नक्षलवाद्यांनी उडविण्याचा केलेला प्रयत्न संबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान, श्री.सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी,प्रतापराव सोनवणे, सागर मेघे, दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया, मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री विलास अवचट, अनिल परब, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री सुरेश जेथलिया, गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील बेलनवडी गावात दिनांक 15 नोव्हेंबर, 2005 रोजी पहाटे नक्षलवाद्यांनी स्फोट घडवून बी.एस.एन.एल. चा मनोरा उडविण्याचा प्रयत्न करणे, नक्षलवाद्यांनी शरण यावे यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या धोरणाच्या निषेधार्थ नक्षलवाद्यांनी राज्याच्या सीमावर्ती भागात आपल्या कारवाया तीव्र करणे, लोकांमध्ये दहशत पसरविणे, पोलिसांनी नक्षलवाद्यांच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या कामात यश आल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात गडचिरोली, चंद्रपूर या नक्षलप्रभावीत जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या लहानमोठ्या कारवाया सुरुच असणे, मा.मुख्यमंत्री महोदयांना देखील नक्षलवाद्यांनी जीवे मारण्याची धमकी देणे, त्यामुळे मा.मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या बंगल्यावरील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात येणे, त्यामुळे राज्याच्या पोलीस महासंचालकांनी पोलीस यंत्रणेला अतिदक्षतेचा इशारा देणे. या परिसरात नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया याकडे पोलिसांचे होणारे दुर्लक्ष, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेले भितीचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदया, लक्षवेधीच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, कारवाया कमी होऊ लागल्या आहेत. परंतु तशी परिस्थिती नाही. नेपाळ पासून तामिळनाडू राज्यापर्यंत 13-14 राज्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या कारवाया सुरु आहेत. विशेषत: आपल्या राज्यात या कारवायांना अधिक गती मिळालेली आहे असे लक्षात येते. माननीय मुख्यमंत्र्यांवर देखील हल्ला होणार असे वर्तमानपत्रात वाचनात आले. आपण निवेदनामध्ये म्हटले आहे की, जे लोक सरंडर होतील त्यांना मदत दिली जाते, रिवॉर्ड दिला जातो. मला येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की, अद्यापपर्यंत सरंडर झालेल्या व्यक्तींना कोणतीही मदत मिळाली नाही. तो ज्या गटात काम करीत होता त्यांचेकडून आणि सरकारकडून अशी दोन्हीकडून त्याची चेष्टा होत आहे. मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते की, मागील दोन वर्षापूर्वी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे हे तेथील गावामध्ये गेलेले असताना तेथील गावक-यांनी जर नक्षलवाद्यावर बंदी घातली तर सरकार त्यांना पाच लाख रुपयांचे बक्षिस देईल असे जाहीर केले होते. परंतु अद्याप त्या गावाला पाच लाख रुपयांचे बक्षिस देण्यात आलेले नाही. एका बाजुला सरकारने, पोलीस अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना प्रोत्साहन द्यावयाचे आणि दुसऱ्या बाजुला त्यांना मदत द्यावयाची नाही ही गोष्ट योग्य नाही. सभापती महोदया, मध्यंतरी शासनाने एक जी.आर.काढला होता की, नवीन पोलीस अधिकाऱ्यांची भरती झाल्यानंतर त्याठिकाणी पोलीस अधिकाऱ्याची तीन वर्षासाठी बदली केली जाईल. त्यानंतर त्या अधिकाऱ्याला पाहिजे तेथे बदली देण्यात येईल. परंतु त्या अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर तेथे दुसरा कोणताही अधिकारी जाण्यास तयार नसतो. अशाप्रकारे जी.आर.चे पालन होत नाही. त्याठिकाणी असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये फक्तदोन-तीन वाहने आहेत. या वाहनांमध्ये आपण वाढ करणार आहात का ? त्याठिकाणी कारवाई करताना एखादा पोलीस कर्मचारी वा अधिकारी जखमी झाल्यास त्याला जंगलातून बाहेर काढून हॉस्पीटलमध्ये नेण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात येणार आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विचारले की, किती लोकांनी आत्मसमर्पण केले व ज्यांनी आत्मसमर्पण केले त्यांना भरपाई देण्यात आली नाही.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे....

68 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलेले आहे. त्यापैकी, 21 व्यक्तींची नक्षलवादी ठरविण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. समर्पण केलेल्या व्यक्ती खरोखरच नक्षलवादी आहेत की नाही हे ठरविण्याबाबत जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची एक कमिट आहे. आत्मसमर्पण करणाऱ्यांपैकी जे खरोखरच नक्षलवादी असल्याचे निदर्शनास आले त्यांना प्रत्येकी 5 लाख रुपये देण्याचे आदेश काढले आहेत आणि लवकरात लवकर त्याचे वाटप करण्यात येईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, गडचिरोली जिल्हयात नक्षलवादी कारवाया वाढलेल्या आहेत. यासंदर्भात एक आठवडयापूर्वी दूरदर्शनच्या सहयाद्री वाहिनीवर गडचिरोली जिल्हयाच्या एस.पी. ची मुलाखत दाखविण्यात आली. त्यांनी सांगितले की, विकास समप्रमाणात न होणे आणि नक्षलग्रस्त भागात मोठया प्रमाणावर भारनियमन होत असल्यामुळे नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढत आहेत. नक्षलग्रस्त भागात आठ तासांपेक्षा जास्त भारनियमन होत आहे. त्यामुळे हे भारनियमन कमी करण्यात यावे असे त्यांनी सांगितले. एस.पी. नी दिलेली मुलाखत शासनाच्या वतीने दिलेली आहे हे खरे आहे काय ? तसेच त्या ठिकाणी विकासाचा अभाव असल्यामुळे या कारवाया वाढतात हे खरे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, शासनाकडून आदेश अगोदरच दिले आहेत की, नक्षलवाद्यांच्या कारवाया ज्या ठिकाणी सुरु आहेत त्या ठिकाणी भारनियमन करण्यात येऊ नये. त्यामुळे जो भाग खरोखरच नक्षलग्रस्त आहे त्या ठिकाणी भारनियमन केले जात नाही.

श्री.अनंत तरे : परंतु मुलाखतीमध्ये स्वत: एस.पी. नी सांगितले आहे की, नक्षलग्रस्त भागामध्ये दररोज आठ-आठ तास भारनियमन केले जाते.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांना मी सांगू इच्छितो की, भारनियमन होऊ नये म्हणून, जो भाग नक्षलग्रस्त नाही त्या ठिकाणी सुध्दा लोकांकडून मागणी होते की, आमचा भाग नक्षलग्रस्त आहे आमच्याकडे भारनियमन करु नये. त्यामुळे जो भाग मुळातच नक्षलग्रस्त नाही त्या ठिकाणी भारनियमन केले जाते. परंतु जो भाग नक्षलग्रस्त आहे त्या ठिकाणी मात्र भारनियमन केले जात नाही. परंतु तरीही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार जर नक्षलग्रस्त भागामध्ये आठ-आठ तास भारनियमन होत असेल तर त्या ठिकाणी पुन्हा आदेश देण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे जे सांगत आहेत ते बरोबर आहे. गडचिरोली जिल्हयाच्या एस.पी. नी मुलाखतीमध्ये सांगितले आहे की, नक्षलग्रस्त भागामध्ये आठ-आठ तासांचे भारनियमन केले जात आहे. गडचिरोली जिल्हयातील जो भाग नक्षलग्रस्त आहे त्या भागात भारनियमन करावयाचे नाही असा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. असे असताना आठ-आठ तास भारनियमन सुरु करण्यात आलेले आहे. हे मान्य आहे की, एखादा भाग नक्षलग्रस्त नसताना सुध्दा नागरिक आमचा भाग नक्षलग्रस्त आहे म्हणून आमच्याकडे भारनियमन करु नका अशी मागणी करतात. परंतु आजही आपण जो भाग नक्षलग्रस्त म्हणून जाहीर केला आहे त्या भागामध्ये मोठया प्रमाणावर भारनियमन सुरु आहे असे जे एस.पी.नी सांगितले ते खरे आहे. अशी परिस्थिती असेल तर तुमच्या सर्क्युलरला काय अर्थ राहतो ? या दृष्टिकोनातून आपण काय कार्यवाही करणार आहात ? त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, जो भाग खरोखरच नक्षलग्रस्त आहे त्या ठिकाणी आपण भारनियमन करु नका.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, या ठिकाणी नक्षलग्रस्त भागात होत असलेल्या भारनियमनाबाबत जी माहिती देण्यात आली आहे ती तपासून घेण्यात येईल. जर नक्षलग्रस्त भागात खरोखरच भारनियमन होत असेल तर त्याबाबत सूचना देण्यात येतील. त्या भागात कमी प्रमाणात विकास झाल्यामुळे आणि अशिक्षित भाग असल्यामुळे नक्षलवादी चळवळ फोफावली म्हणून केंद्र सरकारकडून जो दोन कोटी रुपयांचा निधी आला तो निधी नक्षलग्रस्त भागासाठी उपलब्ध करुन दिला आहे. राज्य सरकारकडून चार कोटी रुपये या अधिवेशनात मंजूर करुन घेऊन ते सुध्दा त्या ठिकाणी देण्यात येतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नागपूर विणकर सहकारी सुत गिरणीच्या कामगारांवर आलेले उपासमारीचे संकट.

मु.शी.: नागपूर विणकर सहकारी सुत गिरणीच्या कामगारांवर आलेले उपासमारीचे संकट यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदिश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर विणकर सहकारी सुत गिरणी मर्या.च्या नागपूर येथील कामगारांवर आलेले उपासमारीचे संकट, उक्त गिरणीची जमीन विकूनही आलेल्या रकमेतून गिरणीच्या 275 कामगारांना आजपावेतो त्यांच्या हक्काचे देयके न देणे, या संदर्भात गोळीबार चौक, नागपूर येथे गिरणी कामगारांनी आमरण उपोषण केले असता तत्कालीन वस्त्रोद्योग मंत्री यांनी कामगारांना वेतन, बोनस व इतर देयके दोन महिन्यांच्या आत देण्याचे दिलेले आश्वासन, असे असतांना सदरहु कामगारांना कोणतीही रक्कम न दिल्याने कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत कामगारांनी हिवाळी अधिवेशनामध्ये नागपूर विधानभवनासमोर आत्मदहनाची दिलेली नोटीस, या सूतगिरणी कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाला आलेले अपयश, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्मानीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

:: निवेदनानंतर ::

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, नागपूर विणकर सहकारी सुत गिरणी दिनांक 8 सप्टेंबर, 1996 पासून बंद आहे. गिरणीचा विद्युत पुरवठा बंद झाल्यामुळे ती बंद झाली. कामगारांना आपल्या मागण्यांसाठी उपोषण आणि नंतर आमरण उपोषणास बसावे लागले. गोळीबार चौकामध्ये मा.मंत्रिमहोदयांनी ते उपोषण सोडविले हे मी वृत्तपत्रामध्ये वाचले. यासंदर्भात सरकारने वेळोवेळी आश्वासन दिले. 850 कामगारांचा एक गट सरकारच्या निर्णयाच्या विरोधात इंडस्ट्रीअल कोर्टात गेला. त्यांनी निर्णय दिला की, 2000 सालापर्यंत 50 टक्के हिशेब त्यांना देण्यात यावा. त्यानंतर सरकार हायकोर्टामध्ये गेले. हायकोर्टाने सांगितले की, इंडस्ट्रीअल कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार 50 टक्के हिशेब द्या आणि त्यानंतर सरकारची केस हिअरिंगला घेऊ.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .

सभापती महोदया, आता ही केस हायकोर्टात गेलेली असून. त्यामध्ये एक अडचण निर्माण झालेली आहे. 250 लोक इन्डस्ट्रिअल कोर्टात गेलेले नाहीत त्यांनी त्या संदर्भात अर्ज केलेला नव्हता. इन्डस्ट्रिअल कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यात यावी असा आदेश हायकोर्टाने दिलेला आहे.त्यानुसार 850 कामगारांना 50 टक्के रक्कमेचा फायदा मिळालेला आहे परंतु 250 कामगार या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची आणि आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. या बाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना एक विनंती करावयाची आहे की, 850 कामगारांना इन्डस्ट्रिअल कोर्टाच्या आणि हायकोर्टाच्या निर्णयाचा फायदा मिळणार आहे परंतु या 250 लोकांना मात्र तो फायदा मिळणार नाही. तेव्हा या 250 कामगारांनी अंडरटेकींग लिहून दिले की, 850 कामगारांच्या बाबतीत जो काही निर्णय होईल तो निर्णय आम्हालासुध्दा लागू राहील. तो निणय आम्ही मान्य करु अशा प्रकारे त्यांनी लिहून दिले की त्यांना त्याप्रमाणे फायदा मिळू शकेल. मात्र माननीय मंत्रिमहोदयांनी जर त्याप्रमाणे केले नाही तर 250 लोकांना हायकोर्टात जावे लागेल आणि हे लोक अत्यंत गरीब आहेत वकील लावण्याकरतासुध्दा त्यांच्याकडे पैसे नाहीत . या दोन्ही कामगारांमध्ये डिस्क्रमिनेशन होत आहे.तेव्हा हायकोर्ट जो काही निर्णय देईल तो आम्हाला मान्य राहील असे त्यांनी अंडरटेकीग लिहून दिले तर 850 कामगारांना जो 50 टक्के रक्कमेचा लाभ दिलेला आहे तो लाभ या कामगारांना मिळेल. तेव्हा 50 टक्के रक्कमेचा जो काही हिशोब आहे तो हिशोब करुन आपण या कामगारांना हा फायदा देणार आहात काय ?

श्री सतीश चतुर्वेदी : माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य श्री नितीन गडकरी साहब ने जो प्रश्न पूछा, उस संबंध में मैं कहना चाहूंगा कि यह बात सही है कि औद्योगिक न्यायालय के आदेशानुसार 850 लोगों को 50 प्रतिशत राशि दी है. उच्च न्यायलय ने औद्योगिक न्यायालय के आदेश का पालन करने का आदेश शासन को दिया है. वहां पर 8 करोड़ रुपए की राशि का वितरण हो गया है. यहां पर 275 लोगों का प्रश्न माननीय सदस्य ने पूछा है. यह बात सही है कि वे लोग कोर्ट में नहीं गए. आज भी सरकार की यह भूमिका है कि सन् 1996 से जिस दिन से यह गिरणी लिक्वीडेशन में गई है उस समय तक पेमेंट करना चाहिए. लिक्वीडेशन की तारीख तक पेमेंट करने की जिम्मेदारी शासन की है. उस हिसाब से 850 वर्कर्स को वहां पर पेमेंट दिया

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गया है. माननीय सदस्य ने यहां पर 275 लोगों के साथ डिसक्रीमीनेशन होने की बात कही है. वे लोग कोर्ट में नहीं जा सके. हमें माननीय सदस्य श्री नितीन गडकरी साहब की सूचना मान्य करने में कोई तकलीफ नहीं है, यदि वे कामगार यह अंडरटेकिंग देते हैं कि जो निर्णय 850 कामगारों के बारे में होगा वही डिसीजन उन्हें मान्य होगा तो माननीय सदस्य की सूचना को हम मान्य करते हैं. ये कामगार गरीब हैं, यह बात सब लोग जानते हैं. इसलिए उनके साथ जो डिसक्रीमीनेशन हो रहा है उसको खत्म करने के लिए हम इन 275 कामगारों को 50 प्रतिशत राशि देने के लिए तैयार हैं.

श्री नितीन गडकरी : कामगारों के हित में हमारी सूचना मान्य करने के लिए मैं माननीय मंत्री महोदय को धन्यवाद देता हूं. लेकिन एक ही प्रार्थना है कि हम कोशिश करेंगे कि 4 - 5 दिन के अंदर ही ये कामगार अंडरटेकिंग दे दें और उम्मीद करते हैं कि साधारणत: 15 दिन के अंदर उन कामगारों को यह राशि मिल जायगी. क्योकि यह विषय यदि फायनेंस डिपार्टमेंट के पास गया तो फिर से उन कामगारों को तकलीफ होगी. आप यदि हमें यहां पर इस संबंध में आश्वासन देंगे तो वह बात सभागृह के रिकार्ड पर रहेगी.

श्री सतीश चतुर्वेदी : माननीय सभापति महोदय, एक निश्चित कालावधि के अंदर बांधना यहां पर ठीक नहीं है. पुरानी जमीन बेचकर जो राशि बची है वह राशि हम इन कामगारों को वितरित कर देंगे. मेरे हिसाब से उस राशि में काम हो जाएगा. इसके अलावा हम 21 एकड़ जमीन और बेच रह हैं, इसलिए फायनेंस डिपार्टमेंट में जाने का सवाल ही नहीं है. यदि उन लोगों को पैसा देना ही है तो फिर उस काम में समय लगने का सवाल ही नहीं है.

श्री नितीन गडकरी : माननीय सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय को बहुत बहुत धन्यवाद.

(इसके बाद श्री सुंबरे..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नहीं

पृ.शी. : गणेशपेठ,नागपूर पोलिसांनी बनावट नोटा छापणाऱ्या टोळीस केलेली अटक.

मु.शी. : गणेशपेठ,नागपूर पोलिसांनी बनावट नोटा छापणाऱ्या टोळीस केलेली अटक याबाबत सर्वश्री रमेश निकोसे, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.शरद पाटील, सर्वश्री जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, अनंत तरे, संजय दत्त यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो. --

" गणेशपेठ, नागपूर पोलिसांनी नोव्हेंबर 2005 च्या शेवटच्या आठवड्यात बनावट नोटा छापून चलनात आणणाऱ्या आंतरराज्यीय टोळीस रंगेहात पकडण्याची घडलेली घटना, सदर टोळीतील साथीदारांनी 25 हजारांच्या बनावट नोटा धाड सत्रादरम्यान जाळून टाकणे, पकडलेल्या गुन्हेगारांनी राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये बनावट नोटा चलनामध्ये पुरविण्याचे रॅकेट असण्याचे सुतोवाच करणे, त्यामुळे बेकायदेशीर चलन व्यवस्था असण्याचा धक्कादायक प्रकार पोलिसांमार्फत उघडकीस येणे, या टोळीने चलनात आणलेल्या बनावट नोटांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला निर्माण झालेला धोका, राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्याच्या शहरी भागात बनावट नोटांचे उघडकीस आलेले प्रकार, यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, कायदा व सुव्यवस्थेबाबत निर्माण झालेले प्रश्न व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदया, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>नि वे द न</u>

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.) ..... व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवर मा. गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. रमेश निकोसे : माननीय सभापती महोदया, नकली नोटा छापणे, त्या वितरित करणे आणि लोकांमध्ये धाकदपटशाचे वातावरण निर्माण करणे याबाबतीत सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी निवेदन दिलेले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद. आता यामध्ये प्रश्न असा आहे की, या नकली नोटा छापणे, त्या वितरित करणे आणि लोकांमध्ये त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण होते ते होऊ नये यासाठी या संबंधात शासन कोणते धोरण आखणार आहे ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदया, बनावट नोटा छापल्या जाऊ नयेत, लोकांमध्ये त्या वितरित होऊ नयेत, जेणे करून आपली अर्थव्यवस्था खिळखिळी होऊ शकते., हे सारे रोखण्यासाठी आपले जे सध्याचे सर्व कायदे आहेत त्या नुसार कडक कारवाई आपण करीत आहोत आणि असे प्रकार घडू नयेत यासाठी सर्व संबंधितांना कडक सूचना दिलेल्या आहेत.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदया, उत्तरादाखल केलेल्या या निवेदनामध्ये बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीला अटक केल्यासंबंधात माहिती दिलेली आहे. तेव्हा या प्रकरणी अटक करण्यात आलेल्ये गुन्हेगारांची नावे काय आहेत आणि ते कोणत्या राज्यातील आहेत तसेच या टोळीचे काम केवळ या नागपूर परिसरामध्येच चालले आहे की, राज्यभर त्यांचे जाळे पसरलेले आहे ? कारण राज्यामध्ये निरनिराळ्या ठिकाणी असे प्रकार घडत आहेत असे आम्ही या लक्षवेधी सुचनेमध्ये सूचित केलेले आहे. दुसरे म्हणजे या टोळीचा अन्य आंतरराज्यीय तसेच आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंध आहे काय ? म्हणजे दुसऱ्या देशातून कुविख्यात गुंड दाऊद याचे अशा प्रकारे बनावट नोटा छापण्याचे कारस्थान चालले आहे तर त्याच्याशी संबंधित ही टोळी आहे काय या बाबत गंभीर चौकशी आपण केलेली आहे काय ? हे जे गुन्हेगार सापडलेले आहेत त्यांची त्यादृष्टीने कसून चौकशी केलेली आहे काय वा करण्याचा विचार आपण केला आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदया, यामध्ये एकूण 6 आरोपी आहेत त्यापैकी 1) हबीब वल्द अब्दुल करीम, वय 27 वर्षे, राहणार सरजात कॉलनी, प्लॉट नं.45, सक्करदरा, नागपूर., 2) वसीउर रहेमान व. अब्दुल रहीम, वय 27 वर्षे, रा. ताजबाग, ठाकूर प्लॉट नं.60, नागपूर., 3) सुनील वल्द सदानंद ढवरे, वय 35 वर्षे, रा. घाडगे नगर, प्लॉट नं.23, ज्योती हायस्कूल मागे, सक्करदरा, नागपूर., 4) लोचन देवरावजी शास्त्रकार, वय 26 वर्षे, रा. बँक कॉलनी, प्लॉट नं.30, नरसाळा रोड, सक्करदरा, नागपूर., 5) शफी मोहम्मद वल्द अली हसन, वय 45 वर्षे, रा. ईश्वर

.... व्ही 3 ..

श्री. म्हेत्रे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नगर, इंद्रायणी लॉन, सक्करदरा, नागपूर., 6) अजहर अली वल्द ताहेर अली, वय 44 वर्षे, राहणार - मिरफेज मशीदजवळ, खदान जुने एस.टी.स्टँड, सी.ए.रोड, गांधीबाग, नागपूर अशी त्यांची नावे आहेत आणि यांचा कोठल्याही आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंध नाही. या संबंधात अजूनही चौकशी चालली आहे व हे गुन्हेगार अजून अटकेमध्ये आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, या राज्यामध्ये बनावट नोटा छापण्याचे अनेक प्रकार उघडकीस आलेले आहेत. या बनावट नोटा जशा मार्केटमध्ये येतात याचे केंद्र खरे म्हणजे आमच्या अकोला शहरामध्ये बनावट नोटा प्रचंड प्रमाणात येऊन त्यांचा वापर चालतो आहे. सभापती महोदया, मुंबईमध्ये 26 जुलैला जो पूर आला आणि त्यामध्ये अनेक लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यावेळी सरकारतर्फे पूरग्रस्तांना जे मदतीचे वाटप केले गेले त्या पैशा पर्यंत या बनावट नोटा गेल्या आहेत. ही फार मोठी गंभीर बाब आहे. सरकारी तिजोरीपर्यंत या बनावट नोटांचे गठ्ठे जातात इतका हा भयानक प्रकार आहे. एक प्रकारे राज्याचीच नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था अडचणीमध्ये आणण्याचा हा प्रकार आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, पूरग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या नोटांमध्ये बनावट नोटांची बंडले सापडली आहेत. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भंडारा जिल्हयात जे पैसे वाटण्यात आले त्यामध्ये नकली नोटांची बंडले सापडली आहेत. म्हणजे हे प्रकरण कुठपर्यंत गेले आहे? याची सखोल चौकशी शासनामार्फत झाली पाहिजे. कारण हे रॅकेट फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादीत नाही तर त्याचे लागेबांधे परप्रांतामध्ये सुध्दा पोहोचले आहेत. त्यासंबंधीची चौकशी करुन तो अहवाल सभागृहाला सादर करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करणारे हे रॅकेट केवळ परराज्यामध्ये नाहीतर परदेशामध्ये देखील पोहोचले आहे. त्यासंबंधीची चौकशी करुन तो चौकशी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासामध्ये या गुन्हेगारांनी यापूर्वी किती ठिकाणी गुन्हे केले आहेत हे निष्पन्न झाले आहे काय? या बनावट नोटा ओळखता याव्यात यासाठी आपण बँकांना प्रशिक्षण देण्याची सुरुवात केल्याचे निवेदनात सांगितले आहे. आतापर्यंत आपण किती बँकांना आपण हे प्रशिक्षण दिले आहे? किती नागरिकांना हे प्रशिक्षण दिले आहे याची आपण माहिती देऊ शकाल काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, यामध्ये आरोपी नंबर 1 ते 5 यांचेवर यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. आरोपी नंबर 6 वर हिंगणा पोलीस ठाणे, नागपूर (ग्रामीण) गुन्हा रजिस्टर क्रमांक 102/2 अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. व त्यामध्ये कोर्टाने त्याला निर्दोष सोडले आहे. तसेच, नकली नोटा ओळखण्याबाबत सर्वच बँकाना सूचना देण्यात आलेल्या आहेत...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, मी एका बँकेचा चेअरमन आहे. माझ्या बँकेकडे अशाप्रकारच्या सूचना अजून आलेल्या नाहीत...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : आपल्याकडे सूचना आल्या नसतील तर त्या आपल्याकडे पाठवून देण्यात येतील..

श्री. जयंत प्र. पाटील : अशाप्रकारच्या बनावट नोटा पकडल्यानंतर त्याची शासन दखल घेत नाही, गुन्हेगारांना पकडत नाही. बनावट नोटा ओळखण्यासाठी प्रशिक्षण देणारी यंत्रणा आपण कोणती उभी केली आहे? त्यासाठी किती कर्मचारी नेमले आहेत, किती अधिकारी नेमले आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : बनावट नोटा सर्वसामान्य लोकांना सहजा सहजी ओळखता येत नाहीत. काही लोकांना बनावट नोटा दाखविण्यात आल्या त्यामध्ये 92 टक्के लोकांना त्या ओळखता आल्या नाहीत. बँकेचे जे कॅशियर असतात ते नेहमी नोटा हाताळत असतात, त्यांना बनावट नोटा समजतात. यासंबंधी आर.बी.आय.कडून ज्या गाईडलाईन्स येतात त्याप्रमाणे आम्ही सर्व बँकांना सूचना देतो. आपल्या बँकेला देखील अशाप्रकारची सूचना पाठवून देण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, आर.बी.आय. वर गृहखात्याचे नियंत्रण नाही त्यामुळे ते काही करु शकत नाही. आर.बी.आय. सहकार खात्याला किंवा अर्थ खात्याला यासंबंधी कळवील. परंतु आपल्या गृह खात्याचा याच्याशी संबंध काय? केवळ आपण उत्तर द्यायचे आणि आम्ही ऐकायचे हे बरोबर नाही. आर.बी.आय. च्या गाईडलाईन्स काय आहेत हे आम्हाला बँक चालवितांना समजल्या पाहिजेत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आर.बी.आय. ने शासनाला कळविल्यानंतर शासनामार्फत सर्व बँकांना कळविण्यात आले आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांच्या लक्षात या प्रश्नाचे गांभीर्य अजून आलेले नाही. एक वर्षापूर्वी हिवाळी अधिवेशनामध्ये कऱ्हाडला पकडण्यात आलेल्या बनावट नोटांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याठिकाणी पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांकडून लाखो रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. पकडण्यात आलेल्या गुन्हेगाराने सांगितले की, विधानसभेच्या निवडणुकीमध्ये एका उमेदवाराच्या प्रचारामध्ये बनावट नोटा वाटल्या गेल्या. तेच गुन्हेगार आज सुध्दा मोकळे फिरत आहेत व पुन्हा बनावट नोटा छापण्याचे काम जोरात सुरु आहे. या प्रकरणामध्ये पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांना नंतर सोडून देण्यात येते. त्यांच्यावर काहीच कारवाई होत नसेल तर ही शृंखला अशीच चालू रहाणार. आणि एक दिवस हा देशही गिळंकृत करतील. हा प्रश्न आपण इतका लाईटली घेत आहात. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, सांगली व कऱ्हाड या तिनही ठिकाणी बनावट नोटा छापण्याचे जाळे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शोधनासाठी नाही

अजूनही ते लोक कार्यरत आहेत. यामधील जो मुख्य गुन्हेगार आहे त्याचे नाव राजू असून तो आर.के.ग्रूप या नावाने ओळखला जातो आणि अण्णा हजारे यांचा तो कार्यकर्ता आहे. पण तो सध्या मोकाट फिरत आहे, अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. तरी देखील माननीय मंत्री महोदय तीच-तीच उत्तरे देत आहेत, ते याबाबतीत निश्चित स्वरुपाचे उत्तर देत नाहीत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, शासन याबाबतीत लाईटली घेत नाही, तर गांभीर्याने घेत आहे. बनावट चलनी नोटांच्या संदर्भात जी कार्यवाही केली आहे, त्यासंबंधात मागील सहा वर्षाची आकडेवारी मी देऊ इच्छितो.

(काही सन्माननीय सदस्य बसून बोलतात.)

ठीक आहे. गेल्या वर्षाच्या संदर्भात सांगावयाचे तर ऑक्टोबर 2005 च्या अखेरपर्यंत यासंदर्भात एकूण 182 गुन्हे दाखल केले आहेत आणि 109 आरोपींना अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून 64,04,564 इतक्या रुपयांचा माल जप्त केला आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया, महत्वाचा प्रश्न असा आहे की, सध्या जी घटना घडली आहे, त्यासंदर्भात किती जणांना अटक केली आहे ? कारण मुख्य गुन्हेगार अजूनही बाहेर फिरत आहेत. परंतु माननीय मंत्री महोदय तीच-तीच उत्तरे देत आहेत.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : या आकडेवारीनुसार एवढया मोठया प्रमाणात काम केले आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे का ? या आकडेवारीने आपले समाधान झालेले आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, ही गोष्ट शासनाने गांभीर्याने घेतली आहे म्हणूनच ही कारवाई केली आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, अजूनही गुन्हेगार मोकळेपणे फिरत आहेत. यावर आपले काय उत्तर आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, संबंधितांना कोर्टामध्ये सादर केल्यानंतर कोर्टाने जर त्यांना जामिनावर सोडले तर काय करणार ?

तालिका सभापती : ते जामिनावर कसे सुटलेत याची आपण चौकशी करावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, याबाबतीत चौकशी करण्यात येईल आणि ते खरोखरच मोकळे सुटले असतील तर कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी मुख्य आरोपींना पकडल्यानंतर, त्यांना कोर्टासमोर उभे केल्यानंतर ते जामिनावर सुटले आहेत. ज्यांनी या राज्याची आर्थिक व्यवस्था खिळखिळी केली आहे, अशा लोकांना पोटा का लावत नाही ? तर याठिकाणी संबंधितांना पोटा कायदा लावण्यात येणार आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल आणि त्यानुसारच कारवाई केलेली आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, यामध्ये . . . .

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी फक्त प्रश्न विचारावा. कारण अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे आहेत.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, नकली नोटा बाळगणाऱ्यांना आणि त्या विकणाऱ्यांना याबाबतीत माहिती असते. परंतु सर्वसामान्य लोकांना याची माहिती नसते. सर्वसामान्य माणूस 500 रुपयाची नोट घेऊन बँकेमध्ये जातो आणि मग तेथे त्याने दिलेल्या नोटेची तपासणी केली जाते. त्यावेळी ती बनावट असल्याचे आढळून आले तर त्याच्या विरुध्द क्रिमिनल केस दाखल करुन त्याला अटक केली जाते. परंतु ज्यांचा या गोष्टीशी काहीही संबंध नाही त्यांच्यावर अशा प्रकारे क्रिमिनल केसेस केल्या जात असतील तर याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, याबाबतीत सर्व संबंधितांना सूचना दिल्या आहेत. सामान्य माणसाकडे अशा प्रकारची नोट बँकेमध्ये गेल्यावर किंवा किराणा मालाच्या दुकानामध्ये गेल्यावर नोटांच्या बंडलमधून येऊ शकते. जे निरपराध लोक असतात, त्यांना त्याची काही माहिती नसते. अशा लोकांकडे बनावट नोट सापडली म्हणून जर खटले भरले असतील तर त्यांच्याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील आणि त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल आदेश दिले जातील.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, जर एखादा सर्वसामान्य माणूस बँकेमध्ये 500 रुपये भरावयास जातो, तेव्हा ती तपासल्यानंतर बनावट असल्याचे दिसून आले तर त्याची चौकशी केली जाते, त्या माणसावर केस केली जाते. यामध्ये त्या माणसाचा काहीच संबंध नसतो. अशा वेळी पोलीस त्याच्याकडून पैसे उकळतात. याबाबतीत काय करणार आहात ?

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जर कोणाकडे बनावट नोट सापडली असेल तर त्याबाबतीत चौकशी करणे अपरिहार्य आहे. त्या चौकशीमध्ये जर तो माणूस दोषी नाही असे आढळले तर त्याला सोडून देण्याबद्दल सांगितले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, जो माणूस तक्रार करावयास जातो, त्यालाच अटक होते अशी परिस्थिती आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, प्रत्येक केसमध्ये चौकशी केली जाईल. पण जर एखाद्या व्यक्तीला नोटेच्या बाबतीत शंका आली आणि त्याने स्वत:हून सु-मोटो ही बाब निदर्शनास आणून दिली तर अशा वेळी संबंधित माणसाची चौकशी करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत की त्याला अटक करण्याचे आदेश दिलेले आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, संबंधित माणसाकडे 50 रुपयाची बनावट नोट आहे म्हणून त्या माणसाला पकडून ठेवले, त्याच्यावर केस केली असे नाही. तर जे कोणी अशी नोट घेऊन येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार नाही तर जी माहिती प्राप्त होईल त्या नुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैय्यालाल गिडवानी : जे अकौंट होल्डर असतील ते बँकेमध्ये पैसे भरताना अशाप्रकारची त्यांच्याकडे बनावट नोट आढळून आली तर त्यांच्यावर कारवाई करणार नाही, अशाप्रकारची हमी द्यावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : अकौंट होल्टरकडे नजरचुकीने नकली नोट आली असेल आणि बँकेत भरतांना त्यांच्या लक्षात आले तर त्यांच्यावर कारवाई करणार नाही, त्यांना हरॅसमेंट केली जाणार नाही.

श्री.अनिल परब : अगोदर चौकशी करुन नंतर कारवाई झाली पाहिजे. परंतु अगोदर अटक करुन नंतर चौकशी होणार असेल तर बरोबर नाही, अगोदर चौकशी करुन नंतर कारवाई करणार आहात काय ?

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : चौकशीसाठीसुध्दा संबंधितांना ताब्यात घेणे गरजेचे आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : चौकशीसाठी त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलवावे लागेल, त्यांना विचारावे लागेल. अगोदर चौकशी केल्याशिवाय कोणालाही अटक केली जाणार नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी या संबंधात प्रश्न उपस्थित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी वारंवार सांगितले जाते की, श्री. राजू नावाचा आरोपी कोर्टातून सहीसलामत सुटतो. त्याला मोकळे सोडलेले आहे. सामाजिक कार्यकर्ते श्री.अण्णा हजारे यांच्याबरोबर श्री.राजू हा काम करतो, ही वस्तुस्थिती खरी आहे काय ? श्री.राजू वारंवार अशाप्रकारच्या गुन्ह्यामध्ये पकडला गेला असेल आणि कोर्टातून तो सुटत असेल तर त्याच्यावर ऑर्गनाईज्ड क्राईम म्हणून मोका कायद्याखाली कारवाई करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.राजू हा जर बनावट नोटा तयार करणारा असेल..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्याला बनावट नोटा तयार करताना पकडले असेल आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असेल आणि कोर्टाने त्याला वारंवार जामीन दिला म्हणून मंत्री महोदयांनी हतबलता व्यक्त केली. सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी त्याच्यावर मोकाखाली का कारवाई करत नाही ? असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. श्री.राजू अशाप्रकारचा वारंवार गुन्हा करत असेल आणि देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करत असेल तर त्याला मोका लावणार आहात काय ? याचे उत्तर द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.अनिल परब : त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, मोक्का लावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी साहेबांनी या आरोपीला मोकळे सोडलेले आहे, त्याला मोकळे सोडून नये, त्यांना मोक्का लावणार आहात काय, अशाप्रकारचा मुद्दा उपस्थित केला. परंतु आपल्या प्रचलित कायद्याप्रमाणे...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आपल्याकडे अशाप्रकारचा प्रचलित कायदा नाही. मोक्का हाच मार्ग आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : त्यांनी देशद्रोह केलेला आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. केस वीक असल्यामुळे आरोपी जामीनावर सुटतो. असे पुन्हा घडू नये, म्हणून मोका लावणार आहात काय, असे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तसे आपण करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राष्ट्र विरोधी कारवाया करणाऱ्या गुन्ह्यामध्ये मोक्का लावला जातो.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्याने देशद्रोहाचाच गुन्हा केलेला आहे.

...(अडथळा)...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, सन्माननीय राज्यमंत्र्यांना मोक्का कायदा काय आहे, याची माहिती दिसत नाही, त्यांनी त्याचा अभ्यास करावा. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्यासाठी उभे रहातात.)

तालिका सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. शांतता राखावी.

....(अडथळा)....

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती :माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराने सभागृहाचे समाधान झालेले नाही....

श्री. सिध्दराम म्हेत्रे :सभापती महोदया, मी उत्तर दिलेले आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात)

तालिका सभापती :सभागृहाचा जो मानस आहे त्यावरुन असे दिसून येते की, या प्रश्नावर अधिकच चर्चा होण्याची गरज आहे आणि अधिक स्पष्ट उत्तर मिळण्याची गरज आहे. म्हणून ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मलकापूर येथील मूकबधीर विद्यालयाच्या 12 मुलींना झालेली विषबाधा.

मु. शी : मलकापूर येथील मूकबधीर विद्यालयाच्या 12 मुलींना झालेली विषबाधा यासंबंधी स□मा□□ीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अनंत तरे, सुरेश जेथलिया,विलास अवचट वि.प.स.यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यंद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वजा□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छिते आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रते.

" दिनांक 25 नोव्हेंबर, 2005 रोजी अथवा त्या सुमारास अकोला जिल्हयातील मलकापूर येथील मूकबधीर विद्यालयाच्या 12 मुलींना तेथील अन्नातून झालेली विषबाधा, वसतिगृहातील अन्न खाल्ल्यावर मुलींना उलटया होऊन जीवघेण्या यातना सुरु झाल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयामध्ये पुढील उपचारासाठी दाखल करण्यात येणे, त्यापैकी काही मुलींची प्रकृती गंभीर होण, अशा प्रकारे मूकबधीर ि□विद्यार्थीनींची योग्य काळजी घेण्याबाबत तेथील व्यवस्थापनाने दाखविलेली अक्षम्य उपेक्षावृत्ती, परिणामी कित्येक मूकबधीर मुलींना झालेली गंभीर विषबाधा, परिणामी तेथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता, असे प्रकार होऊ नयेत म्हणून शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या ि□वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते ि□वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

ि□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदया, या शाळेमधील मुली मूकबधीर आहेत. म्हणून आपण त्यांना भूक लागली, तहान लागली तर त्यांनी कसे बोलावयाचे हे शिकवीत असतो तसेच त्यांना शिक्षण देण्याचा शासनाचा हेतू असतो. आदिवासी आश्रमशाळा आहेत. मूकबधीर मुलींच्या शाळा आहेत. समाजातील जे जे उपेक्षित घटक आहेत त्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून हया आश्रमशाळा व निवासीगृह चालविण्यात येतात. त्याला काही ठिकाणी आश्रमशाळा असे म्हणतात तर काही ठिकाणी निवासीगृह असे म्हणतात. लक्षवेधीमध्ये शासनाला मान्य करण्यासारखी पहिली वस्तुस्थिती अशी होती की, त्या मुलींनी शाळेमध्ये जेवण केल्यानंतर त्यांची तब्येत बिघडली. परंतु निवेदनातील पहिल्याच परिच्छेदातील दुसरे वाक्य वाचले तर असे लक्षात येते की, ते सरळसरळ खोटे आहे. कारण उत्तरातच पुढे मान्य केलेले आहे की, "शाळेतील 12 विद्यार्थीनींना आजारी असल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, अकोला येथे दाखल करण्यात आलेले होते." त्यानंतर पुढे मान्य केलेले आहे की, "त्या सर्व मुलीनी दोन्ही वेळेचे जेवण वसतिगृहातच घेतले होते."खरे म्हणजे पुढील वाक्यात विचारपूर्वक बदल करावयास पाहिजे होता. जेवण घेतल्यानंतर त्या मुलींच्या तब्येती बिघडल्या किंवा विषबाधा झाली किंवा जे काही असेल ते द्यावयास पाहिजे होते. दुर्दैवाने आपल्या समाजात एखाद्या व्यक्तीला विषबाधा झाल्यानंतर त्याची सगळेजण दखल घेतात.ती व्यक्ती कोण आहे, त्यावर ते अवलंबून असते. या 12 मुलींना विषबाधा झाल्यानंतर जेवणातून विषबाधा झाली असावी असा संशंय व्यक्त केलेला आहे. आमच्या माहिती प्रमाणे विषबाधा झाल्याबरोबर पहिल्यांदा काय कार्यवाही झाली तर पोलिसांनी तेथे जाऊन ते जेवण डिस्ट्रॉय करुन सगळा पुरावा नष्ट केला आहे. अशा वेळेला त्यासंबंधीचा अहवाल अप्राप्त आहे असे उत्तर दिलेले आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ज्यांनी कोणी जेवण तयार केले होते त्या जेवणाबरोबरच तेथील धान्य ताब्यात घेतले आहे असे उत्तरात म्हटले आहे. म्हणून ते जेवण कसे बनविले हे देखील महत्वाचे आहे. शासनाने आदिवासी आश्रमशाळांच्या बाबतीत महिला तदर्थ समिती नियुक्त केली होती. त्या समितीने अनेक शिफारशी केलेल्या आहेत. अनेक ठिकाणी धान्य खराब असते, सडके असते, भाज्या चांगल्या नसतात, चांगल्या शिजविलेल्या नसतात. मूकबधीर मुलींची शाळा असो, आदिवासी मुलींची आश्रमशाळा असो किंवा जेथे जेथे मुलींच्या निवासी शाळा आहेत त्या शाळांमध्ये त्यांचे आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक जिल्हा स्तरावर महिला तदर्थ समिती नेमली जाईल काय ? हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न असा की, आता त्या मुलींची तब्बेत कशी आहे, ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

याच्याबद्दल संबंधितावर काय कारवाई झालेली आहे आणि या शाळेतील धान्याच्या गुणवत्तेबाबत ही घटना घडण्यापूर्वी किती दिवस आगोदर तपासणी झाली होती आणि त्याच्यामध्ये काय आढळून आले होते ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे अहे की, अशा प्रकारची समिती झाली पाहिजे त्याबद्दल योग्य तो विचार जरुर करु. शाळेतील धान्याची गुणवत्ता तपासण्यासाठी इन्स्पेक्टर असतात आणि ते दर महिन्याला त्यांच्या पूर्ण क्षेत्रात ज्या पाच शाळा आहेत. त्या शाळांना भेटी देत असतात. त्याप्रमाणे त्या शाळेची त्यांची व्हिजिट व्यवस्थित झाली होती. त्या शाळेतील धान्याचे सॅम्पल घेतलेले आहे. त्यासंबंधीचा रिपोर्ट दोन-तीन दिवसात येईल.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मराव बाबा आत्राम ..... (लक्षवेधी सूचना क्र. 4 .....

मुख्य म्हणजे ज्या ठिकाणी स्वयंपाक खोली आहे तेथे स्वच्छता असली पाहिजे अशा सूचना या निवासी शाळांना दिलेल्या असतात. या शाळेच्या स्वच्छतेबाबत आम्हाला शंका असल्यामुळे तपासणीचा अहवाल बाकी आहे. या संस्थेसंबंधी आजतागायत तशी तक्रार आलेली नसली तरी देखील चौकशी करण्यास सांगितले आहे. या शाळेतील विद्यार्थिनी दिवाळीमध्ये आपल्या गांवी गेल्या होत्या आणि दिवाळीनंतर त्यांनी आपल्या घरातील पदार्थ खाऊन त्यांना विषबाधा झाली असेल अशा प्रकारचे शाळेचे म्हणणे आहे. यासंदर्भात आरोग्य अधिकाऱ्यांनी जी तपासणी केली तो अहवाल आणि पोलिसांचा अहवाल तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करण्यात आली त्या विभागाचाही अहवाल बाकी आहे. हे सर्व अहवाल आल्यानंतर ताबडतोब कारवाई करण्याचे शासनाने ठरविले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गो-हे यांनी राज्यातील अत्यंत महत्वाच्या प्रश्नासंबंधी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. आपल्या राज्याच्या दृष्टीने ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, या अपंग व मुकबधीर मुलींनी आपल्या घरचे पदार्थ खाल्यामुळे विषबाधा झाली असावी असे शाळेचे म्हणणे आहे. परंतु शाळा काहीही सांगू दे, राज्यात अशा अनेक मुकबधीर मुलांच्या शाळा आहेत, नुकतेच अमरावतीतील मुलींनी त्यांच्यावर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात माननीय राज्यपालांकडे तक्रार केलेली आहे, अशा एक नव्हे तर अनेक प्रकारच्या तक्रारी अशा वसतिगृहातील मुलींकडून वेळोवेळी देण्यात येतात. त्यात त्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण देणे, इतर सुविधा न मिळणे अशा तक्रारींचा अंतर्भाव देखील असतो. या वसतिगृहांना महिलांच्या समितीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी आम्ही भेटी देखील दिलेल्या आहेत. अशा भेटींच्या माध्यमातून समजते की, त्या मुला-मुलींना मिळणाऱ्या सुविधा पूर्णपणे दिल्या जात नाहीत. म्हणून आमची विनंती आहे की, अशा प्रकारे शाळा जी वस्तुस्थिती सांगते त्यांच्या म्हणण्यावर विसंबून न राहता, समिती काय सांगते त्यावर अवलंबून न राहता माननीय मंत्री महोदयांनी अशा वसतिगृहांना भेटी देऊन अथवा संबंधित अधिकाऱ्यांनी ज्या भेटी दिल्या असतील त्यांच्या अहवालामध्ये काय म्हटले आहे यासंदर्भात विचार करणे आवश्यक आहे. अशा भेटीमध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबतचे अहवाल माननीय मंत्री महोदयांकडे प्राप्त झालेले आहेत काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(लक्षवेधी सूचना क्र. 4 ..... सुरु.

श्री. धर्मराव बाबा आत्राम : महोदय, आा प्रकारे अचानक भेटी देण्याबाबतच्या सूचना समाजकल्याण अधिकारी तसेच निरिक्षकांना आपण नेहमीच देत असतो. परंतु या शाळेत स्वच्छता नसल्याबाबत आम्हाला डाऊट आहे परंतु तसा अहवाल अद्याप मिळाला नाही.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, अकोला जिल्हयातील ही लक्षवेधी असली तरी आज संपूर्ण महाराष्ट्रालाच हा एक प्रकारे कर्करोग लागलेला आहे. विदर्भात अनेक अपंग विद्यार्थ्यांच्या शाळा आहेत त्यातील 25 टक्के शाळा सोडल्या तर 75 टक्के शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पूर्णपणे जेवण तसेच इतर सुविधा मिळत नाहीत, झोपण्याची व्यवस्था नाही. याबाबत आम्ही अनेक तक्रारी दिलेल्या आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, विदर्भातील अशा अपंग मुलांच्या शाळांची तपासणी करुन या अधिवेशन काळात तसा अहवाल शासनाकडून सादर करण्यात येणार आहे काय ? कारण विदर्भामध्ये अधिवेशन चालू असल्यामुळे या काळातच या शाळांची तपासणी होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर काटोल आणि कन्हान येथील शाळेमध्ये 22 पदे मान्य असतांना प्रत्यक्षात 62 पदे भरलेली आहेत त्यामुळे ही पदे अतिरिक्त ठरलेली आहेत. यासंबंधी मागे देखील अनेक तक्रारी केल्या परंतु त्याची चौकशी पूर्ण झालेली नाही. परंतु आम्ही त्याच भागाशी संबंधित असल्यामुळे, आमचे मतदार या क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिलेल्या माहितीवरुन आम्हाला समजते की, अशा शाळांमध्ये मुलांना पुरेसे जेवण मिळत नाही, बाकीच्या सुविधा तर मिळतच नाहीत. म्हणून विदर्भापुरताच हा प्रश्न आता मर्यादित ठेवून या भागातील शाळांची चौकशी करावी व 15 दिवसात हा अहवाल सभागृहाच्या पटलावर शासन ठेवणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, हा वेगळा प्रश्न जरी असला तरी मी या प्रश्नाची माहिती देतो. यासंदर्भात जरुर चौकशी केली जाईल. 22 पदांना परवानगी असतांना 62 पदे कशी भरली याची माहिती लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल. तसेच दुस-या मुद्याच्या संदर्भात सुध्दा लवकरात माहिती घेण्यात येईल. यासंदर्भातील माहिती 15 दिवसात मिळेल का हे मला सांगता येणार नाही कारण यासंदर्भात संपूर्ण शाळांची माहिती घेऊन संपूर्ण चौकशी करावी लागेल. पुढच्या अधिवेशनाच्या आत संपूर्ण कारवाई केली जाईल व यासंदर्भातील माहिती दिली जाईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, या विषयाच्या संदर्भात 3 संस्थांकडून अहवाल मागविलेला आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात रुग्णालयातील बालरोगतज्ज्ञ तसेच जिल्हा शल्यचिकित्सक यांनी अन्नातून विषबाधा असल्याचा संशय व्यक्त केला आहे. परंतु दोन संस्थांनी यासंदर्भात अद्यापपावेतो अहवाल दिलेला नाही. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, अकोला यांच्याकडून सुध्दा अहवाल प्राप्त झालेला नाही त्यांनी यासंदर्भातील अहवाल का दिला नाही? खरे म्हणजे हा अहवाल त्वरीत उपलब्ध झाला पाहिजे. या विषयाच्या संदर्भात संपूर्ण माहिती मिळत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी व ज्यावेळेस तीन दिवसानंतर यासंदर्भात माहिती मिळेल तेव्हाच म्हणजे पुढच्या आठवडयात ही लक्षवेधी सूचना लावावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, ही लक्षवेधी राखून ठेवण्यात येऊ नये. यासंदर्भात आम्ही कारवाई करणार आहोत.

तालिका सभापती : पुढच्या आठवडयात ही लक्षवेधी सूचना घेण्यात काही अर्थ नाही कारण आपल्याकडे पुष्कळ कामकाज आहे. या विषयाच्या संदर्भात कारवाई केली की नाही एवढाच मुख्य मुद्दा आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य जी माहिती विचारीत आहे त्यासंदर्भात आपण कार्यवाही करावी, असे मी निदेश देत आहे.

श्री. अनंत तरे : जिल्हा शल्यचिकित्सकांनी जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये काय म्हटलेले आहे ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जुन्नरे

श्री. धर्मरावबाबा आत्राम : 12 मुलांना अन्नातून विषबाधा झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आले होते असे म्हटलेले आहे.

श्री. अनंत तरे : संस्थेचे म्हणणे आहे की, विद्यार्थ्यांनी बाहेरचे अन्न खाल्ल्यामुळे विषबाधा झालेली आहे. मंत्रीमहोदयांनी संस्थेचे समर्थन करणे योग्य नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, मी संस्थेचे समर्थन करीत नाही. संस्थेचे म्हणणे आहे की, आश्रमशाळेच्या मुलींनी बाहेरचे अन्न खाल्ल्यामुळे विषबाधा झालेली आहे असे म्हटलेले आहे. विद्यार्थ्यांनी बाहेरचे अन्न खाल्ल्यामुळे विषबाधा झाली असे मी म्हणालो नाही.

तालिका सभापती : या आश्रमशाळेमध्ये बाहेरचे अन्न खाल्ल्यामुळे जी विषबाधा झालेली आहे त्याची आपण चौकशी कशी करणार आहात?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी असे सांगण्यात आले आहे की, आश्रमशाळेच्या मुलींनी बाहेरचे अन्न खाल्ल्यामुळे विषबाधा झालेली आहे. सभापती महोदया, हा गंभीर विषय आहे. परमेश्वरांने या मुलींवर हात ठेवलेला नसल्यामुळे या मुली असहाय्य आहेत. हया मुली मुक्या तसेच कर्णबधीर असून या मुलींना कोणत्याही प्रकारचे सेंसेशन नाही. या ठिकाणच्या ज्या मुली आहेत त्या गरीब घरच्या असल्यामुळे आश्रमशाळेत आलेल्या आहेत. श्रीमंतांच्या मुली आश्रमशाळेत कधीच येत नाहीत. आश्रमशाळेतील मुलांना आज कशा प्रकारे वागवले जात आहे याची सर्वांना माहिती आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कशा प्रकारचे अन्न मिळते याची सुध्दा आपल्या सर्वांना कल्पना आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचे बालरोग तज्ञांनी सांगितलेले आहे. आपल्या विभागाचे इन्सपेक्टर कशा प्रकारे शाळा चेक करतात यासंदर्भात सगळयांना माहिती आहे. वरपर्यंत हप्ते दिले जात आहेत. आश्रम शाळेत सध्या काय चालले आहे , कशा प्रकारचे हप्ते दिले जातात हे मी येथे सांगू का?

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.पांडुरंग फंडकर ...

समाजकल्याण अधिकारी देखील हप्ते घेतात. माझ्या भागातील मूक-बधिर मुलींच्या शाळेत मुलींना अन्नातून विषबाधा झालेली आहे म्हणून त्या शाळेवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, या प्रश्नाला अनुसरूनच माझा प्रश्न आहे. लक्षवेधीत जो प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे तो अतिशय गंभीर आहे. त्याकडे कोणीही लक्ष दिलेले नाही. जे अधिकाऱ्यांनी लिहून दिलेले आहे, ते मंत्रिमहोदय सभागृहामध्ये वाचून दाखवत आहेत. आपला अधिकारी घटनास्थळी गेला होता का ? ज्या मुलींना उलटया झालेल्या आहेत त्यांना बोलता येत नाही, ऐकता येत नाही. त्यांची आपण साक्ष घेता हे लांच्छनास्पद आहे. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या मुलींना बाहेरचे अन्न खाल्ले आहे. म्हणून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सन्माननीय सदस्यांची एक समिती गठित करावी. या समितीवर महिला सदस्य घ्यावेत व त्यांना चौकशी करण्यासाठी आपण अनुमती द्यावी व त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यासंबंधी निर्णय घ्यावा अशी मी सूचना करू इच्छितो. तसेच, जो कोणी पुरवठादार आहे त्याला काळया यादीमध्ये टाकून चौकशीत जे काही निष्पन्न होईल त्याप्रमाणे कारवाई करावी असे देखील सुचवू इच्छितो. तर असे शासन करील का ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, चौकशीचा अहवाल आल्यानंतर पुरवठादाराला काळया यादीमध्ये टाकण्याचे काम आम्ही करणार आहोत. तसेच, ज्या शाळेमध्ये सदर प्रकार घडला आहे, त्या शाळेविरूध्द कारवाई केली जाईल.

तालिका सभापती : मंत्रिमहोदय, आपण म्हणाला आहात की, शाळे बाहेरील अन्न खाल्ल्यामुळे मुलींना विषबाधा झाली. मूकबधीर विद्यालयातील मुली हया शाळेत राहत होत्या. त्या गरीब घरातील मुली आहेत. 12 मुलींनी शाळे बाहेर जाणे शक्य दिसत नाही. असे असताना आपण सभागृहाला वरवरची माहिती देऊ नका. तेव्हा या प्रकरणी निश्चितपणाने चौकशी करावी असा मी आपल्याला निदेश देत आहे. तसेच, संबंधितांवर कोणती कारवाई केली गेली यासंबंधीची अधिकची माहिती घेऊन ती येत्या तीन दिवसात सभागृहाला सादर करावी असा देखील निदेश मी आपल्याला देत आहे.

श्री.धर्मारावबाबा आत्राम : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती : तसेच, महाराष्ट्र विधान मंडळाची महिला तदर्थ समिती आहे. या समितीकडे सदर प्रकरण चौकशीसाठी द्यावे अशी सूचना करण्यात आलेली आहे. सदर समिती पुनर्गठित करता येण्याजोगी आहे.

श्री.गुरूनाथ कुलकणी : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये मी सिंधुदुर्ग जिल्हयाची परिस्थिती सभागृहासमोर मांडली होती. सिंधुदुर्ग जिल्हयातील अंध मुलांच्या आश्रमशाळेत किडे पडलेले अन्नधान्य, किडे वळवळत असलेला भाजीपाला देण्यात आला होता. त्यासंबंधी समाजकल्याण विभागाने कोणती कारवाई केली आहे हे मला अद्यापि समजलेले नाही. आंधळ दळतय आणि कुत्रं पीठ खातयं अशी समाजकल्याण विभागाची अवस्था झाली आहे. सामाजिक न्याय विभागासाठी दोन तरूण मंत्री आहेत. श्री.चंद्रकांत हंडोरे हे कॅबिनेट मंत्री आहेत. त्यांनी सर्व जिल्हयांमध्ये जाऊन आश्रमशाळांची पाहणी करावी. कर्मचाऱ्यांना पगार देणे एवढेच काम सामाजिक न्याय विभागाला राहिलेले आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छिते की, आपण सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन महिला तदर्थ समिती नेमण्याबाबत काय कार्यवाही करणार आहात ?हे सांगावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, मागे महिला आमदारांची तदर्थ समिती नेमली होती. त्याच धर्तीवर विधानसभा आणि विधानपरिषद महिला आमदारांची एक तदर्थ समिती नेमण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदया, मूकबधीर मुला-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शासन करोडो रुपये खर्च करते. जी वसतिगृहे वा आश्रमशाळा आहेत त्याठिकाणची व्यवस्था योग्य प्रकारे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी जी यंत्रणा आहे त्या यंत्रणेमध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे. मला मा.मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे की, आज समाज कल्याण विभागामध्ये अनेक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. निरीक्षकांची पदे रिक्त आहेत. जर निरीक्षकांची पदे रिक्त असतील तर वसतिगृहांची वा आश्रमशाळांची तपासणी कशी होणार ? या ठिकाणी सांगण्यात आले की, वेळच्या वेळी चौकशी झाली पाहिजे. त्याचा तपासणी अहवाल आला पाहिजे. जर अधिकारी नसतील तर तपासणी कोण करणार ? आपण जर ही रिक्त पदे भरली नाही तर आपल्याकडे वेळच्यावेळी रिपोर्ट येणार नाही. मग आपण अशी एखादी घटना घडल्यावर चौकशी करण्याचे आदेश देणार आणि तपासणी अधिकाऱ्यांनी दिलेला रिपोर्ट ग्राह्य धरणार. सभापती महोदया, आपण वसतिगृहे आणि आश्रमशाळांवर लाखो रुपये खर्च करतो. त्या आश्रमशाळा उत्तम रितीने चालल्या पाहिजेत. शासनाने तशी व्यवस्था केली पाहिजे. जे दोषी असतील त्यांचेवर कारवाई केली पाहिजे. एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदया, ज्या अधिकाऱ्यांवर अवलंबून चौकशी होते ते अधिकारी एक नंबरचे दोषी आहेत. त्यांच्या संरक्षणामुळे वसतिगृहामध्ये गैरप्रकार होत आहेत. त्यांचा हप्ता ठरलेला असतो. संस्थाचालक, संस्थाप्रमुख आणि शासकीय अधिकारी यांना चौकशी करण्यास सांगण्यात येते. त्यांनी दिलेले स्पष्टीकरण फायनल होणार. तेव्हा माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी महिला आमदारांची एक कमिटी नेमावी अशी जी सूचना केलेली आहे ती त्यांनी मान्य करावी. या कमिटीने युध्द पातळीवर चौकशी करुन अहवाल सादर करावा.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, दोन्ही सभागृहातील महिला आमदारांची कमिटी नेमण्यात येईल. आपल्या सभागृहात प्रश्न उपस्थित झालेला आहे. तेव्हा आपल्या सभागृहातील महिला आमदारांची तदर्थ समिती नेमण्यात यावी.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हा प्रश्न अतिशय ज्वलंत आणि गंभीर आहे. त्यामुळे मा.मंत्रिमहोदय या प्रकरणासंबंधी समिती किती दिवसात नेमणार आणि त्या समितीला किती दिवसात अहवाल सादर करावयास सांगणार आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, हा प्रश्न राज्यापुरता नव्हेतर केवळ विदर्भापुरता मर्यादित आहे. आपल्याला जी समिती नेमावयाची आहे ती संपूर्ण राज्यातील आश्रमशाळांच्या आणि वसतीगृहांच्या संदर्भात नेमावयाची आहे. व्ही.जे.एन.टी.च्या शाळा, सामाजिक न्याय विभागाच्या आश्रमशाळा, होस्टेल्स, मूकबधीरांच्या शाळा या सर्वांचा त्यामध्ये समावेश असेल. केवळ एकाच शाळेपुरती ही समिती नेमावयाची नाही. सर्व राज्यभर चांगल्याप्रकारे सुपरव्हिजन व्हावे या दृष्टिकोनातून ही समिती नेमावयाची आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सर्व राज्यातील आश्रमशाळांची तपासणी करण्यासाठी विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सदस्यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती कार्यरत आहे. ती समिती वेगवेगळया आश्रमशाळांना भेटी देऊन सभागृहामध्ये अहवाल सादर करीत असते. सध्या या ठिकाणी जो विषय सुरु आहे तो अकोला जिल्हयातील मलकापूर येथील मूकबधीर विद्यालयासंदर्भात आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, शासनाचे अधिकारी नीट चौकशी करु शकणार नाहीत. कारण त्या मुली मूकबधीर शाळेतील आहेत त्या बोलू शकत नाहीत, अशा परिस्थितीत ते कशी चौकशी करणार ? म्हणून सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदय, आपल्यासह या सभागृहाच्या पाच महिलांची समिती किती दिवसात गठीत करुन, त्या समितीला अहवाल किती दिवसांत सादर करावयास सांगणार आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, या शाळेच्या चौकशीसाठी दोन दिवसांत समिती गठीत करुन, समितीला लवकरात लवकर अहवाल सादर करण्याबाबत सांगण्यात येईल.

तालिका सभापती : या प्रकरणासंदर्भात समिती सखोलपणे चौकशी करुन, आपले काम करेलच. परंतु त्यापूर्वी आपण तातडीने काय कार्यवाही केली याबाबत सभागृहाला तीन दिवसांत सांगावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : होय.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

:: **विशेष उल्लेख** ::

पृ.शी.: निर्धार प्रतिष्ठान या संस्थेची चौकशी करण्याबाबत.

मु.शी.: निर्धार प्रतिष्ठान या संस्थेची चौकशी करण्याबाबत सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"श्री.दिपक गोविंद उपासनी, रा.2 पार्वती पॅलेस, सितागुंफा रोड, पंचवटी, नाशिक येथे राहत असून, त्यांचा मुलगा तुषार हा मतिमंद/अपंग असल्याकारणाने त्याला निर्धार प्रतिष्ठान, टोकरे-कणेर, विरार, ता.वसई, जि.ठाणे या संस्थेमध्ये देखभालीसाठी दाखल करण्यात येणे, परंतु सदर संस्थेत तुषार यांची आबाळ व दुर्लक्ष केल्याने श्री.उपासनी यांनी लागलीच आपल्या मुलाचे नाव काढून त्याला आपल्या घरी घेऊन जाणे, श्री.उपासनी यांनी निर्धार प्रतिष्ठान, टोकरे, कणेर, विरार, जि.ठाणे येथे मुलाच्या देखभालीकरिता सुमारे 40,000 रुपये भरले असून सदर रक्कम परत करावी अशी मागणी केली असता, ती निर्धार प्रतिष्ठानने नाकारल्याने श्री.उपासनी यांनी प्रतिष्ठानला नोटीस पाठविली. परंतु त्यांना उत्तर व पैसे परत न केल्याने श्री.उपासनी यांनी चॅरिटी कमिशनरकडे तक्रार केली असून, ती पडून आहे. श्री.उपासनी हे स्वत: अपंग असल्यामुळे ते स्वत: वारंवार मुंबईला येऊ शकत नाहीत. तरी श्री.उपासनी प्रकरणी चौकशी करुन त्यांचे पैसे परत मिळण्याबाबत तसेच प्रतिष्ठानची चौकशी करुन यावर निवेदन करावे, ही विनंती."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

सभापती महोदया, श्री. दीपक गोविंद उपासनी, रा.2, पार्वती पॅलेस, सितागुंफा रोड, पंचवटी, नाशिक येथे राहात असून, त्यांचा मुलगा तुषार हा मतिमंद/अपंग असल्यामुळे त्याला विरार, ता.वसई, जि.ठाणे येथील निर्धार प्रतिष्ठान येथे देखभालीसाठी दाखल करण्यात आले होते. त्याच्या देखभालीसाठी त्यांनी 40 हजार रुपये भरले होते. परंतु त्यांच्या मुलाकडे सदरहू संस्थेने आबाळ व दुर्लक्ष केल्यामुळे त्यांनी तेथून आपल्या मुलाचे नाव काढून, मुलाला आपल्या घरी आणले. संस्थेकडे मुलाच्या देखभालीसाठी जे 40 हजार रुपये भरले होते ती रक्कम परत मिळावी अशी त्यांनी संस्थेकडे मागणी केली असता, निर्धार संस्थेने पैसे देण्याचे नाकारले. अतिशय गरीब घराण्यातील ते कुटुंब आहे. वारंवार पैशांची मागणी करुनही, श्री.उपासनी यांना रक्कम मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी चॅरिटी कमिशनकडे तक्रार केली. सभापती महोदया, या संस्थेच्या बाबतीत अनेक तक्रारी आहेत. श्री.उपासनी अपंग असल्यामुळे ते वारंवार मुंबईला येऊ शकत नाहीत. तसेच चॅरिटी कमिशनकडे चौकशीचे जे प्रकरण प्रलंबित आहेत त्या प्रकरणाची चौकशी करुन, श्री.उपासनी यांचे पैसे परत मिळावे आणि निर्धार प्रतिष्ठान या संस्थेची सखोल चौकशी करुन, त्याबाबत मला निवेदन पाठवावे अशी मी या विशेष उल्लेख सूचनेच्या अनुषंगाने मागणी करीत आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे येथील ट्रक टर्मिनल व नगरनियोजन खात्याच्या भूमिकेबाबत.

मु.शी.: ठाणे येथील ट्रक टर्मिनल व नगरनियोजन खात्याच्या भूमिकेबाबत माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी पुढील विषयासंबंधीची विशेष उल्लेखाची सूचना मांडू इच्छितो.

"ठाणे येथील ट्रक टर्मिनल व नगर नियोजन खात्याच्या भूमिकेबाबत"

महोदया, ठाणे शहरातील प्रत्येकाला हे ठाऊक आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील 107, 108 आणि 109 या क्रमांकाच्या सर्व्हे नंबरच्या प्लॉटस्मध्ये ठाणे महानगरपालिकेचे ट्रक टर्मिनल असावे असा प्रस्ताव योजिला आहे.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक ..

महाराष्ट्र सरकारने गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात एक पत्र ठाणे महानगरपालिकेला पाठविले होते आणि त्यात त्यांनी असे सांगितले होते की, या विशिष्ट आरक्षित भू खंडातील जे क्षेत्रफळ आहे त्यापैकी एक विशिष्ट भाग ट्रक टर्मिनलसाठी देण्यात यावा आणि बाकीचा भू भाग हा रेसिडेशिंअल झोन म्हणून जाहीर करावा.ठाणे महानगरपालिकेने या भागातील सर्व नागरिकांची आणि पर्यावरणाची परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाला असे कळविले की," अशा प्रकारे करणे हे योग्य वाटत नाही. इस्टर्न एक्सप्रेस हाय वे, वेस्टर्न एक्सप्रेस हाय वे, भिवंडी बायपास या सर्व रस्त्यांचे जंक्शन या विशिष्ट प्लॉटवर आहे. तेव्हा सरकारने केलेल्या सूचनेप्रमाणे या प्लॉटवर रेसिडेशिअल झोन मंजूर केला तर त्या भागातील नागरिकांना जीवन जगणे कठीण होईल." या संदर्भातील सगळी कागदपत्रे आता माझ्याकडे आहेत. ठाणे महानगरपालिकेने जो ठराव केलेला आहे त्या ठरावाची प्रत, त्याचबरोबर ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाला जे उत्तर पाठविले होते त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. या सगळया गोष्टींना धाब्यावर बसवून महाराष्ट्र शासनाने जून 2005 मध्ये एक नोटिफिकेशन जाहीर केले आहे आणि त्यात त्यांनी असे सांगितले की ,"मागे आम्ही या ठिकाणी रेसिडेशिंअल झोन असावे असे म्हटलेले आहे परंतु आता त्या ठिकाणी इंडस्ट्रियल झोन असावे ". या निमित्ताने मला दोन आक्षेप उपस्थित करावयाचे आहेत.

माझा पहिला आक्षेप हा आहे की, या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नगररचना खाते असते तेव्हा त्यांना तुम्ही धाब्यावर कसे बसविता ? ती सगळे कागदपत्रे माझ्याकडे आहेत. तुम्ही परस्पर नोटिफिकेशन काढणे आणि त्यांना डायरेक्टीव्ह देणे ही गोष्ट बरोबर नाही कारण त्यांनी तसा ठराव केलेला आहे. या संदर्भात निर्णय घेत असतांना त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला विश्वासात घेणे जरुरीचे होते. माझा दुसरा आक्षेप असा आहे की, आज अनेक ठिकाणी ज्या इन्डस्ट्रियल झोन्स आहेत त्या भागातील उद्योग सीक आहेत. केवळ महाराष्ट्रातील ठाणे येथेच नव्हे तर अन्य भागातील कारखाने, गिरण्या , अनेक उद्योग बंद पडत आहेत. त्या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की,ज्याला आपण इन्डस्ट्रिअल झोन म्हणतो त्या भागातील कारखाने,उद्योग, गिरण्या काही दिवसानंतर बंद पडतील आणि ती जागा नतर बिल्डर्सना दिली जाईल. रेसिडेशिंअल झोन तेथे पुन्हा येणार आहे . त्यामुळे लोकांचे जीवन जगणे कठीण होईल. या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्र शासनाने असे उद्योग बंद करावेत.या बाबतीत मी स्वत:

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले असून त्याची पोहोच माझ्याकडे आहे. दिनांक 17 ऑक्टोबर 2005 रोजी हायकोर्टाने असा स्पष्ट निर्णय दिला की, 26 आणि 27 जुलै 2005 रोजी जलप्रलय झाला त्यामुळे पर्यावरण आणि नागरिकांचे जीवन धोक्यात आलेले आहे.सरकारने नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळू नये. तेव्हा मला अशी विनंती करावयाची आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थेला धाब्यावर बसवून एक प्रकारचा आयवॉश म्हणून केव्हा तरी भविष्यात रेसिडेशिंअल झोन निर्माण करण्याच्या दिशेने सरकारने पावले टाकू नयेत. या बाबतीत जे नोटिफिकेशन काढण्यात आलेले आहे ते मागे घ्यावे आणि ट्रक टर्मिनलसाठी हा आरक्षित भूखंड पूर्णपणे उपलब्ध करुन द्यावा त्यातून ठाणे शहरातील नागरिकांना दिलासा मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

पृ.शी : मुंबई येथील एलिंफंटा लेण्याजवळील गावांना नागरी सुविधा देणे

मु.शी : मुंबई येथील एलिफंटा लेण्याजवळील गावांना नागरी सुविधा देण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.:-

"अरबी समुद्रातील घारापुरी बेटावर वसलेली एलिफंटा लेणी हे जागतिक कीर्तिचे पर्यटन स्थळ आहे, पण येथील गावे समुद्राच्या लाटाप्रमाणेच अनेक समस्यांनीही वेढली गेली आहेत अजूनही येथे नागरी सुविधा नाहीत, त्यामुळे येथील ग्रामस्थांनी पर्यटकांना येथे पाय ठेवू देणार नाही असा इशारा दिला आहे

नेहरु पोर्ट ट्रस्टपासून अवध्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या या दूर्गम घारापुरी बेटावर राजबंदर,शेतबंदर आणि मोराबंदर अशी अडीचशे घरांची तीन गावे आहेत. येथील ग्रामस्थांना वीज ,पाणी,आरोग्य अशा नागरी सुविधा पाठपुरावा करुनही मिळालेल्या नाहीत. राज्य सरकारने याकडे नेहमी दुर्लक्ष केले आहे.

दरवर्षी या स्थळास आठ लाख पर्यटक भेट देतात. त्यापासून सरकारला दोन ते अडीच कोटींचे उत्पन्न मिळते. या तीन गावांमध्ये हजाराच्या आसपास लोकसंख्या आहे. मात्र येथे रात्री अंधारात धडपडावे लागते, पाण्यासाठी वणवण करावी लागते.

डिझेलवर चालणा-या पॉवर हाऊसचा खर्च परवडत नसल्याने ते बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या न्हावा शेवा बंदरातून पाण्याच्या खालून वीज व पाण्याची सोय करुन द्यावी किंवा नव्याने बांधण्यात येणा-या शिवडी पुलाजवळून वीज केबल द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. तरी याबाबत शासनाने त्वरित दखल घेऊन जरुर ती कार्यवाही अंमलात आणण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे. "

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुंबरे/मिठा/तालेवार. श्री. गायकवाड नंतर --- 2.40

पृ.शी. : हुतात्मा भाई कोतवाल यांचे माथेरान येथील घर भाडेकरूंनी बळकाविल्यामुळे त्यांच्या पत्नीस नातेवाईकांकडे आश्रित म्हणून रहावे लागण्याबाबत.

मु.शी. : हुतात्मा भाई कोतवाल यांचे माथेरान येथील घर भाडेकरूंनी बळकाविल्यामुळे त्यांच्या पत्नीस नातेवाईकांकडे आश्रित म्हणून रहावे लागण्याबाबत श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी 'विशेष उल्लेखाची सूचना' दिली आहे. तरी त्यांनी ती मांडावी.

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : माननीय सभापती महोदया, या विशेष उल्लेखाच्या माध्यमातुन एक दुर्दैवी घटना मी या सभागृहासमोर मांडत आहे. ज्या क्रांतीकारकांनी देशासाठी आपले प्राण पणाला लावले, आपले सर्वस्व देशासाठी वेचले आहे अशा क्रांतिकारकांची घरे राष्ट्रीय अस्मितेची प्रतिके म्हणून सांभाळली गेली पाहिजेत. परंतु दुर्दैवाने हुतात्मा भाई कोतवाल यांचे माथेरान येथील वडिलोपार्जित घर तेथील भाडेकरूंनी बळकाविले आहे. हुतात्मा भाई कोतवाल यांचे वडिलांनी त्यांचे वडिलोपार्जित घर नातू गेल्यानंतर भाड्याने दिले होते. त्यावेळी हुतात्मा भाई कोतवाल यांच्या पत्नी श्रीमती इंदिराबाई कोतवाल या आपल्या बहिणीकडे पुणे येथे रहावयास गेल्या होत्या आणि आता आपल्या आयुष्याच्या शेवटचे क्षण आपल्या पतीच्या घरामध्ये घालवावेत म्हणून त्या परत माथेरान येथे येऊन राहू इच्छितात. त्यासाठी त्यांनी आपल्याच घरातील भाडेकरूला गोडीगुलाबीने घर खाली करून देण्यास सांगितले. परंतु सदर भाडेकरू त्यांचे ऐकावयास तयार नाही आणि त्याने ते घर पूर्णत: बळकावले आहे व तो आता भाई कोतवालांच्या पत्नीस, श्रीमती इंदिराबाई कोतवाल यांना त्या घरात परत येऊ देत नाही. अशा वेळी महाराष्ट्र शासनाची ही जबाबदारी आहे, नव्हे ते एक कर्तव्य आहे की, हुतात्मा भाई कोतवाल ज्या घरामध्ये लहानाचे मोठे झाले ते त्यांचे वडिलोपार्जित घर त्यांच्या पत्नीला परत मिळवून द्यावे. श्रीमती इंदिराबाई कोतवाल आज 87 वर्षे वयाच्या आहेत तेव्हा त्यांच्या शेवटच्या दिवसात त्यांना त्यांच्या पतीच्या वडिलोपार्जित घरामध्ये रहावयास मिळावे यासाठी तरी महाराष्ट्र शासनाने कृपा करून त्यांचे माथेरान येथील घर भाडेकरूकडून दोन दिवसात परत मिळवून द्यावे जेणे करून त्यांना आपल्या आयुष्याच्या सरत्या दिवसात त्या घरात परत येता येईल व त्यांना न्याय मिळेल. धन्यवाद.

*** ..... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भोगावती नदीवरील (ता.राधानगरी,जि.कोल्हापूर) जुने बंधारे दुरूस्त करण्याबाबत.

मु.शी. : भोगावती नदीवरील (ता.राधानगरी,जि.कोल्हापूर) जुने बंधारे दुरूस्त करण्याबाबत प्रा.शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी 'विशेष उल्लेखाची सूचना' दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने या विशेष उल्लेखाद्वारा शासनाचे लक्ष एका महत्त्वाच्या विषयाकडे वेधू इच्छितो.

सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत सन 1957 मध्ये 1.70 लाख रूपये खर्चून 18 फूट उंचीवर भोगावती व दूधगंगा नदीवर कोल्हापूर टाईप बंधारा बांधला होता. भोगावती नदीवर (तालुका राधानगर, जिल्हा कोल्हापूर) का तारळे-शिरगाव, राशिवडे या ठिकाणी आणि दूधगंगा नदीवर सुळंबी, तुरंबे का वाळवे या ठिकाणी कोल्हापूर टाईप बंधारे असून हे बंधारे लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येतात. या सर्व बंधाऱ्यांवरून अवजड वाहनांची वाहतूक केली जात होती. परंतु सदर बंधाऱ्यांच्या खांबांचे दगड आता कोसळले असून उर्वरित खांबही कमकुवत झालेले आहेत. बंधाऱ्याला एकूण 20 खांब असून अनेक खांबांचे दगड कोसळलेले आहेत. खांबातून पोकळी निर्माण झालेली आहे. त्यामुळे खांब केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. या बंधाऱ्यांना संरक्षक भिंती नसल्याने त्यावरून अवजड वाहतूक करणे धोकादायक ठरत आहे. सध्या या बंधाऱ्यांवरून होणारी वाहतूक बंद असल्याने वाहनांना अनेक किलोमीटरचा फेरा मारून जा-ये करावी लागते. गेल्या 45 वर्षात संबंधित विभागाने बंधाऱ्याची कधीच डागडुजी, दुरूस्ती केलेली नसल्याने बंधारा केव्हाही कोसळण्याची भीती असल्याने तेथील जनतेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात घबराट पसरलेली आहे. तरी या विशेष उल्लेख'च्या माध्यमातून मी शासनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो आणि हे बंधारे तातडीने दुरूस्त केले जावेत व त्यावरून पूर्ववत वाहतूक सुरू होण्याच्या दृष्टीने ते सुरक्षित करण्यात यावेत.

*****

..... जीजी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : परभणी शहरात तणाव निर्माण झालेला असताना तेथील पोलीस अधिकारी मद्य प्राशन करताना आढळणे.

मु.शी. : परभणी शहरात तणाव निर्माण झालेला असताना तेथील पोलीस अधिकारी मद्य प्राशन करताना आढळणे याबाबत प्रा.श्रीमती फौजिया खान यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या प्रा. श्रीमती फौजिया खान यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदया, सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या विषयावर मी 'विशेष उल्लेखा'च्या माध्यमातून माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते.

परभणी येथे दिनांक 1 डिसेंबर 2005 रोजी सायंकाळी 7 च्या दरम्यान एका जमावाने अचानक दगडफेक सुरू केल्याने शहरातील वातावरण तंग होऊन लोकांमध्ये दहशत निर्माण झाली. परंतु परिस्थिती नियंत्रणात आणण्याची जबाबदारी ज्या पोलीस अधिकाऱ्यांवर होती त्यापैकी दोघेजण गावाच्या बाहेर एका ढाब्यावर मद्य प्राशन करण्यात मग्न होते. दरम्यान ह्या दोन पोलीस अधिकाऱ्यांची जिल्हा पोलीस अधिक्षकांनी शोधाशोध केल्यानंतर रात्री 2 च्या दरम्यान त्यांचा शोध लागला. हे दोन अधिकारी दारूच्या नशेत असल्याचे लक्षात येताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे मेडिकल करण्याचे आदेश पोलीस उपअधिक्षकांना दिले. .....

(यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ..

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रासाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

त्यानुसार पोलीस उप अधिक्षकांनी मेडिकल करण्याबाबत संबंधितांना लेखी आदेश दिल्याचे समजते. परंतु त्यानंतर नशेमध्ये असलेल्या त्या दोन पोलीस अधिकाऱ्यांनी गयावया करुन माफी मागितल्यानंतर त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई न करता त्यांना सोडून देण्यात आले. पोलीस दलातील मद्यपि कर्मचारी, अधिकाऱ्यांविरुध्द गृह मंत्रालय धडक मोहीम राबवीत असतांना या दोन पोलीस अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झाली नाही. यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली असून लोकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. पोलीस दलातील जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांनी केलेले वर्तन व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना पाठीशी घालण्याचा केलेला प्रयत्न संतापजनक असून पोलीस दलाची विश्वासार्हता जपण्यासाठी संबंधितांविरुध्द तातडीने कठोर व निपक्ष कारवाई करणे आवश्यक आहे. अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाकडे विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी राखीव असलेले पैसे बँकेमध्ये गुंतवून ठेवणे.

मु.शी. : मुंबई शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी राखीव असलेले पैसे बँकेमध्ये गुंतवून ठेवणे याबाबत मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदया, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे या शहराच्या पाणी पुरवठयाचा अतिशय भयानक प्रश्न निर्माण झालेला आहे. परंतु केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या काही चुकीच्या धोरणांमुळे या प्रकल्पाचे कसे बारा वाजले आहेत हे विशेष उल्लेखाव्दारे मांडण्यासाठी मी आपली परवानगी मागतो.

"मुंबई शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी राखीव असलेले सुमारे 1800 कोटी रुपये प्रकल्पावर खर्च न करता बँकेमध्ये गुंतवून ठेवणे, परिणामत: भातसा (तीन) (अ) व मध्य वैतरणा प्रकल्पांना परवानगी मिळाली असूनही तसेच, भातसा तीन (अ) साठी 640 कोटी रुपये व मध्य वैतरणा प्रकल्पासाठी सुमारे 1200 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून त्यासाठी 1800 कोटी रुपये राखीव असताना मुंबई महानगरपालिकेच्या व शासनाच्या उदासिनतेमुळे, मध्य वैतरणा प्रकल्पासाठी सल्लागार समिती नेमूनही प्रकल्प वेळेवर सुरु न झाल्यामुळे मुंबई रहिवाश्यांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेने सांडपाण्याची व्यवस्था सुधारण्याकरिता सुमारे सहाशे कोटी रुपयांचा ब्रीम स्टोवॅड प्रकल्प सुरु करण्यात येऊन, गेल्या 12 वर्षात त्याची फक्त 40 टक्केच अंमलबजावणी होऊन खर्च मात्र 1200 कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. मुंबई शहरातील अनधिकृत बांधकामे, वाढती लोकसंख्या, व भौगोलिक स्थिती विचारात घेंता 12 वर्षात पावसाचे प्रमाण व समुद्र पातळीत वाढ झाल्याने ब्रीम स्टोवॅड या सांडपाणी व्यवस्था प्रकल्पाचा फेरविचार करणे आवश्यक आहे, असे महानगरपालिकेला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सदर विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो".

सभापती महोदया, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मुंबई मलनिस्सारण प्रकल्पांतर्गत 35 हजार शौचालये बांधण्यासाठी जागतिक बँकेकडून 2300 कोटी रुपयांचा मेगा प्रोजेक्ट प्रतिहमीसाठी केंद्र सरकारकडे गेला. केंद्र सरकारने जागतिक बँकेला त्यावर असे उत्तर पाठविले की, महाराष्ट्र राज्य हे कर्जबाजारी असल्यामुळे महाराष्ट्र राज्याला हमी देता येणार नाही. वास्तविक मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या वेगवेगळया प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेतले होते. आणि त्याची पै न पै व्याजासकट परत केली होती. मुंबई महानगरपालिकेने जागतिक बँकेकडून कुठल्याही प्रकल्पासाठी घेतलेला निधी शिल्लक ठेवला नव्हता. रस्ते उभारण्यासाठी, आयडा 1, आयडा 2 किंवा मुंबई शहराला शुध्द पाण्याचा पुरवठा भांडूप कॉम्पलेक्समधून होतो त्यासाठी सुध्दा जागतिक बँकेकडून कर्ज घेतले होते. त्याचे पै न पै परत केले आहेत. परंतु केंद्र सरकारने मे महिन्यात जागतिक बँकेला पत्र पाठविले की, महाराष्ट्र शासन कर्जबाजारी असल्यामुळे महाराष्ट्र शासनाला या कर्जाची हमी देता येणार नाही. परिणाम असा झाला की, 1992 साली मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सांडपाणी व्यवस्था सुधारण्यासाठी तयार केलेल्या सुमारे 600 कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे 1200 कोटी रुपये झाले, आणि हा प्रकल्प बारगळला. त्याचप्रमाणे सन 2004 पर्यंत मुंबईकरांना सुमारे 455 दशलक्ष लिटर जादा पाणी मिळणे शक्य असतांना ते जादा पाणी मिळाले नाही. ही अतिशय महत्वाची गोष्ट असल्यामुळे मी शासनापुढे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडीत आहे.

धन्यवाद.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आता आपण अर्ध्या तासासाठी सुट्टी घेऊ. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.20 वाजता पुन्हा भरेल.

(2.50 ते 3.20 मध्यंतर)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी मा.उपसभापती)

पृ.शी. :माहितीचा अधिकार (निरसन) विधेयक.

L.C. BILL NO. XXI OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR REPEAL OF THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION ACT, 2002 AND FOR CERTAIN MATTERS INCIDENTAL THERETO.)

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 21 -महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, 2002 याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदय, हा ॲक्ट रिपिलिंगचा विषय आहे आपण सन 2002 ला माहितीचा अधिकार हा अधिनियम अस्तित्वात आणला. त्यानंतर आता 12 ऑक्टोबर 2005 पासून केंद्र सरकारचा कायदा अस्तित्वात आलेला आहे. त्यामुळे संसदेमध्ये केलेल्या कायद्याची व्याप्ती संपूर्ण देशभर असल्यामुळे आपल्या राज्यांनी केलेला माहितीचा अधिकाराचा हा अधिनियम निरसन करण्याचा प्रस्ताव मी या ठिकाणी मांडलेला आहे. सभागृहाला विनंती आहे की, तो मंजूर करावा.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 21 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 21 संमत झाले आहे.

--

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

एसकेके)

पृ.शी. : राज्य मागासवर्ग आयोग विधेयक.

L.C. BILL NO. XX OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR CONSTITUTION OF A STATE LEVEL COMMISSION FOR BACKWARD CLASSES OTHER THAN THE SCHEDULED CASTES AND SCHEDULED TRIBES AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 20. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती याव्यतिरिक्त इतर मागासवर्गाकरिता राज्यस्तरीय आयोग घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे आपल्याला सांविधानिक अधिकार द्यायचा आहे. या विधेयकामध्ये जाती इन्क्ल्युड व एक्सक्ल्युड करण्याचे अधिकार आपण आयोगाकडे देत आहोत...

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा अत्राम...

अशा प्रकारचे हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे . सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या प्रश्नावर अनेक वेगवेगळया योजना जरी असल्या तरी सुध्दा एका नवीन आयोगाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. मला महत्वाचे दोन मुद्दे या ठिकाणी सांगावयाचे आहेत. त्यातील पहिली गोष्ट अशी की, खंड 9 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "आयोगाने, या कलमान्वये दिलेला सल्ला किंवा केलेली शिफारस राज्य शासनावर सामान्यत: बंधनकारक असेल." सभापती महोदय, अनेक वेगवेगळया अयोगांना आपण येथे मान्यता देतो. परंतु त्या त्या विषयाची धोरणे ठरवित असतांना आयोगाला विश्वासात घेतले गेले पाहिजे. खरा प्रश्न असा आहे की, ज्या वेळेला एखादी नवीन योजना तयार होते किंवा एखाद्या योजनेची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होत नाही अशा अनेक तक्रार येतात. त्यावेळी त्या आयोगाचे मत वेळोवेळी विचारात घेतले तर मघाशी या ठिकाणी एक अतिशय महत्वाचा मुद्दा चर्चेला आला होता त्याप्रमाणे फॅक्टफाईंडिग मीशन्स वेगवेगळया चौकशा समित्या या आयोगामार्फत करता येऊ शकतात. या आयोगाला शासन कोणत्या प्रकारची साधनसामुग्री पुरविणार आहे हा एक अतिशय महत्वाचा भाग आहे.राज्य महिला आयोग, अल्पसंख्यांक आयोग आणि इतर अनेक आयोग मानव अधिकार, मानव अधिकार आयोगाच्या अध्यक्षांनी स्वत: साधनसामुग्री नाही आणि शासनाकडून कामाला वेग येत नाही म्हणून राजीनामा दिल्याचे उदाहरण आहे. म्हणून मला या ठिकाणी असे सूचवावयाचे आहे की, आयोगाच्या बाबतीत असे म्हटले आहे की, सामान्यत: शासनाची परवानगी राहील. तेव्हा या संबंधी जरुर विचार केला पाहिजे की सामान्यत: म्हणतो म्हणजे आयोगाच्या शिफारशी बंधनकारक असणार किंवा नाही? जर त्या दलितांच्या हिताच्या दृष्टीने बंधनकारक असतील आणि या दृष्टीकोनातून जे जे महत्वाचे निर्णय कॅबिनेटमध्ये होतात ते निर्णय होण्याच्या आगोदर काही काळ, दोन महिने-तीन महिने आधी धोरणात्मक चर्चा घडविण्याचा प्रयत्न देखील आयोगाच्या मार्फत झाला पाहिजे असे मला खासकरुन सांगावेसे वाटते. दुसरा जो महत्वाचा प्रश्न आहे तो असा आहे की, या विधेयकात असे म्हटले आहे की, सुमोटो अधिकारी एक-एका व्यक्तिला बोलावू शकतात आणि त्या ठिकाणी शपथेवर तपासणी करता येईल.म्हणजे एका अर्थाने सिव्हिल कोर्टाचे अधिकार आपण आयोगाला दिलेले आहेत. असे सिव्हिल कोर्टाचे

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

अधिकार असणा-या इतर आयोगाचा शासनाने रिव्हयू घेतला तर रुल्स आणि रेग्युलशनमधील त्रुटी लक्षात येतील. सरकारी अधिका-यांना ज्यावेळेला कोर्टासमोर बोलावले जाते त्यावेळी अधिकारी स्वत: येतच नाहीत उलटपक्षी स्वत:ची बदली करुन घेतात आणि आले तरी त्यांच्या बाबतीत आयोगाने कारवाईची शिफारस केली असेल तर त्याची विभागाकडून अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे आयोग व्हर्सेस पर्टीक्युलर विभाग असा वाद तयार झालेला दिसतो.म्हणून हे अधिकार देत असतांना नियम अशा पध्दतीने केले पाहिजेत की, त्याच्या अंमलबजावणीचा आढावा वेळोवेळी शासनासमोर येईल आणि नियमितपणे या आयोगाच्या कामकाजाचा अहवाल विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये मांडला जाण्याची तरतूद देखील यामध्ये केली पाहिजे, एवढेच मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. धन्यवाद.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) :माननीय सभापति महोदय, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग गठित करने के उद्देश्य से जो विधेयक इस सभागृह में पेश किया गया है उस विधेयक का मैं स्वागत करती हूं. इस विधेयक के अंदर जो जो अधिकार ओ.बी.सी. के लिए प्रस्तावित किए गए हैं उनका मैं स्वागत करती हूं.

माननीय सभापति महोदय, लोकशाही आघाडी सरकार ने हमेशा ही दलितों, पीड़ितों,शोषितों और महिलाओं के उत्थान की बात की है. और अपनी बात को कृति में लाने के लिए समय समय पर ठीक कदम उठाए हैं. महिलाओं को 33 प्रतिशत आरक्षण देने के संबंध में महाराष्ट्र राज्य देश में पहला राज्य है, इस बात का हमें फख्र है. इस संबंध में पहल करने के लिए माननीय श्री शरद पवार साहब पर हमें नाज है. इस परम्परा को आगे बढ़ाते हुए इस लोकशाही आघाडी सरकार ने राज्य के 52 प्रतिशत ओ.बी.सी. लोगों के उत्थान पर ध्यान देते हुए यह विधेयक यहां पर प्रस्तुत किया है. हमारी यह आघाडी सरकार हमेशा ही दलितों, पीड़ितों, शोषितों, अल्पसंख्यकों और महिलाओं के उत्थान के लिए कटिबद्ध रही है. लेकिन देखा यह जाता है कि जो भी कानून बनते हैं उनका इम्पलीमेंटेशन सही ढंग से नहीं होता है. जिसकी वजह से कानून अस्तित्व में होते हुए भी वे लोग अपने अधिकारों से वंचित रह जाते हैं या कह सकते हैं कि उन्हें अपने अधिकारों के लिए जूझना पड़ता है या संघर्ष करना पड़ता है. चूंकि यह विधेयक ओ.बी.सी. के हितों के संदर्भ में है इसलिए हमें देखना चाहिए कि इस विधेयक के पारित होने के बाद उन लोगों को अपने अधिकार पाने के लिए या न्याय पाने के लिए संघर्ष करने की जरुरत न पडे.

माननीय सभापति महोदय, इस आयोग के गठन के संबंध में एक बात बहुत आवश्यक है कि इस आयोग के जो सदस्य रहेंगे उन सभी सदस्यों को कास्ट बेस्ड सोशल सिस्टम का डीप नॉलेज होने की जरुरत है. क्योंकि यहां पर हमारे राज्य की बात की जा रही है इसलिए मैं कहना चाहूंगी कि लगभग पौने तीन सौ जातियां ओ.बी.सी. वर्ग में आती हैं. इन जातियों की आर्थिक, शैक्षणिक और सांस्कृतिक जानकारी के अलावा इन जातियों के बारे में डिटेल जानकारी के बगैर न तो हम उनको आयडेंटिफाय कर सकेंगे और न ही उनको यथोचित न्याय दे सकेंगे इसलिए मेरा कहना है कि आयोग के सभी सदस्यों को उन जातियों के बारे में डीप नॉलेज होना बहुत जरुरी है.इस विधेयक की कलम 3 (2) क, ख, ग, और घ में इस आयोग की रचना...

...5

प्रा. फौजिया खान....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रस्तावित की गयी है. उस रचना के बारे में हमें विशेष ध्यान देने की जरुरत है.इस विधेयक के अनुसार यह आयोग 9 सदस्यों का रहेगा. उप कलम "क" के अनुसार सर्वोच्च न्यायलय या उच्च न्यायलय के जज या रिटायर्ड जज इस आयोग के अध्यक्ष रहेंगे. उप कलम ख के अनुसार एक सदस्य अनुभवधिष्ठित संशोधन का अनुभवी समाज शास्त्र का तज्ञ व्यक्ति होगा. इसके अलावा इस आयोग का सदस्य सचिव एक ऐसा व्यक्ति होगा जो कि सामाजिक न्याय विभाग के सह संचालक पद के दर्जे से कम नहीं होगा. ये सब बात तो ठीक हैं लेकिन अध्यक्ष महोदय उप कलम "ग" में कहा गया है कि बाकी के 6 सदस्य और होंगें जिसमें ओ.बी.सी. तथा विमुक्त जाति और भटक्य जमाती का एक एक सदस्य रहेगा. मुझे लगता है कि जिस वर्ग को न्याय देने के लिए यह विधेयक यहां पर प्रस्तुत किया गया है तथा जिस वर्ग के कल्यण की बात इस विधेयक में की गई है उस वर्ग का उचित प्रतिनिधित्व इस विधेयक में दिखायी नहीं देता.इस बात की ओर मैं सदन का ध्यान आकर्षित करना चाहती हूं. इसके साथ ही सुझाव देना चाहती हूं कि इन 6 सदस्यों में से 4 सदस्य ओ.बी.सी. वर्ग के होने चाहिए ताकि उस आयोग में सभी तरह के लोगों का एक बेलेंस बना रहे तथा उस आयोग के अध्यक्ष को निर्णायक भूमिका लेना आसान हो सके. मैं आशा करुंगी कि ओ.बी.सी. वर्ग की अहमियत को देखते हुए सदन इस सुझाव पर आत्मीयतापूर्वक विचार करेगा. मैं फिर से इस विधेयक का स्वागत करते हुए अपनी बात खत्म करती हूं. धन्यवाद.

-0-

(इसके बाद श्री पी.एफ. खर्चे)...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एस.सी., एस.टी. या व्यतिरिक्त इतर मागासवर्गीयांकरिता राज्यस्तरीय आयोग गठीत करण्याकरिता तरतूद करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरिता विधानपरिषद विधेयक क्र. 20 आज या ठिकाणी कन्सीडरेशनसाठी आलेले आहे. आजकाल प्रत्येक गोष्टीसाठी सुप्रिम कोर्ट सांगते त्यावेळी शासन तसा कायदा करते. परंतु आमच्या ज्या काही यंत्रणा आहेत त्यांना स्वत:हून काही तरी करावे अशी सुबुध्दी होत नाही, ही लोकशाहीची सर्वात मोठी अडचण आहे. आज देशात देखील अशी परिस्थिती आहे की, उच्च न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले म्हणून आम्ही कायदा करतो असे सर्व राज्यांकडून सांगण्यात येते, त्यात आपलेच राज्य आहे असे नाही. परंतु एक प्रकारे अशी परंपराच निर्माण झालेली आहे व त्याचा परिणाम असा झालेला आहे की, सुप्रिम कोर्ट आणि हायकोर्ट यांनाही असे वाटायला लागले की, ही विधिमंडळे व संसद आमच्या गाईडलाईन्सवरच काम करीत आहे. वास्तविक या कायदेमंडळाच्या माध्यमातून जनतेच्या हितासाठी नवीन नवीन कायदे करणे आवश्यक असते मात्र आपण त्यासाठी कोर्टाच्या आदेशांची वाट पाहतो. ज्यावेळी देशाच्या पातळीवर मंडल आयोग मंजूर झाला, तो मंजूर झाल्यानंतर त्यात राहिलेल्या त्रुटी भरुन काढावयाच्या असतील तर शासनाने स्वत:हून पुढचे पाऊल उचलणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

यासाठी आपण कोटयावधी रुपये खर्च करीत असतो. तसेच सल्ले देणारी जी खाती आहेत त्याच्यांवर देखील आपण कोटयावधी रुपये खर्च करीत असतो. अनेक वकील मंडळी सुध्दा आपण यासाठी घेतेलेली आहेत. या सर्वांच्या माध्यमातून नवीन नवीन योजना आणून त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करुन जनतेची जास्त जास्त सोय कशी होईल, जनतेच्या अडचणी दूर करणे या ज्या आपल्याला करता येण्यासारख्या गोष्टी आहेत त्या आपण का करु शकत नाहीत? त्यामुळे मी स्वत: याबाबत संभ्रमात आहे. मग आता आपण असे ठरवून टाका की, सुप्रीम कोर्टाने आदेश दिल्याशिवाय आपण कायदेच बनवायचे नाही म्हणून. आपले राज्य सार्वभौम आहे. संपूर्ण देश सार्वभौम आहे. पार्लमेंट असो किंवा विधीमंडळ असो या ठिकाणी कायदे तयार केले जातात. कायदे कोणाच्या सल्ल्याने आपण तयार करीत नाही. मंत्र्यांना काम करतांना काही अडचणी आल्या किंवा काम करतांना सुधारणा करावयाची असेल किंवा जनतेला फायदा होईल यासाठी सदस्यांनी सूचविले तर आपण कायदे तयार करीत असतो. त्या खात्याच्या मंत्र्यांनी जनतेसाठी कायदा तयार केला तर आमचे शासन कार्यक्षम आहे, आमच्या सगळया गोष्टीवर शासनाचे लक्ष आहे, शासन जागरुक आहे अशा प्रकारची भूमिका जनतेमध्ये जाण्याची आवश्यकता असते. परंतु आज अशा प्रकारची भूमिका जनतेपर्यंत जात नाही ही दुर्दैवाची बाब आहे त्यामुळेच आज या ठिकाणी 20 नंबरचे विधेयक आणलेले आहे. या विधेयकामध्ये काही तरतूदी घेतलेल्या आहेत. विधेयकामध्ये एक संस्था नेमलेली आहे. या मुद्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी आपले विचार मांडलेले आहेत. आज आपण नवीन संस्था निर्माण करीत आहोत परंतु यामध्ये अडचण एकच आहे की, कोकण विकास महामंडळ आपण स्थापन केले आणि बंदही केले, मराठवाडा विकास महामंडळा स्थापन केले आणि आता ते महामंडळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भ विकास महामंडळ स्थापन केले आणि ते बंद करण्याचा निर्णय घेतला. आपण जी महामंडळे बंद करतो त्याची दोन कारणे आहेत एकतर या महामंडळाचे काम पूर्ण झाले आहे , विकासाचे काम पूर्ण झाले आहे म्हणून महामंडळे बदं करतो. किंवा आपल्याकडून विकास होत नाही, त्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही म्हणून आपण स्थापन केलेली विकास महामंडळे बंद करीत असतो असा याचा अर्थ होतो. माझ्या मते कोकणाचा,

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

मराठवाडयाचा आणि विदर्भाचा विकास अपेक्षेप्रमाणे अजून पर्यंत झालेला नाही. या भागांचा विकास झाला नाही, निधी मिळत नाही म्हणून आपण नेहमी सभागृहात बोलत असतो, गोंधळ घालीत असतो. निधी वाटण्यामध्ये दुजाभाव झाल्यामुळेच अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. आपल्याकडून विकास होत नसेल तर आपण ही सर्व मंडळे बंद करुन टाका. एका बाजूला आपण मंडळे बंद करीत आहोत आणि आता पुन्हा आपण एक नवीन मंडळ तयार करीत आहोत. राज्यशासन अधिनियमाखाली आयोगाची कामे कार्यक्षमतेने पार पाडली जाण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरविल असा त्यामध्ये एक क्लॉज आहे. आपल्याला कल्पना आहे की, माहितीच्या अधिकारासाठी डॉ. सुरेश जोशी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांची नेमणूक करुन बरेच महिने झालेले आहेत परंतु त्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. त्यांना स्टाफ आणि जागा सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नाही. आपण जर त्यांना सुविधा उपलब्ध करुन देत नसाल तर त्यांची नियुक्ती करावयाची व त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी तुमच्या पाठीमागे फिरावे हे योग्य आहे का? त्यामुळे या आयोगाबद्दल तीच चिंता आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, विधेयकातील पृष्ठ क्रमांक 5 वरील 4 नंबरवरील परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, राज्य शासन, या अधिनियमाखालील आयोगाची कामे कार्यक्षमतेने पार पाडली जाण्यासाठी आवश्यक असलेले अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरविल. आज अनेक संस्थेत शासनाने अधिकारी व कर्मचारी पुरविलेले नाहीत, त्यांना कोठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य पुरविले जात नाही. त्यांना बसण्यासाठी जागा दिली जात नाही. आपण चौकशीसाठी सावंत आयोगाची नेमणूक केली होती परंतु त्यांना जागा मिळण्यासाठी किती दिवस लागले होते यांची आपल्याला माहिती आहे. अशा प्रकारची नवीन मंडळे, नवीन आयोग नेमतांना प्रथम आवश्यक असलेल्या गोष्टींची पुर्तता करण्याची तयारी केली पाहिजे. .

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

नंतर कायदा पास करून त्या कामाला सुरूवात झाली पाहिजे. हा कायदा पास केल्यानंतर त्याची पूर्तता पुढच्या वर्षी होईल. याचा अर्थ कार्यक्षमतने काम करणारे शासन आहे असा होत नाही. सभागृहामध्ये कुठलाही प्रश्न उपस्थित करा त्याला समाधानकारक उत्तर दिले जात नाही. त्याचा परिणाम असा होतो की, सदनामध्ये बारीकसारीक गोष्टीवर गोंधळ होतो आणि मूळ विषयाला जो न्याय मिळायला पाहिजे तो मिळत नाही. हा कायदा पास झाल्यानंतर 6 सदस्यांना नेमून कामाला सुरूवात होईल का ? असा माझा शासनाला प्रश्न आहे. काही वर्ष झाल्यानंतर आता आपण पुन्हा नव्याने गोष्ट करण्यास सुरूवात केली आहे. नेमणुका करण्यासाठी लागणारा वेळ हा कधीही माफ करण्यासारखा नाही. तेव्हा त्यादृष्टीने शासनाने पावले उचलली पाहिजेत. या बिलामध्ये क्वालिफिकेशन व सामाजिक कामाबद्दलचा उल्लेख आहे. कुणा कुणाची नेमणूक करायची, त्यांचे वेतन, भत्ते व इतर सुविधा या विषयी अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही. अजून नियम करावयाचे बाकी आहे. मग ते नियम सदनासमोर येतील. सदर नियम बनविण्यासाठी जो कालावधी लागणार आहे, त्याचा कोणी विचार केला आहे का ? हे बिल सदना समोर श्री.सुरुपसिंग नाईक यांनी मांडलेले आहे. ते जुने जाणते, अनुभवी मंत्री आहेत. त्यामुळे ते न्याय देतील अशी आम्हाला खात्री आहे. विधेयक आणलेले आहे, पण बाकीची कितपत तयारी केली आहे ? मुलगी लग्नाला तयार आहे, लग्न ठरले, पण प्रत्यक्षात मुहूर्त कधी आहे हे कोणालाच माहित नाही. असे होऊ नये असे मला वाटते. श्री.सुरूपसिंग नाईक हे वरिष्ठ कॅबिनेट मंत्री आहेत. महाराष्ट्रामध्ये कशा पध्दतीने कामकाज होते याची त्यांना माहिती आहे. तेव्हा आपण यासंबंधी तातडीने पावले उचलणार आहात का ? असा माझा प्रश्न आहे. तसेच आर्थिक तरतूद करण्याची देखील व्यवस्था आपण वित्त मंत्र्यांना विचारून केली आहे का ? या सगळया गोष्टींची उत्तरे त्यांनी उत्तर द्यावीत. आयोगाने या कलमान्वये दिलेला सल्ला किंवा केलेली शिफारस राज्य सरकारवर सामान्यत: बंधनकारक नाही असे बिलामध्ये नमूद करण्यात आले आहे. 'सामान्यत:' या शब्दाचा अर्थ कधीही नाकारू शकतो असा होतो. कायद्यामध्ये असे शब्द वापरले जातात की, त्याचा परिणाम म्हणून बहुतेक प्रकरणे नुसती पडून राहतात. तेव्हा यासंबंधीचा उल्लेख देखील मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणात करावा. शक्य होईल तितके करण्याचा प्रयत्न करू असे म्हटले जाते. त्यासाठी मी कामगार क्षेत्रातील उदाहरण देतो. Prevention of Unfair Labour Practices Act ज्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

आपण PULP Act असे म्हणतो त्या कायद्यात अशी तरतूद आहे की, "Recognition should be granted within a period of 6 months" परंतु, प्रत्यक्ष मान्यता मिळण्यासाठी 6 ते 10 वर्षे जातात. हे प्रकरण निकालात काढले जाते तेव्हा दुसरी युनियन आलेली असते. म्हणजे विलंब करणे हा मुख्य उद्देश असतो. कालापव्यय करणे हा असतो. ज्या व्यक्तिसाठी आपण हे बदल करीत असतो त्यांना न्याय न मिळू देणे असा नकारात्मक किंवा सकारात्मक विचार असतो यासंबंधी देखील आपण खुलासा करावा. "आयोगाने या कलमान्वये दिलेला सल्ला किंवा केलेली शिफारस राज्य शासनावर सामान्यत: बंधनकारक असेल आणि राज्य शासनाने असा सल्ला किंवा अशी शिफारस पूर्णत: किंवा अंशत: नाकारली किंवा त्यात फेरबदल केले तर, राज्य शासन त्याबाबतची कारणे लेखी नमूद करील," असे बिलामध्ये नमूद केले आहे. म्हणजे संपूर्ण प्रक्रिया सुरू होईल. पुन:श्च हरिओम. विलंब हा आपल्या देशातील स्थायीभाव होऊन बसलेला आहे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

कोणतेही प्रकरण वेळेवर जात नाही. वेळेची कालमर्यादा विचारात घेतली जात नाही. एकच गोष्ट याठिकाणी दिसून येते की, सगळ्याच ठिकाणी जास्तीत जास्त कालापव्यय कसा करता येईल याचा विचार केला जातो. कलम दहा मध्ये "आयोगाचे अधिकार" दिलेले आहेत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, " राज्याच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तीला बोलावणे, उपस्थित राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करण्याचा अधिकार आयोगाला आहे. त्याच कलमात असेही म्हटलेले आहे की, आयोगास कलम 9 च्या पोट-कलम (1) खालील आपली कामे पार पाडीत असताना, एखाद्या वादाची न्यायचौकशी करीत असताना दिवाणी न्यायालयास असतात ते सर्व अधिकार असतील." हे अधिकार आयोगाला दिलेले आहेत. काही हरकत नाही. आपण फॅमिली कोर्ट सुरु केले. आज त्याठिकाणी हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. लोकांनी अर्ज केल्यानंतर ती माणसे मरण पावतात पण त्यांच्या अर्जाचा निकाल काही लागत नाही. याठिकाणी असा विलंब होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. न्याय प्रक्रिया करताना अनावश्यक तारखा दिल्या जाणार नाहीत याची दक्षता आपण घेणार आहात काय ? याचा खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, कलम 13 " लेख व लेखापरीक्षा" यामध्ये "महालेखापाल आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, महालेखापालाला शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सर्वसाधारणत: जे अधिकार, विशेषाधिकार व प्रधिकार असतात, तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील आणि विशेषत: त्याला पुस्तके, लेखे, लेख्यांशी संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल" असे म्हटलेले आहे. आपण पाहतो सहकारी सोसायटी किंवा सहकारी को-ऑप.बँक स्थापन करतो. परंतु त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर घोटाळे होतात. त्या सोसायट्यांचे किंवा बँकेचे शीर्षक " घोटाळे" असेच ठेवावे लागेल. बिहार हे घोटाळ्यांचे राज्य आहे. आता त्याठिक्राणी राजकीय परिवर्तन झालेले आहे. आता महाराष्ट्र सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

त्याच दिशेने चालला आहे. आपल्या देशाचे ब्रीदवाक्य " सत्यमेव जयते" असे आहे. ते बदलून महाराष्ट्रात "असत्यमेव जयते" असे ठेवावे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याठिकाणी जो काही निधी उपलब्ध करुन दिला जाईल त्याचा अहवाल प्रत्येक वर्षी विधानमंडळासमोर सादर केला जाईल ही चांगली गोष्ट आहे. माझ्यासमोर प्रश्न उभा आहे की, आपण नवीन गोष्ट निर्माण करताना खूप काही करतो. परंतु ती गोष्ट अस्तित्वात आल्यानंतर त्याबाबत कोणतीही काळजी घेत नाही. मंत्रिमहोदयांना स्वत:ची खाती सांभाळण्यास वेळ नाही त्यात आणखी एका नव्या खात्याची भर पडली आहे.

सभापती महोदय, कलम 17 मध्ये "राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, आयोगाशी विचारविनिमय करुन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील" असे म्हटलेले आहे. कायदा अस्तित्वात आल्यानंतर कोणते नियम असावेत, त्या नियमांचा काय परिणाम होईल, त्या नियमांमुळे किती त्रास होईल, कोणते नियम पूरक आहेत याची चर्चा नंतर होणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

पुढे असा उल्लेख आहे की, "अशी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिती, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राहयतेस बाधा येणार नाही." हा सुध्दा महत्वाचा आशय आहे. तुम्हाला स्वीकारण्याचे आणि नाकारण्याचे अधिकार ठेवण्यात आले आहेत. नाकारले तर त्याबाबतचे कारण द्यावयाचे नाही आणि स्वीकारले तर कारण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कायदा केल्यानंतर जास्तीत जास्त हीत पाहणे आवश्यक असते. कोणतीही गोष्ट आली की आधी नियम तयार करावयाचे, परंतु त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जी माणसे नेमली जातात तीच घोटाळे करतात. लोकांना न्याय मिळण्यासाठी, त्यांच्या कल्याण्यासाठी योजना राबवितो, सामान्य माणसांना समोर ठेऊन कायदा करतो, परंतु त्या योजनेची वा कायद्याची अंमलबजावणी होत नाही. खरोखर आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या जनतेला न्याय देऊ शकलो काय याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या जनतेला न्याय देऊ शकू अशा पध्दतीने कायदा तयार केला जातो. परंतु त्या कायद्याची खरोखरच अंमलबजावणी करण्यासाठी कष्टप्रद दिवस काढावे लागतात. परंतु त्यातून काहीच होत नाही. म्हणून मी तीन विकास मंडळाची मुद्दाम उदाहरणे दिलीत. आज कायदा आणि समस्या यामध्ये संघर्ष निर्माण होतो आहे, त्यामुळे शासनामार्फत समित्या गठीत केल्या जातात, सेवानिवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी केली जाते. त्यांच्यामार्फत आलेल्या अहवालावरील ए.टी.आर. मात्र समोर येत नाही. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, सहकारी बँकाच्या घोटाळयाचे प्रकरण उघडकीस आले हाते, परंतु त्यासंदर्भात जी चौकशी झाली त्याबाबतचा ए.टी.आर. समोर आला नाही. राज्यातील काही मंत्र्यांची चौकशी करण्याच्या दृष्टीकोनातून सावंत आयोग नेमण्यात आला, त्यांनी आपला अहवाल सादर केला परंतु त्यावर सभागृहात चर्चा व्हावयाची आहे. ए.टी.आर. आल्यानंतर चर्चा होईल, या अधिवेशनात तो ए.टी.आर. येतो की, नाही याबाबत मला माहिती नाही. परंतु ज्या मंत्र्यांबाबत चौकशी करण्यात आली ते मात्र आज खुशीने गाजर खात आहेत. काही मंत्र्यांनी राजीनामे दिले आहेत. देश पातळीवरील एका प्रकरणात नुकताच श्री.नटवरसिंग यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला. जोपर्यंत जा म्हणून सांगत नाही, तोपर्यंत जाणार नाही अशी भूमिका स्वीकारल्याचे हे ताजे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

उदाहरण आहे. तुम्ही स्वत: जा नाही, तर कीक देऊ, असे सांगितल्यानंतर राजीनामा दिला जातो. हा खुर्चीचा दोष आहे. एकदा खुर्चीवर बसल्यानंतर ती सोडावीशी वाटत नाही. खुर्चीवर जो बसतो तो खुर्चीला चिकटतो, मग तो कोणीही असो. खुर्ची गेली की, दुसरी वरची खुर्ची मिळण्यासाठी माणूस कृती करतो. कमीत कमी तत्वाने बोलणाऱ्या माणसाने डेकोरम सांभाळण्याची आवश्यकता आहे. स्वार्थी माणसे ज्या पक्षामध्ये जातील त्याचे उद्या कल्याणच होणार आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. हा राज्याचा, देशाचा किंबहुना जगाचा अनुभव आहे. श्री.नटवरसिंग यांना शेवटी सांगावे लागले की, तुम्ही राजीनामा दिला नाही तर तुम्हाला या पदावरुन काढावे लागेल, त्यामुळे जास्त बेईज्जती होईल, म्हणून राजीनामा देण्यात आला. सन्माननीय सदस्य मेजर सावंत यांना माहीत आहे, परंतु ते "जानकर भी अनजान" आहेत. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांचा बंगला जाळण्यात आल्याबद्दल जी चर्चा झाली होती ती मला आठवते. परंतु मी त्याबाबत आता काही सांगत नाही. विधायक पध्दतीच्या कामाचे मी या ठिकाणी स्वागत करतो. आपले राज्य प्रगत असावे असे सर्वांना वाटते, परंतु तळागाळातील माणसांना न्याय मिळण्यासाठी जो कायदा करु तो अंमलात आणण्याची कार्यक्षमता ज्यांच्यात आहे त्यांचाच तो अधिकार आहे.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..

सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी मघाशी एक उदाहरण दिले होते. आज शिव प्रताप दिन असून शासनाला ते माहीत नाही.. 31 ऑक्टोबर हा दिवस स्वर्गीय इदिरा गांधीची पुण्यतिथी आहे परंतु कॉग्रेसवाल्यांना त्याची आठवण आहे काय ?. आपल्या देशात अशी परिस्थिती निर्माण होत आहे. महान व्यक्तीची आठवण आज कोणीही ठेवत नाही. तेव्हा या विधेयकाची आठवण कोण ठेवणार आहे ? या विधेयकाची आठवण लोकांनी ठेवावी याकरता व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी याकरता आपण नियम करण्याची आवश्यकता आहे.चांगल्या व्यक्तीची तेथे निवड करण्याची आवश्यकता आहे.सर्वसाधारण व्यक्तींना जे न्याय देऊ शकतील अशाच माणसांची तेथे नेमणूंक केली जावी. त्यामध्ये वशिलेबाजी होता कामा नये. तसेच डोनेशन घेऊन कोणाचीही निवड होता कामा नये.या सगळया दृष्टीने काळजी घेण्यात आली पाहिजे. त्या ठिकाणी अशी सक्षम व्यक्ती नेमण्यात आली पाहिजे की ,पीडित व दुर्लक्षित जनतेला त्यामुळे न्याय मिळेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.धर्मराव बाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, इतर मागासवर्गाकरिता राज्यस्तरीय आयोग आपण अगोदरच स्थापन केलेला आहे आणि त्या आयोगामध्ये आठ सदस्यांची नेमणूक केलेली आहे उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. रमेश माधव बापट हे या आयोगाचे अध्यक्ष आहेत. .त्याचबरोबर या आयोगामध्ये इतर सन्माननीय सदस्य देखील आहेत. समाजशास्त्र, व्ही.जे.एन.टी. चे तज्ज्ञ ,मानववंश तज्ज्ञ हे या आयोगामध्ये सदस्य आहेत. इतर मागासवर्गीयाकरिता राज्य स्तरीय आयोग अस्तित्वात आहेत परंतु कागदे मागवावयाचे असतील किंवा मागासवर्गीयातील काही जातीचे आपल्याला अन्डर इनक्लुजन करावयाचे असेल वा ओव्हर इनक्लुजन करावयाचे असेल तर त्याकरता हे विधेयक आणलेले आहे. या आयोगाला संविधानिक दर्जा देण्याकरता हे विधेयक आणलेले आहे. या आयोगाकरता 19 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे .जास्त अधिकार देण्याचे काम विधेयकाच्या माध्यमातून आपण करीत आहोत.सध्या हा आयोग अस्तित्वात आहे. त्या आयोगाने 12 अहवाल शासनाला सादर केलेले आहेत व त्यावर शासनाने कार्यवाही केलेली आहे तसेच अजून 4 अहवाल येणार आहेत व त्यावर सुध्दा राज्य सरकार कार्यवाही करणार आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : आयोग अस्तिवात आहेत आणि त्याचे नियम करण्यात आलेले आहेत असे असतांना नियम करावयाचे आहेत असा उल्लेख आपण का केला आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : या आयोगाला जास्तीचा संविधानिक अधिकार देण्यासाठी आपण हे विधेयक येथे आणलेले आहे.वेळेवर कोणाला बोलवता यावे तसेच कागदे मागविता यावी यासाठी हे विधेयक आणले आहे. कोणाला बोलवावयाचे असेल तर त्याकरता नोटीस देऊन सुध्दा ती व्यक्ती उपस्थित राहत नाही. जर कोणाला बोलवावयाचे असेल तर पोलीस पाठवून त्याला बोलविता यावे यासाठी जास्तीचे अधिकार या आयोगाला देण्याकरता हे विधेयक आणलेले आहे. संविधानिक अधिकार त्या आयोगाला देण्याकरता हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

खंड 2 ते 18 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.धर्मराव बाबा आत्राम : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 20 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

उपसभापती :सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 20 संमत झाले आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता यानंतर अल्पकालीन चर्चेला सुरूवात होणार आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपली नावे माझ्याकडे दिलेली आहेत. ज्यांनी अल्पकालीन चर्चेच्या प्रस्तावाची सूचना दिली आहे त्या सदस्यांना देखील या चर्चेमध्ये सहभागी व्हावयाचे आहे. या चर्चेसाठी आपल्याकडे एकंदर अडीच तासांचा वेळ आहे. त्यापैकी एक तास विरोधी पक्षाला आणि एक तास सत्तारूढ पक्षाला आणि उरलेला अर्धा तास चर्चेला उत्तर देण्यासाठी मंत्र्यांना द्यावयाचा आहे. तेव्हा चर्चेसाठी असलेला कालावधी लक्षात घेऊन आपण सर्वांनी सहकार्य करावे. या चर्चेला शासनातर्फे कोण मंत्री उत्तर देणार आहेत ?

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी एका अत्यंत गंभीर आणि महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार आहे. तेव्हा त्या विषयावर उत्तर देण्यासाठी सभागृहामध्ये कोणी तरी ज्येष्ठ मंत्री असतील तर बरे होईल. वस्तुत: या विषयावर उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांनीच उपस्थित राहिले पाहिजे किंवा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी तरी येथे असायला पाहिजे इतका हा महत्त्वाचा विषय आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, खरोखरी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आणि महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा आहे. हा प्रस्ताव आम्ही दिला तेव्हा असे ठरले होते की, या चर्चेसाठी माननीय मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित राहतील.

उपसभापती : मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे आपल्या सगळ्यांच्या सूचना, भावना कळवितो. दरम्यानच्या काळामध्ये या प्रश्नाशी संबंधित असलेले राज्यमंत्री श्री. टोपे यांनी देखील सभागृहामध्ये त्वरित यावे अशी सूचना करतो. तरी प्रतोदांनी त्यांना त्वरित बोलावून घ्यावे. तोवर सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरूवात करावी.

(राज्यमंत्री श्री.टोपे सभागृहामध्ये उपस्थित होतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न.

मु.शी. : वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न याबाबत सर्वश्री जितेंद्र आव्हाड, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, उल्हास पवार, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री जयंत पाटील, अनंत तरे, सदाशिवराव पोळ, जोगेंद्र कवाडे, प्रा. फौजिया खान, श्री.मधुकर चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. राजेंद्र जैन यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो --

" महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, सीमा भागातील बेळगाव कारवारसह परिसरातील जनतेने महाराष्ट्रामध्ये सामील होण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी, सीमा भागातील जनतेवर कर्नाटक प्रशासन करीत असलेला अन्याय, अत्याचार, अनेकदा झालेली आंदोलने, आंदोलकांना वेळोवेळी करण्यात आलेली अमानुष मारहाण, महाराष्ट्रामध्ये सामील होण्यासाठी बेळगाव महापालिकेने केलेला ठराव, त्या विरोधात कर्नाटकातील दहशतवादी संघटनांनी बेळगाव महापालिकेच्या महापौरांच्या तोंडाला काळे फासून केलेला दहशतवादी हल्ला, जीवे मारण्याचा नोव्हेंबर 2005 मध्ये केलेला प्रयत्न, परिणामी राज्यातील तमाम जनतेत पसरलेला तीव्र असंतोष., त्या विरोधात राज्यातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, ठाणे इ. जिल्ह्यांमध्ये सुरू असलेली आंदोलने, या प्रकरणी वेळीच उचित निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलने करण्याचा राज्यातील जनतेने दिलेला इशारा, या सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाने खंबीर भूमिका घेऊन सीमा प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी लवकरात लवकर करावयाची उपाय योजना विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदय, तमाम महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाला आपण आज या चर्चेच्या माध्यमातून वाचा फोडतो आहोत. मला अतिशय दु:ख आहे की, माझा जन्म स्वातंत्र्य चळवळीनंतर आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर झाला. 105 हुतात्म्यांचा बळी घेऊन मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात आले. त्यापूर्वी देशामध्ये भाषावार प्रांतरचनेच्या

..... आरआर 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

चळवळीला सुरूवात झाली तेव्हा आंध्रमध्ये श्रीरामलू नावाच्या हुतात्म्याने आपल्या प्राणाचे बलिदान स्वीकारले आणि संपूर्ण भारतामध्ये ही चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली. त्यामुळे गुजरात, बंगाल, ओरिसा, केरळ ही राज्य भाषावार प्रांतरचनेनुसार करण्यात आली. सभापती महोदय, 1955 च्या दरम्यानचा हा काळ असेल. 105 हुतात्म्यांनी बलिदान केल्यानंतरच महाराष्ट्राला न्याय मिळाला. या संदर्भातील इतिहास तपासल्यानंतर असे दिसते की, 1946 साली बेळगावच्या साहित्य संमेलनामध्ये प्रथमत: मुंबईसह बेळगाव, निपाणी, कारवार आणि डांग या परिसरामध्ये असलेल्या मराठी भाषिकांचे एक राज्य, असे महाराष्ट्र राज्य व्हावे असा ठराव संमत करण्यात आला. सभापती महोदय, ज्या बेळगावमध्ये पहिल्या प्रथम हा ठराव झाला होता त्याच बेळगावचे महापौर आज या मुंबईमध्ये येऊन रडत आहेत. त्या बेळगाव-कारवार सीमाभागातील 20 ते 40 हजार मराठी बांधवांची काय भावना आहेत हे ते आम्हाला रडत सांगत असताना हृदयाला वेदना होतात. त्यांची काय चूक होती ? त्यांची काय इच्छा आहे ? 105 हुतात्म्यांच्या बलिदानानंतर मुंबई महाराष्ट्राला मिळाली. परंतु 1984 साली तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतरावदादा पाटील म्हणाले होते की, मुंबई महाराष्ट्रात आहे पण मुंबईत मराठीपण आहे असे दिसत नाही. सभापती महोदय, येथे मला स्पष्टपणे सांगावे लागेल की, मराठी माणूसच मुंबईत मराठीची गळचेपी करताना दिसतो आहे. परंतु त्याच मराठीचे अभिमानी असलेली बेळगावची माणसे, आम्हाला मराठीचा अभिमान आहे असे सांगत कर्नाटकाच्या दांडगाईला सामोरी जात आहेत. ....

(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

(यानंतर श्री.सरफरे .... एसएस 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

ही कौतुकास्पद बाब आहे. गेल्या 50 वर्षामध्ये त्या भागात लोकशाहीच्या झालेल्या सर्व निवडणुका मराठी भाषिकांनी जिंकल्या आहेत. 1956 साली त्या परिसरातील मराठी भाषिकांची संख्या जवळ जवळ 80 ते 90 टक्के होती. कर्नाटक सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न करुन त्याठिकाणी विविध कार्यालये आणली, विविध माध्यमातून त्या परिसरात कानडी लोकांची संख्या कशी वाढेल हे ठरवून मराठी माणसांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला. आज त्या परिसरात मराठी लोकांची संख्या 50 टक्क्यावर येऊन ठेपली आहे. अनंत अडचणींना ते सामोरे जात आहेत. संत ज्ञानेश्वराची बोलीभाषा व संत चोखोबांची मराठी संस्कृती व शिवरायांचा दैदीप्यमान वारसा लाभलेल्या महाराष्ट्राचे आम्ही नागरिक आहेत. गेली 40 वर्षे ज्यांनी कंठशोष केला, संघर्ष केला, लोकशाही मार्गाने कौल घेतला. त्यांच्या सर्व प्रयत्नांवर कर्नाटकी दांडगाईचा वरवंटा फिरविला जात आहे. सभापती महोदया, मी स्वत: 15 दिवसांपूर्वी एक हौस म्हणून बेळगावचा दौरा केला. मी माझ्या भाषणाला सुरुवात करतांना म्हटले की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही मराठी माणसाच्या स्वाभिमानाची चळवळ होती. बेळगाव, कारवार, निपाणी हा भाग कां लढतो आहे, हे जाणून घेण्यासाठी मी त्या परिसरात गेलो. 40 वर्षाचा इतिहास आहे. जेव्हापासून मी वर्तमानपत्र वाचत आहे. तेव्हापासून हा सीमावाद मी वाचत आलो आहे. कधी माननीय श्री. शरद पवार, कधी माननीय श्री. गोपिनाथ मुंडे तर कधी कै. श्री. दत्ता सामंत हे त्याठिकाणी गेले होते. माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी तर वारंवार याबाबत आपले भाष्य केले आहे. हे एवढे दिग्गज नेते आपल्याकडे असतांना कर्नाटकची अजून दांडगाई कां चालते? हे तेथील मंडळींच्या मुखातून ऐकावे म्हणून मी त्याठिकाणी गेलो. मी आपली ओळख करुन न देता तेथील सर्वसामान्य लोकांबरोबर चर्चा करीत होतो. इथे जर आम्ही मराठीचा आग्रह धरला तर आम्हाला प्रांतिय दृष्टीकोन ठेवतो म्हणून आमच्यावर टीका होते. परंतु त्याठिकाणी राजरोसपणे मराठी माणसावर होत असलेला अत्याचार व अन्याय बघितल्यानंतर मराठी माणसाची मने किती मोठी आहेत हे तिथे गेल्यावर कळते. तेथील मराठी संस्कृती, मराठी भाषा कायमची संपविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. मराठी शाळेत शिक्षक कानडी, तुमची भाषा कशी जीवंत रहाणार? आणि जर मराठी भाषा नसेल तर मराठी माणूस कसा रहाणार? शेवटी हा लढा मराठी भाषेचा लढा आहे. तेथील भाषा जीवंत रहावी म्हणून तेथील संस्था, शिक्षक, नागरिक

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

जाणीवपूर्वक कसोशीने प्रयत्न करीत आहेत. त्याठिकाणी तुम्हाला एकही पाटी मराठीत दिसणार नाही. मराठीत पाटी असेल तर हल्ले होतात. गेल्या 40 वर्षात तेथील जवळ जवळ 2 लाख लोकांवर गुंडगिरीचे खटले भरले. विविध खटले भरुन तेथील तरुणांना त्यामध्ये अडकविले. कानडीची सक्ती व कानडीचा वापर इतक्या बेदरकारपणे केला जात आहे की, तेथील माणूस स्वत:च्या अस्तित्वासाठी धडपडत आहे. एवढे असूनसुध्दा मराठीचा अभिमान तो बाळगत आहे, हे तुम्हा-आम्हाला गौरवास्पद आहे. नोकऱ्या नाहीत, धंदा नाही. साधा 7/12 चा उतारा घ्यायचा असेल तर तो कानडीतून घ्यावा लागतो. महसूल खात्याला किंवा महानगरपालिकेला अर्ज करावयाचा असेल तर तो कानडीमध्ये करावा लागतो. तेथील महानगरपालिकेचे दफ्तर 140 वर्षे मराठीमध्ये आहे. ते सर्व बदलण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. वास्तविक पहाता भाषावार प्रांतरचनेचा अंमल झाला त्यावेळी भौगोलिक सलगता, बहुसंख्यांक भाषिक व खेडे हे मुख्य तत्व अंमलात होते. जो इतिहास आपण वाचतो त्यामध्ये 865 खेडी आहेत. बेळगाव व महराष्ट्राची भौगोलिक सलगता कशी आहे? हे या सभागृहाला समजावून सांगण्याची आवश्यकता नाही. बहुसंख्यांक मराठी भाषिक त्यावेळी 80 टक्के होते आज ते 50 टक्के आहेत. हे असून देखील कां अन्याय होत आहे?हा प्रश्न माझ्या मनाला आजही शिवतो आहे आणि उद्याही शिवणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

म्हणून गेल्या 40 वर्षात या सभागृहात अनेक वेळा या विषयावर चर्चा झालेली आहे. मी कालच आपल्या लायब्ररीत गेलो होतो. यासंदर्भात पूर्वीच्या दिग्गजांनी जी भाषणे केली आहेत, ती पाहिली. त्यामध्ये सर्वश्री.एस.एम.जोशीसाहेब, एस.जी.पाटकरसाहेब, एन.डी.पाटीलसाहेब यांची भाषणे वाचली आणि त्यांची त्यातील भाषा पाहिल्यानंतर या संपूर्ण प्रश्नाचे गांभीर्य आपल्या लक्षात येते. पण हे सर्व पाहिले, वाचले तरीही आपल्याला हिमालय न्याय देत नाही याची मात्र खंत वाटते. राज्य कोणाचेही असो. मी आपल्याला काही उदाहरणे देतो. कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांना कै.नाथ पै यांनी पहिले निवेदन दिले. सीमावासियांच्यावतीने पहिले निवेदन कै.नाथ पै यांनी दिलेले असले तरी त्यावर पहिली सही करणारे हे माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी होते.एवढया दिग्गज मंडळींनी केलेली भाषणे काल मी वाचत होतो. त्यांनी म्हटलेले आहे की, हा अन्याय आहे,अत्याचार आहे. भाषावार प्रांतरचनेच्या मूळ हेतुचा पराभव बेळगाव, कारवारच्या बाबतीत झालेला आहे. हा पराभव गेली 40 वर्षे तेथील जनतेने का सहन करावयाचा असा प्रश्न त्यांनी विचारला तर आपण त्याचे काय उत्तर देणार आहोत ? आपण हे कटू सत्य मान्य करावयास पाहिजे की, तेथील लोकांच्या आशा-आकांक्षांची, अपेक्षांची पूर्तता महाराष्ट्रातील नेतृत्व करु शकलेले नाही. या लढाई मध्ये आज दोन पिढया गारद झाल्या आहेत, साफ झाल्या आहेत. परंतु पुढच्या दोन पिढया आशेने वाट पहात आहेत की, आता पुढे काय होणार आहे. आजही तेथील मराठी माणूस भाषेविषयी आग्रही आहे. मराठी शाळेविषयी आग्रही आहेत आणि आज किंवा उद्या आपल्याला महाराष्ट्रात जावयास मिळेल अशी स्वप्ने पहात आहेत. दोन पिढया वाट पाहून काळाच्या उदरात निघून गेल्या आणि आता पुढच्या दोन पिढया तुमच्या-आमच्याकडे आशेने पहात आहेत. अशा वेळी जर काही झाले नाही तर ते आपल्याला क्षमा करणार नाहीत, आपल्याला इतिहास माफ करणार नाही. यामध्ये सर्वपक्षीय भावना एकच आहे. त्यामुळे कोणी काय केले ? या गोष्टीमध्ये जाण्यापेक्षा तेथील लोकांच्या भावना जाणुन घेतल्यानंतरही जर दिल्ली आपले म्हणणे ऐकणार नसेल, दिल्ली दोन्ही राज्यांना सांभाळण्याचा प्रयत्न करीत असेल आणि बेळगावकरांवर अन्याय करणार असेल तर सर्वोच्य न्यायालयाचे न्यायाधीश श्री.चंद्रचूड यांनी दिलेला सल्ला आपल्याला तपासून पहावा लागेल. सर्वोच्य न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. चंद्रचूड यांनी असा सल्ला दिला होता की,

कलम 131 चा आधार घ्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेली जी राज्यघटना

. . . .2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

आहे, त्यातील कलम 131 चा आधार घ्यावा आणि सर्वोच्य न्यायालयात याचिका दाखल करावी. या बाबतीत सरकारने काय-काय केले आहे हे माहिती नाही. पण शासनाने हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. तेथील जनतेला असे वाटता कामा नये की, आम्ही अनाथ आहोत, आमच्यामागे कोणीच नाही. परंतु आज तेथील जनतेत ही भावना वाढत आहे आणि ती फार क्लेशकारक आहे, दु:खकारक आहे. मी ज्या विदर्भाच्या भूमीवरुन बोलत आहे, त्या विदर्भातील सुप्रसिध्द कवी कै.श्री.सुरेश भट यांनी आपल्या कवितेत म्हटले आहे की, "उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली." त्याठिकाणी अतिशय वाईट परिस्थिती आहे. मी कै.नाथ पै यांच्या भाषणातील एक वाक्य नमूद करु इच्छितो की, मराठी माणूस म्हणवून घेण्यासाठी, मराठी वारसा मिळविण्यासाठी, मराठी हक्क मिळविण्याकरता, मराठी शब्द बोलण्याकरता बेळगाव-कारवारच्या लोकांनी जेवढे दु:ख भोगले आहे, जेवढे बलिदान केले आहे तेवढे महाराष्ट्राच्या भूमीवरील लोकांनी बलिदान केलेले नाही, दु:ख सहन केलेले नाही. हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा लढा आहे आणि या लढयाशी महाराष्ट्रातील तमाम जनतेने प्रामाणिक रहावयास हवे आणि या लोकांना प्रामाणिकपणे साथ दिली पाहिजे. अशा प्रकारचे भाषण, अशा प्रकारची वाक्ये 1957-58 मध्ये कै.नाथ पै यांनी केलेल्या भाषणात नमूद केली होती. मला असे वाटते की, हे सर्व पाहिल्यानंतर याबाबत काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (पुढे चालू...

माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करायला हवे की त्यांनी बेळगाव महानगरपालिका बरखास्त केल्यानंतर ताबडतोब पंतप्रधानांना पत्र लिहिले. पण असे पत्र किंवा नुसती निवेदने देऊन चालणार नाही. ज्या प्रकारचा अन्याय, अत्यचार त्या मंडळींवर होत आहे, उघड्या डोळ्यांनी पहात आहोत. तेथील तरुण पिढी आपल्याकडे आशेने,अपेक्षेने पहाते आहे, ती फोल ठरु नये, अशी त्यांच्या मनामध्ये खंत आहे. त्याबद्दल आपल्या मनात काय भावना आहेत, त्या खुले आम सांगण्याची गरज आहे. मला वाटते की, एक तर आपण सार्वमताची मागणी करावी. जर गोव्याचा सार्वमतानी प्रश्न सोडवू शकतो, तर मग बेळगावचा प्रश्न का सोडवू शकत नाही ? 40 वर्षे, 45 वर्षे एकाच प्रश्ना भोवती आपण फिरतो आहोत. या प्रश्नाची आपल्याला सोडवणूकच करावयाची असेल, त्याचे उत्तर शोधायचे असेल तर त्याला अनेक मार्ग आहेत. पण प्रश्न सोडवायचाच नसेल तर जसे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब म्हणतात त्याप्रमाणे सेमिनार, डिस्कशन्स, सब कमिटी, कमिटी यामध्येच जर आपण गुंतणार असू तर आपण बेळगाव, कारवार, निपाणीमधील मराठी माणसांच्या भावनांशी खेळतो आहोत, हे स्पष्टपणाने असेच म्हणावे लागेल. थोडेसा भावनात्मक विषय आहे. आपण पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून सगळेजण एक होऊन दिल्लीला धडक देऊ या. जर हिमालयाच्या आजही मनात असे असेल की, कायम अपमानित करण्याची भूमिका आपण यशस्वी करु शकतो तर सह्याद्रीला कधी ना कधी हिमालयाला जाब विचारावाच लागेल की, आम्ही भोगण्यासाठी जन्माला आलेलो नाही. जर भाषावार प्रांत रचनेचा कोणताही बळी न देता, तमाम भारतीयांना फायदा झाला, त्याच भाषावार प्रांतरचनेचा फायदा मिळविण्याकरिता 105 हुतात्म्यांचे रक्त आम्हाला सांडावे लागले हे हा मराठी माणूस आजही विसरलेला नाही. त्यांची दांडगाई आम्ही सहन केली, पण मुंबई मिळविली, डांग गेला. मुंबई मिळाली, बेळगाव गेले, कारवार गेले, निपाणी गेले. कारवार हा तर मराठी माणसांचा संपन्न असा प्रदेश आहे. ज्यातून मोठे साहित्य निर्माण झाले. तेथे आज कानडी टोपी घालून मराठी माणसाला फिरावे लागत आहे, ही शोकांतिका आहे. या सगळ्यावर कोठे ना कोठे उपाययोजना शोधण्याची गरज आहे. हे आंदोलन गेली 40 वर्षे धगधगत आहे, पेटते आहे, अजूनही बेळगावचा मराठी माणूस उभा रहातो, ही कौतुकास्पद बाब आहे. मी सुरुवातीलाच सांगितले, तेथील मराठी माणूस मराठी भाषा टिकविण्यासाठी जगतो आणि मुंबईचा मराठी माणूस पाहिला तर मराठी शाळेतील मुलांची गळती आहे. मुंबईचा मराठी माणूस कोठे जातो, हा प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (पुढे चालू...

देखील मनामध्ये उभा रहातो. येथीलही लोक कानडी भाषा आत्मसात करु शकत होते. तेथील मराठी माणसे कानडी शाळेमध्ये जाऊ शकत होती. तेथील माणसे तेथील अत्त्याचाराविरुध्द उभे रहाण्यासाठी त्यांच्या साथीला जाऊ शकत होती. पण त्यांच्या रक्तात शिवाजी महाराजांची बंडखोरी होती. अत्त्याचार, अन्याय सहन करायचा नाही, ही त्यांची भाषा होती. ते ब्रीद त्यांनी आजपर्यन्त पाळलेले आहे. फक्त गरज ही आपल्या साथीची आहे. म्हणून आज या चर्चेला सुरुवात करतांना असे वाटते, तुमचे-माझे पक्षीय मतभेद असतील, तुमचे-आमचे वैचारिक मतभेद असतील पण काही प्रश्नांसाठी...ज्यामध्ये आपले मातीचे नाते आहे, भूमीचे नाते आहे, ज्यामध्ये आपले मायमराठीचे नाते आहे, तेथे तरी आपल्या एक भावना असायला हव्यात. मला वाटते की, एक मताना ठराव पारित व्हायला हवा. 40-50 वर्षे जे झाले ते झाले, पण यापुढे तसे होणार नाही. तुमचा-माझा एक दलित मुलगा, सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या शेतक-याचा मुलगा बेळगाव महानगरपालिकेचा महापौर होतो आणि ठराव करतो की, आम्हाला महाराष्ट्रात जाण्याची संधी द्या. पण उन्मत्त झालेले सरकारने 48 तासाच्याआत बेळगाव महानगरपालिका बरखास्त केली. अशाप्रकारची नजिकच्या काळामध्ये लोकशाहीची झालेली विटंबना मी कधीही पाहिलेली नाही. काय त्याची चुकी होती, त्यांनी काय पाप केले ? त्यांनी ठराव संमत केला आणि नंतर ते बंगलोरला बेळगावचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी गेले. पाणी हे काही फक्त मराठी माणसांनाच मिळणार नव्हते तर पाणी हे तेथील तमाम नागरिकांना मिळणार होते. पण त्या ठिकाणी बेळगावच्या महापौरांवर आणि उप महापौरांवर हल्ला झाला. त्यांना मारहाण झाली, त्यांच्या तोंडाला काळे फासण्यात आले, 360 चा गुन्हा रजिस्टर झाला. त्यांच्या बरोबरचा एक नगरसेवक या धक्क्याने हार्ट अटॅक येऊन मृत्युमुखी पडला, याला जबाबदार कोण ? म्हणून मला एवढेच म्हणायचे आहे की, यावत्चंद्र दिवा करो. मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, अशी दर्पोक्ती सांगणाऱ्या इसमांच्या घशातून मुंबई मराठी माणसाने काढून घेतली. तो बंडखोरपणा मराठी माणसाचा संपलेला नाही. तो मराठी माणूस आजही जीवंत आहे. जर बेळगावच्या साहित्य संमेलनामध्ये बेळगावचा मुख्यमंत्री बेळगाव विसरा असे सांगत असतील तर त्यांच्या घशातून बेळगाव काढण्याची ताकद मराठी माणसामध्ये आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जितंद्र आव्हाड...

त्यासाठी मराठी माणूस परत एकत्र येऊन लढला पाहिजे ही प्रामाणिक भावना या ठिकाणी व्यक्त करतो. फक्त प्रामाणिक इच्छा हीच व्यक्त करतो की, आज या सभागृहात वरचे सभागृह असो अथवा खालचे सभागृह असो महाराष्ट्राच्या आठ कोटी जनतेचे आपण प्रतिनिधीत्व करीत आहोत. त्या 8 कोटी जनतेच्या भावना आज आपण व्यक्त करीत आहोत. 8 कोटी जनता बेळगावकरांच्या मागे खंबीरपणे उभी आहे हे दाखविण्यासाठी आजचा हा ठराव एक मताने संमत करुन या पुढचे युध्द जर करावयाचे ठरविले तर दिल्लीशीही दोन हात करण्याची तयारी ठेवू या. पण बेळगावकरांना न्याय देऊ या. त्यांची घोषणा बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी आहे, ती पूर्ण करु या, एवढीच विनंती करतो व येथेच थांबतो.जयहिंद जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, आपल्या सभागृहाच्या सतत लक्षात ठेवण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत आणि या सभागृहाची जी उज्वल पंरपरा आहे त्या परंपरेप्रमाणे आज सत्तारुढ आणि विरोधी पक्षाने एकमुखाने हा ठराव सभागृहासमोर आणलेला आहे. अशी वेळ फार कमी वेळा आल्याचे आपल्याला दिसते, ज्यावेळी सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षाचे आणि विरोधी पक्षाचे एक मत होते. महाराष्ट्राकरिता अनेक हुतात्म्यांनी बलिदान केले. त्या बलिदानानंतर महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. त्यावेळी भाषावार प्रांत रचना हा राज्य निर्माण करण्याचा निकष होता आणि त्या निकषाप्रमाणे आपले राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर विशेषत: जो कर्नाटकच्या सीमेलगतचा प्रदेश होता आणि थोडा आंध्रप्रदेशचा आपल्या सीमेला लागून असलेला, सोलापूर जिल्हयाला लागून असलेला जो भाग आहे त्या भागाबाबत निर्णय करीत असतांना त्यामध्ये काही गडबड झाली. महाजन आयोगाच्या रुपाने असेल किंवा त्या वेळच्या केंद्रसरकारच्या निर्णयामुळे असेल, पण एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे की, बेळगावमध्ये बहुसंख्य मराठी माणसे आहेत. बेळगाव, कारवार आणि निपाणी. श्री. मोहिते-पाटील जेव्हा लोकसभेच्या निवडणूकीसाठी उभे होते त्यावेळी मी सोलापूरच्या काही भागात गेलो होतो. त्या भागाला लागून असलेल्या काही खेडयामध्ये परिस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणी बरेचसे मराठी भाषिक महाराष्ट्रात राहू इच्छितात. महाराष्ट्राची अस्मिता, मराठीची अस्मिता, मराठीवरचे प्रेम हे सगळे त्यांच्याकडे आहे. पण आम्ही त्यांना आपल्या राज्यात घेऊ शकत नाही, ही आमची शोकांतिका आहे.आम्ही खूप ठराव केले, समित्या केल्या, घोषणा केल्या. उच्चाधिकार समिती नेमली. बेळगावला झालेल्या साहित्य समेलनात अध्यक्षांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात अतिशय व्यथा व्यक्त केली. त्या व्यथा व्यक्त झ ाल्यानंतर पाच माणसांची हायपॉवर समिती नियुक्त करण्यात आली. मुख्यमंत्र्यांचे निवेदने गेले. प्रधानमंत्र्यंच्या भेटी झाल्या पण या प्रश्नात फार प्रगति होऊ शकली नाही. आजही मला हा प्रश्न सुटेल असा कुठेही आशेचा किरण माझ्या मनात दिसत नाही.ठीक आहे. या सभागृहामध्ये आपल्या भावना व्यक्त करुन आम्ही तुमच्या मागे उभे आहोत एवढे नैतिक धाडस आपण त्यांना देऊ या. पण अद्यापपर्यंत हा प्रश्न कसा सुटेल याबाबतीत मात्र निश्चितपणे अनेक प्रकारच्या अडचणी आपल्या समोर आहेत. त्यातील पहिला पर्याय असा की, आपण कर्नाटक सरकारबरोबर वाटाघाटी करुन हा प्रश्न सोडवू शकतो काय? आजच कर्नाटकच्या

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट मी वाचले. ते म्हणाले वाटाघाटी काय आणि चर्चा काय ? प्रश्न संपला आहे.जरी ते कॉन्ग्रेसचे मुख्यमंत्री असले आणि हा विषय जर माननीय विलासराव देशमुखांनी काढला तर ते म्हणतील चहा घ्या. नमस्कार. ते या विष्यावर बोलणे देखील पसंत करणार नाहीत.,खरे म्हणजे यात एक मार्ग असा आहे की, योगायोगाने कर्नाटकमध्ये कॉन्ग्रेसचे राज्य आहे. आणि केंद्रामध्ये कॉन्ग्रेसचे राज्य आहे. श्री. जितेंद्र आव्हाड साहेब तुम्हाला आणि मला हे नक्कीच मान्य होईल की, जर कॉन्ग्रेस पक्षाने मनात आणले, दोन्ही राज्य कॉन्ग्रेसची असल्यामुळे श्रीमती सोनिया गांधींनी जर मध्यस्थी केली तर त्यांचे आदेश पाळणारे दोन्हीही मुख्यमंत्री असल्यामुळे कदाचित सोनिया गांधी हा प्रश्न सोडवू शकतील. तेव्हा असा एक प्रयत्न करायला काही हरकत नाही.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....) पुढे सुरु.

मला असे वाटते की, माझ्या सूचनेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निश्चितपणे पाठिंबा मिळेल. कारण त्यांना ही गोष्ट माहिती आहे की, कर्नाटक आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे सोनिया गांधींचे नेतृत्व मानणारे आहेत. म्हणून या विषयावर हे दोघे दिग्गज आणि तिकडे सोनियाजी यांनी एकत्र बसून निर्णय घेतला तर हा प्रश्न सुटण्यासाठी काही तरी मार्ग निघू शकतो. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी अशा प्रकारे सोनियाजींना विनंती करावी व दोन मुख्यमंत्र्यांची बैठक आयोजित करुन या बैठकीमध्ये वाटाघाटी करुन हा सीमा प्रश्न सुटण्यासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा. मी माननीय श्री. शरद पवार यांना विनंती करीन पण त्याचा काही उपयोग होणार नाही असे मला वाटते. कारण केंद्रामध्ये त्यांना जेवढे काँग्रेस पक्षात विरोधक जास्त प्रमाणात आहेत तेवढे विरोधक विरोधी पक्षात सुध्दा नसतील. त्यांनी देशात इथेनॉल आणण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला मणिशंकर अय्यर यांनी प्रखर विरोध केला. अशा प्रकारे त्यांना विरोध आहे, म्हणून त्यांचा फायदा होईल असे वाटत नाही. तरी देखील त्यांना गळयात गळा घालून रहावे लागते. दुसरा मुद्दा म्हणजे माननीय पंतप्रधानांना आवाहन करणे. पंतप्रधानांबद्दल मला पूर्ण आदर आहे परंतु त्यांच्यापेक्षाही सुपर पंतप्रधान कोण असतील तर त्या म्हणजे सोनियाजी. हे माझे म्हणणे कदाचित आपल्यालाही मान्य असेल.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : होय, पंतप्रधानांपेक्षाही शक्तीमान हया सोनियाजीच आहेत हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. कारण काँग्रेस पक्षाच्या संसदीय बैठकीमध्ये सोनियाजींना त्या पक्षाच्या नेत्या म्हणून नेमले गेले आणि त्यानंतर दोन्ही सभागृहामध्ये कोण प्रतिनिधी रहावेत हे सोनियाजींनी ठरविलेले आहे, म्हणून आज त्याच शक्तीमान आहेत या सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या म्हणण्याशी मी सहमत आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी कृपया ही चर्चा थांबवून सीमा प्रश्नाबाबत चर्चा करावी, अशी मी त्यांना विनंती करते.

श्री. नितीन गडकरी : महोदया, सीमा प्रश्न सोडवावयाचा असेल तर दोन्ही मुख्यमंत्र्यांची एकत्र बैठक घडवून आणावी, त्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना आवश्यकता वाटली तर राणे साहेबांची देखील मदत घ्यावी, त्यांचे सहकार्य घ्यावे व यातून मार्ग काढावा. कारण आयोग आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

न्यायालयाच्या आधारावर जेवढी खिचडी व्हावयाची होती तेवढी झाली म्हणून या भागातील सार्वमत घेण्यात यावे, त्यातूनही ज्यांची इच्छा आपल्याला महाराष्ट्राबरोबर जायची असेल ते समजून येईल. सध्या देखील त्या भागात एकीकरण समितीचे पाच आमदार सतत कर्नाटक विधानसभेवर प्रतिनिधीत्व करीत आहेत. या आमदारांना त्या भागातील मराठी भाषिक निवडून देतात याचाच अर्थ असा की, त्यांची देखील इच्छा आहे. म्हणून शासनाने याबाबत त्या भागातील जनतेचे सार्वमत घ्यावे, अशी मी सूचना करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

याचाच अर्थ त्या भागातील जनतेचा जो आग्रह असतो त्याचा सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी अशा प्रकारचे वाद असतात त्या ठिकाणी सार्वमत घेतले जावे व ज्या विषयाच्या बाजूला जनता असेल तो निर्णय घेतला जावा. बहुमताचा आदर करुन निर्णय घ्यावयाचा असेल तर यासंदर्भात आपल्या मा. मुख्यमंत्र्यांनी तसा प्रस्ताव देण्यास काहीही हरकत नाही. ज्यावेळी राज्या-राज्यांमध्ये कुठल्याही प्रकारचे वाद असतील त्यावेळी केंद्रसरकार हस्तक्षेप करु शकते. केंद्रसरकार राज्यातील अंतर्गत प्रश्न असतील, पाण्याचे तंटे असतील तर त्यासाठी लवादाची नेमणूक करु शकते. अशावेळी कोर्टाची भूमिका महत्वाची ठरु शकते. सीमावादाच्या विषयाच्या संदर्भात लवाद नेमण्यात आला होता परंतु या लवादाचा निर्णय जनतेला आवडला नव्हता. मी लहान होतो त्यावेळी सुध्दा महाजन आयोगाची प्रतिके जाळण्यात आली होती. लवादाच्या निर्णयाबद्दल आदर ठेवावा या मताचा मी देखील आहे. माजी न्यायमूर्ती अशा प्रकारच्या लवादावर असतात. त्यांच्या रिपोर्टवर बोलणे योग्य नाही. महाजन आयोगाने जो अहवाल दिला त्यामुळे मराठी माणासांवर, महाराष्ट्रावर अन्याय झाला. याच्या बाबतीत तीव्र प्रतिक्रिया देखील उमटल्या होत्या. आता पुन्हा नवीन लवाद स्थापन करण्यापेक्षा सार्वमत घेऊन लोकांची जी भावना आहे त्याचा विचार केला गेला पाहिजे असे मला वाटते. बेळगावच्या साहित्य संमेलनामध्ये अध्यक्ष श्री. य.दि.फडके यांनी 17 जुलै रोजी या विषयी खंत व्यक्त केली होती. त्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला परंतु केवळ पुढाकार घेतल्यामुळे हा प्रश्न सुटेल असे नव्हे. मला या विषयाच्या संदर्भात खंत आहे, मी स्वत:च मला दोष देतो की, माननीय राज्यपालांचें अभिभाषण तयार करण्यासाठी एक समिती असते. त्या समितीमध्ये मी स्वत: 3-4 वर्षे सदस्य म्हणून काम केलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाचे सचिव भाषण तयार करीत असतात. या अभिभाषणाचे मुद्दे ठरलेले असतात. माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये "महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत माझे सरकार जागरुक असून हा प्रश्न सोडविण्यासाठी एक शिष्टमंडळ दिल्ली येथे पाठवून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल" असे वाक्य असते. थोडक्यात याला आम्ही "**टरकियामाईसिन कॅप्सूल** " असे म्हणतो. मी यासंदर्भात त्यांना विचारले की, नेहमीच हे वाक्य आपण का टाकता ? तेव्हा विभागाने सांगितले की, ही प्रथा आहे. आपण माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण वाचले तर आपल्याला हेच दिसून येईल. अध्यक्ष महोदया, एक फार वाईट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

गोष्ट घडली आहे की, बेळगावचे उपमहापौर हे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी बँगलोरला गेले असता तेथील काही मराठी द्वेष्टया लोकांनी त्यांना अत्यंत अपमानकारक वागणूक दिली, त्यांच्या तोंडाला काळे फासले. मला असे म्हणावयाचे आहे की, लोकशाही मधील संवेदना आज एवढी कमी झाली की, आता आम्ही एकमेकावरील टीकाही सहन करु शकत नाही ? मग ही कोणती लोकशाहीची प्रथा आहे? खरे तर लोकशाहीमध्ये आपला टोकाचा विरोधक जरी असला तरी त्याच्या म्हणण्याचा विचार आपण शांतपणे करुन घेणे आवश्यक आहे. स्वर्गीय पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचा लोकशाहीवर खूप विश्वास होता. ज्यावेळी लोकसभेत विरोधक कमजोर होते त्यावेळच्या आठवणी लोक अजूनही सांगत असतात. त्यावेळी विरोधी पक्षात नाथ पै, अटलबिहारी वाजपेयी यांची भाषणे जेव्हा सुरु व्हावयाची तेव्हा पंडीत जवाहरलाल नेहरु कानात तेल टाकून त्यांचा शब्दन-शब्द ऐकत असत.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

त्यांना ते ऐकण्याची गरज का होती. त्यांच्या पाठिमागे बहुमत होते, असे असले तरी त्यांच्याकडे विरोधी पक्षाकडे बघण्याची सहिष्णूता होती. तोच लोकशाहीचा सर्वात मोठा गाभा आहे. आपल्या मनाच्या विरूध्द कोणी विचार मांडले की, लगेच आक्रमण करायचे हे काही बरोबर नाही. काल आमची माननीय सभापती महोदयांच्या दालनात विधिमंडळाचे कामकाज थेट प्रक्षेपित करायचे किंवा नाही यासंबंधी चर्चा झाली. त्या अनुषंगाने प्रश्न देखील मांडले गेले. सभागृहामध्ये अप्रिय घटना घडली तर कसे होईल ? थेट प्रक्षेपणामुळे आपल्या अधिकारावर मर्यादा येईल का ? यासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे देखील उपस्थित होते. आणीबाणीमध्ये मला अटक करण्यात आली होती. मला जर अटक करण्यात आली नसती तर मी राजकारणामध्ये आलो नसतो. तेव्हा मला जेलमध्ये टाकले होते. तेव्हा पासून मी एक गोष्ट ठरविली की, वर्तमानपत्र काहीही लिहून दे, आपल्या विरूध्द लिहू दे, पण त्यांच्या अधिकारावर आपण गदा आणता कामा नये. सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.जयपाल रेड्डी यांनी फार सुंदर स्टेटमेंट दिलेले आहे. ते म्हणाले, "या देशात मीडियाचा विस्तार झालेला आहे, पण क्रेडिबिलिटी डाऊन होत चालली आहे." त्यांचे हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. आपल्या राजकीय संस्कृतीमध्ये आपण वेगवेगळया पक्षाचे असलो तरी आपले संबंध अतिशय सुदृढ असतात, चांगले असतात. आपण पक्षाच्या व्यासपीठावर बोलत असतो. आजच मी आणि श्री.आर.आर.पाटील चिटणीस पार्कमध्ये मोठया कार्यक्रमामध्ये एकत्र बसलो होतो. पण आम्ही दोघेही राजकारणावर बोललो नाही. याचे कारण कोणत्या व्यासपीठावर काय बोलावे याच्या मर्यादा आम्ही पाळल्या.

सभापती महोदय, बेळगावच्या महापौरांनी काय गुन्हा केला ? त्यांनी एक प्रस्ताव पास केला की, "बेळगावमध्ये मराठी माणसे ही बहुसंख्य आहेत, त्यामुळे बेळगाव हे महाराष्ट्राला जोडले गेले पाहिजे." हा त्यांनी काही गुन्हा केला का ? त्यांनी जो प्रस्ताव मंजूर केला त्यासाठी त्यांचा मोठा अपमान करण्यात आला. त्यांचा अपमान तर केलाच केला पण त्यांना मारहाण देखील करण्यात आली. मला या गोष्टीचे वाईट देखील वाटते. ही गोष्ट लोकशाहीला लांच्छनास्पद आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री काँग्रेसचे आहेत, म्हणून मी निषेध करीत आहे असे नाही. सदर घटना घडल्यानंतर ती दुर्दैवी आहे, त्याचा मी निषेध करतो, मी जरूर त्या ठरावाचा विरोध करतो व

...2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

या घटनेचा निषेध करतो, असे म्हणून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका जाहीर करायला पाहिजे होती. पण त्यांनी काय करावे ? या सगळया प्रकारामध्ये कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी बेळगावची महानगरपालिकाच बरखास्त केली. आपल्या बद्दलचा प्रतिकूल विचार लोकशाहीमध्ये एखाद्या महापालिकेने ठरावाच्या रुपात मांडल्यामुळे कर्नाटकच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन बेळगावची महानगरपालिका बरखास्त केली. बेळगावच्या महापालिका बरखास्तीचा विषय हा मराठी माणसाच्या दृष्टिने महत्त्वाचा आहे. लोकशाहीमध्ये लोकतांत्रिक मार्गाने निवडून आलेल्या महापौराला आणि तिथल्या महानगरपालिकेला बरखास्त करणे हे अतिशय दुर्दैवी आहे. श्री.आव्हाड साहेब तुमच्या प्रस्तावाला मी एक वाक्य जोडतो. जरूर त्याचा त्यात अंतर्भाव झाला पाहिजे. या संदर्भामध्ये मतभिन्नता असल्यावर त्याला विरोध करायला हरकत नाही. पण "लोकशाहीच्या तत्त्वांना पायमल्ली तुडवून बेळगावच्या महापौरांना बरखास्त केलेले आहे, ती कर्नाटक सरकारची कृती निषेधार्ह आहे आणि त्याचा तीव्र शब्दात ही विधान परिषद निषेध करीत आहे." हे वाक्य श्री.आव्हाड साहेब आपल्या प्रस्तावाला जरूर जोडावे. लोकशाहीमध्ये अशाप्रकारची वागणूक अभिप्रेत नाही. म्हणून मला असे वाटते की, या संदर्भामध्ये सर्वच राजकीय पक्षांनी, प्रगल्भ राजकीय नेतृत्त्वाने, लोकतांत्रिक मूल्यांवर श्रध्दा ठेवणाऱ्यांनी देखील प्रतिकिया दिली पाहिजे. लोकसभेचे डिबेट मी वाचले. कर्नाटकमधील भाजप नेत्यांच्या प्रतिक्रिया वाचल्या. कर्नाटक भाजपचे अध्यक्ष श्री.अनंतकुमार हे माझे मित्र आहेत. त्यांनी पार्लमेंटमध्ये कर्नाटकची भूमिका मांडली. त्यांना मी फोन केला आणि विचारले की, श्री.अनंतकुमारजी, बेळगांव महाराष्ट्र में रहे या कर्नाटक में रहे, यह बाद में देखा जाएगा. लेकिन आप पहले मुझे यह बताईये कि लोकतांत्रिक पध्दति से चुने गए महापौर एवं महानगरपालिका को इस प्रकार से बर्खास्त करने वाले लोकतंत्र में विश्वास रखते हैं या नहीं ? जवाब में उन्होंने कहा, यह हमारी कृति नहीं है. यह सरकार की कृति है. तो मैंने उनसे कहा कि, आप निषेध तो करो. लेकिन उन्होंने निषेध नहीं किया.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अजित....

श्री.नितीन गडकरी.....

त्यांनी मला उत्तर दिले " ये कृति हमारी नही है, सरकार की है. आम्ही त्याला म्हटले "तुम्ही निषेध करा" पण त्यांनी निषेध केला नाही. खरे म्हणजे याठिकाणी बेळगाव, मराठी माणूस, मराठी अस्मिता, हे जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच अशाप्रकारे लोकशाहीची हत्या होणे हे बरोबर नाही. आज तेथील महापौरांवर ही पाळी आलेली आहे उद्या कोणावरही येऊ शकेल. मला माहीत आहे,एखादी नगरपालिका, महानगरपालिका, साखर कारखाने, सूत गिरण्या बरखास्त होतात. काँग्रेस पक्षाचे सहकार मंत्री असतील तर ते राष्ट्रवादी पक्षाच्या बँका बरखास्त करतात. भाजप-शिवसेनेच्या असतील तर त्या बरखास्त करतात. मी अनेक वेळा नगरविकास राज्यमंत्र्यांना विनंती केलेली आहे की, तुम्हाला जेव्हा असे निर्णय घ्यावयाचे असतात त्यावेळी आपण स्वत:च्या मनाला विचारुन सद्सद्विवेकबुध्दी वापरुन का निर्णय घेत नाही ? आपण निरपराध लोकांना फासावर लटकाविता कारण आपल्याला राजकीय आदेश असतात. महानगरपालिकेने प्रस्ताव मंजूर केला म्हणून ती महानगरपालिका बरखास्त केली गेली, कर्नाटक सरकारची ही कृती लोकशाहीच्या मूळ तत्वांना एकप्रकारे काळिमा फासणारी आहे. याचा तीव्र शब्दात निषेध केला पाहिजे अशी माझी विनंती आहे. या ठरावाचे महत्व लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील अशी अपेक्षा आहे. इतक्या महत्वाच्या विषयाचे उत्तर माननीय मुख्यमंत्री देणार नाहीत तर कोण देणार ? त्यांना या विषयाचा प्रदीर्घ अनुभव आहे. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी श्रीमती सोनिया गांधी यांना मध्यस्थी करण्याची विनंती करावी. सोनिया गांधी यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांना एकत्रित बसवून चर्चा घडवून आणावी. आवश्यकता वाटल्यास अन्य सहकाऱ्यांची मदत घेण्यास हरकत नाही. राष्ट्रवादी पक्षाची मदत घ्यावी, आमची मदत घ्यावी. आम्ही सोनिया गांधींना भेटण्यास तयार आहोत. प्रश्न सुटला पाहिजे. जर बेळगावच्या मराठी माणसांना न्याय मिळणार असेल तर आम्ही कोणालाही भेटायला तयार आहोत, कोणालाही विनंती करण्यास तयार आहोत. आता माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आता जी अनुकूल स्थिती निर्माण झालेली आहे त्याचा विचार करावा. मागे तुमचे सरकार अडचणीत आले होते त्यावेळी सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी आणि जितेंद्र आव्हाड हे बंगलोरला गेले होते. त्यावेळी तुमच्या स्वागतासाठी तेथील मंत्री आले होते. आमदार स्वीमिंग टँकमध्ये पोहत होते याचे चित्रण टी.व्ही.वर दाखविले होते. नंतर ते इंदौरला गेले होते. त्या कटू स्मृती आहेत. मी आणि श्री.राणे साहेब तुम्हाला शोधत होतो. तेथील मंत्र्यांनी तुमची व्यवस्था केली होती. त्यावेळी तुमचे त्यांच्याशी दृढ संबंध झाले असतील. त्याचा तुम्हाला उपयोग करता आला तर जरुर करावा. या निमित्ताने यातून मार्ग काढण्यासाठी आपल्या मुख्यमंत्र्यांवर प्रेमाचा दबाव आपण सर्वांनी निर्माण केला पाहिजे. त्यातून मराठी माणसाला न्याय मिळाला पाहिजे. कर्नाटक सरकाच्या कृतीचा आपण निषेध केला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यातून निश्चित मार्ग काढतील. ते सोनिया गांधींना भेटतील. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक होईल आणि त्यातून काही दिलासा मिळेल, कारण दोन्ही मुख्यमंत्री सोनिया गांधींच्या शब्दाबाहेर नाहीत. सोनिया गांधी निर्णय घेतील आणि बेळगावच्या मराठी माणसाला न्याय मिळेल हा माझा विश्वास आहे. यातून मार्ग निघेल असा विश्वास व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि अन्य सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, बेळगावचे आणि माझे अतिशय जवळचे नाते आहे कारण माझा जन्म बेळगाव येथे झाला. त्याप्रमाणे मला बेळगावमध्ये अनेक वर्षे नोकरी करण्याची संधी मिळाली. मला मराठा लाईट इन्फन्ट्रीमध्ये नोकरी करण्याची संधी मिळाली. या देशात सर्वात अग्रगण्य रेजिमेंट म्हणून "मराठा लाईट इन्फ्रन्ट्रीचे" नाव घेतले जाते. प्रत्येक लढाईत शौर्य आणि मर्दुमकी गाजविणारे सैनिक हे महाराष्ट्रातील मराठा लाईट इन्फन्ट्रीमध्ये राहिलेले आहेत. मात्र या मराठा लाईट इन्फन्ट्रीचे मुख्यालय बेळगाव येथे आहे. ब्रिटीशांनी देखील मराठा लाईट इन्फन्ट्रीचे स्थान बेळगावमध्ये ठेवले होते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत....

त्या अनुषंगाने महाराष्ट्राचे आणि बेळगावचे अतूट नाते आहे हे यावरुन स्पष्ट होत आहे. मला वाटते आज जर आपण वास्तववादावर चर्चा केली तर बरे होईल. बेळगावच्या दृष्टीने जी घटना घडली ती खरोखरच निषेधार्ह आहे. या प्रश्नाबाबत आम्ही लहानपणापासून संबंधित असून, त्याबाबत संघर्ष सुध्दा केलेला आहे. परंतु आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, आता हा प्रश्न सोडवावयाचा कसा ? यातून मार्ग काढावयाचा कसा ? त्यामुळे हा प्रश्न सोडविण्याला आपण प्राधान्य दिले पाहिजे. बेळगावचा प्रश्न मुळात काय आहे याची आपण जाणीव करुन घेतली पाहिजे. बेळगांव हा एक जिल्हा आहे, बेळगांव जिल्हयाचा हा प्रश्न नाही. बेळगांव जिल्हयात अनेक कन्नड आणि मराठी भाषिक तालुके आहेत. त्या मराठी भाषिक तालुक्यांबद्दल काय प्रश्न आहेत हे आपण पाहिले पाहिजे. जेथे जेथे मराठी भाषिक तालुके आहेत आणि भौगोलिक सलगता हा जो निकष आहे त्या निकषाच्या अनुषंगाने पाहिले तर त्या तालुक्यांबद्दल फार मोठा प्रश्न आहे असे मला वाटत नाही. कारण लोकशाहीप्रणालीमध्ये कोणताही विषय सामोपचाराने सोडला जावा अशी अपेक्षा आहे. हा प्रश्न जोरजबरदस्तीने सोडविता येणार नाही. कारण आपल्या देशात लोकशाही आहे. केवळ सोनिया गांधी हा प्रश्न सोडवू शकत नाही, तर हा प्रश्न नॅशनल कन्सेन्सस्च्या माध्यमातून सुटू शकतो. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर असताना, त्या सरकारने हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न केले ? सभापती महोदया, त्या सरकारने काहीही प्रयत्न केले नाहीत. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या प्रश्नाला कृपया राजकीय बनवू नका. हा प्रश्न सोनिया गांधी, विलासराव देशमुख किंवा धरमसिंग यांची नावे घेऊन सुटणारा नाही. हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर या प्रश्नाबाबत राज्यामध्ये कन्सेन्सस् लागेल. या ठिकाणी सर्वांना आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल. राज्यामध्ये चर्चा करुन किंवा न्याय पालिकेचा आधार घेऊन हा प्रश्न सोडवावा लागेल. चर्चा करुन हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर त्याला सामोपचारानेच घ्यावे लागेल. सामोपचाराने हा प्रश्न सोडवावयाचा म्हटला तर, देवाणघेवाण या तत्वावर तो सोडवावा लागेल. मराठी भाषिक बेळगांवकर आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींमध्ये प्राधान्याने मराठी भाषिकांच्या भावना काय आहेत हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्या भावना जाणून न घेता जर या ठिकाणी निर्णय घ्यावयास बसलो तर कदाचित हा प्रश्न कधीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत....

सुटणार नाही. त्यामुळे यातील मूळ प्रश्न काय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. हा केवळ मराठी भाषिकांच्या तालुक्यांचा प्रश्न नाही, कारण तेथे मराठी भाषिकांची मेजॉरिटी आहे, मराठी भाषिक तालुका आहे, भौगोलिक सलगता आहे त्यांना काय पाहिजे आहे ते मला माहीत आहे, परंतु त्याबद्दल मी बोलत नाही. हा प्रश्न बेळगांव शहराचा आहे. बेळगांव शहरावर हा विवाद चालला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, या चर्चेच्या संदर्भात आपल्यामध्ये मतभेद आहेत असा मॅसेज बाहेर पडला तर कर्नाटक सरकार त्याचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. बेळगांव काय आहे ? कसे आहे ? हे सांगण्याची गरज नाही. या प्रश्नासंदर्भात काँग्रेस, भारतीय जनता पक्षासह सर्वांनीच साक्षऱ्या करुन, एकत्रितपणे कोर्टात जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य मेजर सावंत म्हणतात की, बेळगांवमधील अर्धे तालुके मराठी भाषिक आणि अर्धे तालुके कर्नाटक मधील आहेत, हे आम्हाला मान्य नाही.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील ...

बेळगाव शहराची फाळणी होता कामा नये अशी आमची मागणी आहे.तेव्हा त्या संदर्भात जर चर्चा होत असेल तर ते दुर्देव होईल. आजच्या चर्चेचे गांभीर्य निघून जात आहे. अशा प्रकारे जर चर्चा होत असेल तर ती आम्हाला मान्य नाही. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदया, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. मला माझी भावना मांडू द्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारचा विवाद नाही. सन्माननीय सदस्य निष्कारण उठून बोलत आहेत व त्यातून प्रश्न निर्माण करीत आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी गंभीरपणे चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांचा जन्म बेळगाव येथे झालेला आहे तसेच त्यांचे सैनिकी शिक्षण बेळगाव येथे झालेले आहे. याचा अर्थ त्यांना जास्त माहिती आहे असे कोणीही समजू नये. हा संपूर्ण प्रश्न त्या शहरापुरताच मर्यादित आहे असे त्यांनी सांगितलेले आहे. गेल्या कित्येक वर्षा पासून महाराष्ट्र एकीकरण समितीचे सात आमदार त्या भागातून निवडून आलेले आहेत.

कर्नल सुधीर सावंत : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही. माझे पूर्ण बोलणे झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड यांनी आणि मी मागणी करुन ही चर्चा या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. ही चर्चा उपस्थित करण्या मागचा मुख्य उद्देश असा होता की, तेथील महापौरावर हल्ला केला गेला तसेच तेथील महापौरांनी ठराव केला म्हणून त्यांना काळे फासले जात आहे. त्यावर चर्चा न करता वेगळया प्रकारची चर्चा होत असेल तर ती चर्चा थांबविण्यात यावी. या चर्चेचे गांभीर्य निघून जात आहे.....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सान्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

गायकवाड

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, बेळगाव तालुका हा कन्नड बहु संख्यांकाचा आहे असे` ते बोलले आहेत व ते बरोबर नाही. तेव्हा हे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी वादावादी करु नये. तसेच सन्माननीय सदस्यांनी हेही लक्षात घ्यावे की, विषयाला फाटे फुटतील किंवा वादग्रस्त मुद्दे निर्माण होतील असे बोलू नये. सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यात जर वादग्रस्त मुद्दा आला असेल किंवा विषयाला त्यामुळे बाधा येत असेल तर ते वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

कर्नल सुधीर सावंत : मी माझी भावना स्पष्ट करतो. बेळगाव शहर आणि संपूर्ण बेळगाव महाराष्ट्रात आले पाहिजे याबद्दल दुमत नाही.

नंतर श्री. सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत .....

परंतु ही वस्तुस्थिती आहे की, बेळगाव शहरामध्ये .....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य मूळ विषयाला उगीचच फाटे फोडत आहेत. आज तेथील मराठी माणूस महाराष्ट्रात येण्यासाठी सातत्याने मागणी करतो आहे .. असे असताना सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे मूळ विषयाला फाटा देऊ नये. ...

(काही सदस्य घोषणा देत 'वेल' मध्ये येतात आणि घोषणा देत राहतात .... गोंधळ ..)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागांवर जाऊन बसावे. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, बेळगाव शहर आणि बेळगावातील सर्व तालुके यांचा संयुक्त महाराष्ट्रात समावेश झालाच पाहिजे. ....

(सर्व सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात ... गोंधळ ...)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक मी 5 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित करीत आहे.

(4.57 वाजता, 5.15 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.

(यानंतर श्री.सरफरे ..... 3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृह स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी मा. सभापती)

(दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

सभापती : सर्व माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी मांडलेल्या ठरावावर सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या सर्व माननीय सदस्यांच्या भावना एकाच दिशेच्या आहेत, एकाच प्रकारच्या आहेत. परंतु या ठिकाणी बोलत असतांना माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत असे बोलले की, बेळगाव शहरामध्ये मराठी बहुसंख्यांक आहेत, ते महाराष्ट्राकडे आहे. परंतु तेथील काही तालुक्यांमध्ये कन्नड बहुसंख्यांक आहेत. त्यामुळे बेळगाव शहर हे महाराष्ट्राकडे आले पाहिजे. बेळगाव तालुका व जिल्हयाच्या बाबतीत त्यांनी केलेल्या वक्तव्यावरुन वेगळा अर्थ निघाला आहे, त्यामुळे आमच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे...

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी असे बोललो नाही. आपण पाहिजे तर रेकॉर्ड तपासून पहावे. आम्ही फक्त बेळगाव शहर घ्यायला तयार नाही. पूर्ण बेळगाव जिल्हा बेळगाव शहरासहीत आम्हाला पाहिजे..

श्री. नितीन गडकरी : नाही, आपण असे बोलला नाही. आपण बेळगाव शहराच्या बाबतीत बोललात. मी आपली क्षमा मागून सांगतो की, या विषयावर माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे जे सांगतील ते आम्ही मान्य करतो...

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, त्यांचे ऑब्जेक्शन शहराला होते. मी बोलायला गेलो त्यावेळी मला बोलू दिले गेले नाही. बेळगाव शहरासह बेळगाव आम्हाला मिळाला पाहिजे..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माझा मुद्दा मांडतो...

सभापती : याठिकाणी झालेली सर्व वक्तव्ये कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, या सभागृहामध्ये एकमताने संमत केलेल्या या ठरावाची प्रतिक्रिया ही सभागृहाबाहेर गेली पाहिजे. कर्नल सुधीर सावंत जे बोलले असतील ते काय आहे हे आपण रेकॉर्ड तपासून पहावे. पाहिजे असेलतर कॉंग्रेस पक्षाच्या प्रतोदांना सुध्दा आपण विचारावे. यावेळी सभागृहामध्ये माननीय मुख्यमत्री आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

आहेत.माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत यापूर्वी खुलासा केला आहे की, हा तालुका किंवा जिल्हयाचा मुद्दा नाही. महाराष्ट्र एकीकरण समितीने जी मागणी केली आहे तीच आपल्या महाराष्ट्र सरकारची मागणी आहे, त्याप्रमाणे तेवढा भाग महाराष्ट्राला जोडला गेला पाहिजे. त्यासंबंधीचा लवाद नेमण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. कर्नल सुधीर सावंत यांचा लवाद नेमला नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा त्यांना काही अधिकार दिलेला नाही. यासंबंधी काय स्थिती आहे ? तेथे काय पॉप्युलेशन आहे? कोणता भाग आला पाहिजे किंवा कोणता भाग यावयास नको याबाबतीत त्यांनी याठिकाणी मतप्रदर्शन करण्याची आवश्यकता नाही आणि जर तुम्ही मतप्रदर्शन करीत असाल तर तुमचे मतप्रदर्शन हे काँग्रेस पक्षाची अधिकृत भूमिका असेल तर मग करावयास हरकत नाही. तसे तुम्ही सांगा. माननीय मुख्यमंत्रीसाहेब म्हणाले की, सन्माननीय सदस्य श्री.सावंत यांची भूमिका ही आमची भूमिका आहे तर मला अडचण नाही. मग आमची,राष्ट्रवादी काँग्रेसची आणि बाकीच्या लोकांची भूमिका वेगळी आहे. त्याप्रमाणे आम्ही दुरुस्त करु. म्हणून यासंदर्भात माझी एकच विनंती आहे की, रेकॉर्डवर सन्माननीय सदस्य कर्नल सावंत यांनी जे वक्तव्य केले, त्याचे जे इंडीकेशन आहे ते असे आहे की, काही तालुके हे कन्नड बहुसंख्याक आहेत, ते कर्नाटकमध्ये जाऊ द्यावे असा त्यातून अर्थ निघत आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी असे बोललो नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्याबाबतीत रेकॉर्ड पाहता येईल.

कर्नल सुधीर सावंत : रेकॉर्ड पहावे. सभापती महोदय, माझ्या बोलण्याचा विपर्यास करण्यात येत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,मी आपल्याला विनंती केली आहे . . . .

सभापती : कर्नल सुधीर सावंतसाहेब, मी तुम्हाला बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही. आपण खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे म्हणणे चूक असेल तर मी ते मागे घेईन.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, ते माझ्याबद्दल बोलत आहेत.

सभापती : कर्नल सुधीर सावंतसाहेब, आपण प्लीज खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जर माझे म्हणणे चुकीचे असेल तर मी दिलगिरी व्यक्त करुन ते वापस घेईन. पण सन्माननीय सदस्य बोलत असताना मी, सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड आम्हा सर्वांनाच असे वाटले की, बेळगावचा काही भाग महाराष्ट्रात आणि काही भाग कर्नाटकमध्ये राहील. असा त्यातून अर्थ ध्वनित

. . . .3ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होतो. म्हणून आमची अशी विनंती आहे की, एकतर याबाबतीतील अधिकृत भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावी. दुसरे म्हणजे मघाशी रेकॉर्डवर तशा पध्दतीचे काही वाक्य आले असेल, ज्याच्यातून असा अर्थ ध्वनित होत असेल तर ते वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे. नाहीतर याचा परिणाम होऊन कारण नसताना मराठी भाषिकांच्या भावना भडकतील आणि आम्ही या सभागृहात मराठी माणसांच्या बाजूने नाही असा त्यातून बाहेर अर्थ जाईल ही गोष्ट बरोबर होणार नाही. मला वाटते की, यामध्ये दुरुस्ती झाली पाहिजे. तसा अर्थ बाहेर जाणे बरोबर नाही हा माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि आपण हे रेकॉर्ड दुरुस्त करावे अशी माझी विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यक्तीगतरित्या माझ्या बद्दल बोलल्यामुळे मला स्पष्टीकरण करावयाचे आहे.

सभापती : कर्नल सुधीर सावंत, मी तुम्हाला बोलण्यासाठी परवानगी देणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी सभापतीस्थानी बसलेल्या असताना याबाबतीत 25 मिनिटे चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी तुम्हाला बोलण्याची संधी दिली होती. त्यावेळेला तुम्ही ती संधी वापरलेली नाही.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मला माझे स्टेटमेंट पूर्ण करु द्यावे. माझा एकच खुलासा आहे की, त्या भागातील लोकांची तशी मागणी आहे पण ती आम्हाला मान्य नाही असे मी म्हणणार होतो, पण तेवढयात तुम्ही मला बोलावयाचे थांबविले.

(सन्माननीय सदस्य खाली बसून एकदम बोलतात.)

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझी भूमिका ठाम आहे की, बेळगाव-कारवारसह सर्व भाग महाराष्ट्रात समाविष्ट झाले पाहिजेत . . . .

सभापती : मी तुम्हाला तुमची भूमिका मांडण्यासाठी परवानगी दिलेली नाही. या परिस्थितीत तुम्ही ती मांडण्याचा प्रयत्न करु नये.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि इतर सन्माननीय सदस्यांनी एका महत्वपूर्ण विषयाकडे पुन्हा एकदा या सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. खरे म्हणजे 45 वर्षे होऊन गेली तरी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा लढा आज सीमा भागातील मराठी माणसांनी जिवंत ठेवलेला आहे याबद्दल आपण पहिल्यांदा त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. एवढया प्रतिकूल परिस्थितीमध्ये, एवढा त्रास होत असताना सुध्दा जिद्दीने त्यांनी . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्राबद्दलचे प्रेम, मराठी भाषेबद्दलचे प्रेम व्यक्त केले आहे. गेली अनेक वर्ष त्यांनी अनेक खस्ता, अनेक संघर्ष, अनेक अडचणी सहन केल्या आहेत आणि आजही ते सहन करीत आहेत. परंतु त्यांनी आपले म्हणणे किंवा आपला आग्रह तसूभरही कमी केलेला नाही. त्या संपूर्ण मराठी भाषिकांच्या पाठिमागे हे सार्वभौम सभागृह खंबीरपणे उभे आहे असा विश्वास या ठरावाच्या निमित्ताने आपण त्यांना देण्याची आवश्यकता आहे. अनेक वेळा आपण एकमताने, कारण याबाबत कुठेही वेगळी मते नाहीत. मग ते . . . .

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : कर्नल सुधीर सावंत . . . .

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सावंत यांचे सुध्दा आपल्या सारखेच मत आहे. पण त्यांचे वाक्य पूर्ण व्हावयाच्या आतच त्यांना थांबविण्यात आले असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे वेगळे मत असूच शकत नाही. माझे जे मत, तेच त्यांचे मत. त्यामुळे या प्रश्नाबाबत त्यांचे वेगळे मत असू शकत नाही. कोणाचेही असू शकत नाही. खरे म्हणजे या प्रश्नाची कुठलीही चर्चा आता याठिकाणी करणे याला तसा काही फारसा अर्थ आहे असे मी मानत नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे चालू.....

एवढ्यासाठीच की, जेव्हा हा प्रश्न चर्चेतून, वाटाघाटीतून, दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी एकत्रितपणे बसून सोडविण्याचा प्रयत्न करावा, तो सुटला नाही तर केंद्राने हस्तक्षेप करावा, हे सगळे प्रयत्न अनेक मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीमध्ये झालेले आहेत. त्यावेळेला मी मुख्यमंत्री असतांनादेखील असे प्रयत्न केलेले होते. परंतु आमच्या प्रयत्नाला फारसे यश आले नाही. म्हणून शेवटी उच्चाधिकार समितीने निर्णय घेतला आणि सगळे प्रकरण आपण सुप्रीम कोर्टामध्ये दाखल केले. आता मॅटर सब ज्युडिस आहे. या उच्चाधिकार समितीमध्ये सीमा भागातील सदस्यही आहेत. श्री.एन.डी.पाटील हे स्वत: त्या समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी एकत्रितपणाने बसून संपूर्ण पिटिशन तयार करुन तो सुप्रीम कोर्टामध्ये दाखल केलेला आहे. त्यासाठी चांगले वकील नेमलेले आहेत. श्री.हरिश साळवे यांची देखील या कामासाठी शासनाने नियुक्ती केलेली आहे. तसेच श्री.शिवाजी जाधव हे वकील ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड म्हणून सुप्रीम कोर्टामध्ये स्वत: काम पहात आहेत. कोर्टाने केंद्र सरकारला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नोटीस पाठविलेली होती. त्यासाठी केंद्राने वेळ मागितलेला होता. तो वेळ देण्याचे कोर्टाने मान्य केले. तेव्हा आज हा सगळा प्रश्न सबज्युडिस आहे. प्रश्नाच्या मेरिटच्या संदर्भामध्ये तुम्ही-आम्ही चर्चा करुन आपले जे काही महाराष्ट्राच्या वतीने म्हणणे आहे ते रिट पिटिशनद्वारा सुप्रीम कोर्टामध्ये दाखल केलेले असल्यामुळे, ही कायदेशीर लढाई आता लढली जाईल. त्या संदर्भात सुप्रीम कोर्ट जो काही निर्णय देईल तो आपल्या सर्वांवर बंधनकारक असणार आहे. त्यामुळे त्या मेरिटमध्ये आज आपल्याला जाण्याची गरज नाही. आज हा ठराव आणण्याची आवश्यकता का भासली ? बेळगाव महानगरपालिकेने या संदर्भात ठराव केला म्हणून तेथील सरकारने महानगरपालिका बरखास्त केली हा दुर्दैवी प्रसंग घडल्यामुळे आणि महापौरांच्या तोंडाला काळे फासले गेले. त्यानंतर बेळगाव बंद आंदोलन झाले. या सगळ्या प्रकारामध्ये तेथील लोकांना त्रास सहन करावा लागला. म्हणून तेथील लोकांचे शिष्टमंडळ येथे आले, आपल्या उपस्थितीमध्ये मुंबईमध्ये बैठक झाली. त्या बैठकीसाठी तेथील महापौर, लोकप्रतिनिधी आमदार,माजी आमदार हे सगळे आलेले होते. त्यांच्या सोबत सर्वांनी चर्चा केली. त्या चर्चेमध्ये आपण सगळयांनी सांगितले की, आम्ही सगळे तुमच्या मागे आहोत. जी काही मदत या कामामध्ये तुम्हाला लागेल, ती देण्यासाठी आम्ही सगळे सदैव तयार आहोत. हा विश्वास आपण तेथील सर्व प्रतिनिधींना सगळयांनी मिळून दिला आहे. ही घटना घडल्यानंतर मी एक पत्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना लिहिले. "अशापध्दतीने लोकशाहीमध्ये मते मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, त्याप्रमाणे कोणी एखादा ठराव केला.. तो कदाचित तुम्हाला मान्य नसेल, पण ठराव करण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झालेला आहे... लोकांनी निवडून दिलेली संस्था आहे. लोकशाहीमध्ये त्या संस्थेला तो अधिकार आहे. परंतु केवळ अशापध्दतीचा निर्णय त्यांनी केला, म्हणून ती संस्था बरखास्त करणे हा सरकारचा निर्णय योग्य नाही. त्याचा पुनर्विचार केला पाहिजे", अशाप्रकारचे पत्र मी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय मला वाटते, या विषयावरील चर्चा अजून पूर्ण झालेली नाही. अजून आमच्या पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री.विलासराव देशमुख : मी फक्त चर्चा कोणत्या दिशेने करावी, यादृष्टीने या चर्चेचा मी टोन सेट करत आहे. बेळगाव, कानडी भाषिकांचा हा विषयच आजचा नाही. म्हणून मी सांगितले की, काही वेळा त्या प्रश्नाच्याच मेरिटवर चर्चा करण्यास आपण सुरुवात करतो. त्या मेरिटवर चर्चा करण्यासाठी हा ठराव नाही. हा ठराव एवढयासाठीच आहे की, कर्नाटकातील सिमा भागातील मराठी भाषिक तुम्ही एकटे नाही, तर पूर्ण महाराष्ट्र तुमच्या मागे उभा आहे, हा विश्वास देण्यासाठी हा ठराव आहे. त्या दिशेने चर्चा व्हावी, अशी सभापती महोदय, आपल्यामार्फत माझी सदनाला विनंती राहील.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री.सुधीर सावंत यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे ते त्यांना पूर्ण करु द्यावे.

सभापती : मी निर्णय दिलेला आहे.

श्री.विलासराव देशमुख : मला असे वाटते की, जो प्रश्न येथे निर्माण झालेला आहे -सीमा प्रश्न सुटेल पण तो सुटणारा नाही.

यानंतर कु.थोरात.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, आमची विनंती आहे की, अत्यंत महत्वाची चर्चा या ठिकाणी सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या दिशेने चर्चा व्हायला पाहिजे त्या दिशेने ती होते किंवा नाही हे ऐकण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये बसावे अशी आमची विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी पहिल्यांदाच सांगितले की, माझा जन्म बेळगावमध्ये झाला आहे. त्यामुळे त्या विषयाशी मी भावनात्मकरीत्या, अत्यंत निगडीत आहे. महाराष्ट्र सीमा प्रश्नासाठी आम्ही संघर्ष केलेला आहे. आंदोलन केलेले आहे. पूर्ण बेळगाव महाराष्ट्रात असावा अशा प्रकारची भावना आम्ही सार्वजनिकरीत्या व खासगीरीत्या प्रदर्शित केलेली आहे. नगरपालिकेमध्ये त्यांनी जे कृत्य केलेले आहे ते शहरावर लक्ष केंद्रीत करुन, ते शहर वेगळे करण्याचा कन्नड भाषिकांचा मनोदय आहे. त्याचा निषेध करण्यासाठी मी बोलत होतो. आज बेळगाव शहरात कन्नड भाषिक जास्त आहेत असे त्यांचे जे म्हणणे आहे ते खोटे आहे. याचे कारण असे की, नगरपालिकेवर मराठी भाषिकांनी नेहमी कब्जा केलेला आहे.नेहमी महापौर मराठी भाषिक झालेले आहेत. म्हणून ही घटना घडली. (अडथळा) तालुक्याच्या संबंधी वाद नाही. ते मान्यच करीत आहेत. सर्व तालुके हे मराठी भाषिक आहेत त्याबद्दल कोणाचा डिसप्यूट नाही.. उगाच मला शब्द उच्चारावयाला लावू नका. ते कुठे तरी लक्ष डायव्हर्ट करावयाला मागत आहेत. म्हणून मी पहिल्यांदाच सांगितले की, हा राष्ट्रीय कनसेंससचा भाग आहे. तुम्ही म्हणत होतात श्रीमती सोनिया गांधीं यांना सांगा. श्री. विलासरावजी हे काम करतील. श्री. धरमसिंगकडून हा प्रश्न सोडवा. पण असे होत नाही. राष्ट्रीय कनसेंससवरच हा प्रश्न सुटू शकतो. (अडथळा) ते करतीलच पण तुम्ही पण पाहिजे. तुमचे नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनाही आपण विनंती करु या. ...

श्री. नितीन गडकरी :दिल्लीला आमचे सरकार होते तेव्हा कर्नाटकात कॉन्ग्रेसचे सरकार होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख दोघेही अतिशय चांगले मित्र आहेत.ज्यावेळी महाराष्ट्र सरकारवर संकट आले त्यावेळी सगळे आमदार तिकडे गेले होते. त्यांचे संबंध अतिशय चांगले आहेत. दोघेही श्रीमती सोनिया गांधी यांचे नेतृत्व मानणारे आहेत. श्रीमती सोनिया गांधी यांनी दिलेल्या आदेशांचे दोघेही पालन करतील अशी अतिशय गोल्डन ॲपॉर्च्युनिटी सध्या आहे. या ॲपॉर्च्युनिटीचा उपयोग करुन मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

पुढाकार घ्यावा असे मी म्हटले. मुख्यमंत्री प्रश्न सोडवायला तयार आहेत. तुम्ही कशाला मध्ये पडत आहात.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सर्व पक्षामध्ये जोपर्यंत कनसेंसस होत नाही. (अडथळा) कर्नाटक आणि भाजपने सुध्दा हे मान्य केले पाहिजे. फक्त आम्ही मानून चालणार नाही. माझा म्हणण्याचा उद्देश तोच होता की, ...

सभापती : सदस्यांनी माझ्याकडे बघून बोलावे.

कर्नल सुधीर सावंत :शेवटचा सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, हा पूर्ण विषय सब्ज्युडीस आहे. त्यामुळे फार काही बोलायचे असे यामध्ये राहिले नाही. विरोधी पक्षातील सदस्यांनी या ठिकाणी असे मुद्दे मांडले की, श्रीमती सोनिया गांधीनी हा प्रश्न सोडवावा. पण माझे एकच म्हणणे आहे की, राष्ट्रीय आणि राज्यातील सर्व पक्षाचे लोक या प्रश्नाच्या बाबतीत एकत्र आले असते तर सोल्यूशन निघाले असते. पण आज परिस्थिती अशी आहे की, या विषयाच्या बाबतीत ज्युडिशिएल सोल्यूशन शिवाय दुसरे कुठलेही सोल्यूशन दिसत नाही. त्याच सोल्यूशनकडे आपण गेले पाहिजे. मला शेवटी एवढेच सांगावयाचे आहे की, जो प्रकार कर्नाटकात महापौरांबरोबर आणि मराठी भाषिकांबरोबर झाला तो अत्यंत निषेधार्ह आहे. भारताच्या कुठल्याही राज्यामध्ये कुठल्याही शहरामध्ये अशा प्रकारची घटना घडू नये. त्या घटनेचा आपण सर्वांनी जाहीरपणे निषेध केला पाहिजे एवढेच या प्रसंगी सांगून मी या ठरावाला पाठिंबा देतो, व माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आली आहे, त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या ठिकाणी बेळगांव, कारवार, निपाणी हा संपूर्ण भाग महाराष्ट्रात यावा यासंबंधीची चर्चा चालू आहे. मध्यंतरी बेळगांवमध्ये महापालिकेने एकमताने ठराव पास केला की, हा भाग महाराष्ट्रामध्ये विलीन व्हावा परंतु कर्नाटक सरकारने त्यांना जी वागणूक दिली ती अत्यंत लांच्छनास्पद आहे. या घटनेनंतर कर्नाटकच्या उत्साही लोकांनी ज्या पध्दतीने बेळगाव महापालिकेच्या महापौरांना वागणूक दिली, त्यांच्या तोंडाला काळे फासले हा विषय अतिशय निंद्य आहे, हा संघर्ष या प्रकरणाचा एक भाग असला तरी तो कोणत्या टोकाला आणून उभा करावयाचा याचा संयम खरे म्हणजे तेथील जनतेने पाळायला पाहिजे होता, तो पाळला गेला नाही म्हणून ही लाट उभी राहिली आहे. दिनांक 21 नोव्हेंबर, 1955 रोजी या आंदोलनाने प्रथम पेट घेतला त्यावेळी मी अकरावीत शिकत होतो. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन पेटलेले होते, मोरारजी देसाई मुख्यमंत्री होते व त्यांनी शुट ॲट साईट अशा ऑर्डर्स दिलेल्या होत्या. त्यामध्ये माझ्याच वर्गातील श्री. सिताराम बनाजी पवार नांवाच्या एका मुलाला गोळी लागून तो पहिला हुतात्मा झाला, सुदैवाने मला गोळी लागली नाही म्हणून मी बचावलो. त्याच आंदोलनामध्ये माझ्या वर्गातील एक दुसरा घाडीगांवकर नांवाचा मुलगा देखील मारला गेला असा हा इतिहास माझ्या डोळयासमोर घडलेला आहे, मी त्याचा साक्षीदार आहे. गेली 50 वर्षे मी या प्रश्नाशी निगडीत आहे. हा प्रश्न पुढे न्यावा म्हणून सन 1969 साली आमच्या संघटनेने आंदोलन केले आणि त्या आंदोलनामध्ये जवळपास 69 शिवसैनिकांना आपले बलिदान द्यावे लागले. त्यावेळी मोरारजी भाई उप पंतप्रधान होते. ते ज्यावेळी मुंबईला आले त्यावेळी माहिमच्या नाक्यावर त्यांना अडवून आम्ही एक निवेदन देणार होतो. ...अडथळा..... सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुळकर्णी यांना कदाचित समजले नसेल मी त्यांना सांगू इच्छितो की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत झालेले दोन हुतात्मे आणि सन 1969 साली झालेले 69 शिवसैनिकांचे हुतात्मे हया दोन्ही घटना वेगळया आहेत, मी फक्त पार्श्वभूमी म्हणून थोडक्यात तो प्रसंग सांगितला. या बेळगांव-कारवारच्या आंदोलनातील हे हुतात्मे आहेत. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांना देखील बंद करण्यात आले होते, मनोहर

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

जोशी सह अनेक नेते तुरुंगात होते. त्यावेळी आमची या आंदोलनाच्या संदर्भात बैठक झाली होती त्यावेळी आपल्या राज्याचे गृहमंत्री श्री. कल्याणराव पाटील हे होते. त्यांनी तुरुंगात येऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली हे आंदोलन थांबविण्याबाबतचा फतवा काढा अशा प्रकारचा सल्ला दिला. या अंडरस्टँडिंगमुळे हे आंदोलन थांबविण्यात आले परंतु या संपूर्ण आंदोलनामध्ये 69 शिवसैनिकांचे बळी गेले. त्या इतिहासाचा मी एक साक्षीदार म्हणून हे जबाबदारीने बोलत आहे. त्यानंतर दुसरी घटना म्हणजे आमच्या भागातील रस्त्यावर त्यावेळी शिवसैनिकांनी "बेळगांव, कारवार निपाणी महाराष्ट्राचा, नाही कुणाच्या बापाचा" ही घोषणा लिहिली होती. त्यावेळी त्या भागातील इनस्पेक्टर श्री. एल.आर.पाटील हे आपल्या स्कुटरवरुन चालले होते, त्यांनी शिवसैनिकांना हे लिहितांना पाहिले, त्यांना लाठया मारल्या व तेथून जाण्यास सांगितले. योगायोगाने मला ही घटना समजल्यानंतर मी त्या ठिकाणी गेलो. मी या लोकांना सांगितले की, तुम्ही येथेच उभे रहा, ते इनस्पेक्टर पुन्हा या ठिकाणाहून येतील. थोडया वेळात ते आले आणि त्या शिवसैनिकांना तेथेच उभे असल्याचे पाहून म्हणाले की, " काय रे भडव्यांनो, तुम्हाला सांगितले ते कळले नाही काय ?" मी चटकन् त्यांच्या पुढयात गेलो आणि म्हणालो की, तुम्हाला तुमच्या बापाबद्दल शंका असेल तर जाऊन चौकशी करा, ही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आहे, बेळगांव, कारवार आमच्या बापाचा आहे म्हणून आम्ही हे लिहीलेले आहे. अशा प्रकारे या संघर्षाची ही एक ठिणगी होती, हा जिवंत इतिहास आजही माझ्या डोळयासमोर आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

यासंदर्भातील जो इतिहास आहे तो सगळा मला तोंडपाठ आहे त्याचे कारण म्हणजे या आंदोलनामध्ये आम्ही भाग घेतला होता. आम्ही ज्यावेळेस चळवळीमध्ये भाग घेतला होता त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचा जन्म देखील झालेला नव्हता. परंतु त्यांच्या महाराष्ट्र सीमावादाच्या संदर्भातील भावना अतिशय तीव्र आहेत. महापौरांना ज्या प्रकारची वागणूक दिली गेली त्याबद्दल सन्माननीय सदस्य जितेंद्र आव्हाड यांच्या भावना किती तीव्र आहेत हे मी समजू शकतो. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र आंदोलनाने पेटला होता त्यामुळे त्यावेळच्या लोकांच्या भावना किती तीव्र असू शकतील याची त्यांना कल्पना येईल. मुंबईच्या चौपाटीवर एकदा श्री. स.का.पाटील म्हणाले होते की, "यावश्चंद्रौ दिवाकरौ" मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही. त्यावेळी आम्ही त्यांच्या अंगावर पायातील फाटक्या चपला फेकल्या होत्या. आज मी इतक्या वर्षाने हे बोलतो आहे त्याचे कारण म्हणजे आता त्यावर बोललो तरी पोलीस ॲक्शन घेण्यासाठी येणार नाहीत. त्यावेळी पोलीस पाळतीवरच असायचे. कोणी काही बोलले की, पोलीस त्याला उचलून तुरुंगात डांबत असत. कामराव नावाचे त्यावेळी एस.पी. होते त्यांनी आमच्या लोकांना लाफा घातल्या होत्या. माझ्या भावाने या एसी.पी. ला लाथ मारुन त्याला उलटे ओढून नेले होते. ही जी गोष्ट आहे ती सेंट्रल सिनेमाजवळची आहे. आता हा एसी.पी रिटायर्ड झालेला आहे. अशा अनेक गोष्टी आमच्या बाबतीत घडून गेलेल्या आहेत त्या गोष्टी येथे सांगण्याची ही जागा नाही. परंतु ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा इतिहास समोर उभा राहतो, मुळत: चळवळीमध्ये कसे वागावे, निवडणूकीत कसे काम करावे, नेत्यांच्या पाठी कसे जावे, कोणत्या गोष्टीची पथ्ये पाळावीत, कोणती पाळू नयेत यासंदर्भातील आम्हाला जे ट्रेनिंग मिळाले ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून मिळालेले आहे. बेळगाव, कारवारच्या निवडणूकीसाठी मी, बाळासाहेब, एस.एम.जोशी स्वत: प्रचारासाठी गेलो होतो. तेथील जनता आम्हाला सांगत होती की, तुम्ही या या उमेदवाराला मते द्या असे सांगण्यासाठी येऊ नका, आम्ही त्यांना मते देणारच परंतु तुम्ही बेळगाव महाराष्ट्रात कधी आणणार आहात याचे उत्तर द्या. तेव्हापासूनचा जो ज्वलंत प्रश्न आहे तो आजपर्यंत सुरुच आहे. आजचा ठराव हा एकमुखी व्हावा एवढीच आमची इच्छा आहे. आंदोलनापासून आम्ही का दूर झालो याची अनेक कारणे होती ती आता येथे सांगून सभागृहाचा वेळ घेत नाही. सत्याग्रहामध्ये आमच्या अनेक लोकांनी भाग घेतला होता. त्यावेळी माननीय छगन भुजबळ आमच्या बरोबर होते.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आता ते राष्ट्रवादीमध्ये आहेत. त्यांनी किती ठिकाणी फिरायचे हा त्यांचा प्रश्न आहे. हुतात्मा स्मारक झाले त्यावेळी भुजबळ हे महापौर होते. यासंदर्भातील संपूर्ण निधी त्यांनी वापरुन फ्लोरा फाऊंटन येथे हुतात्मा स्मारक उभे केले. त्या दरम्यान दलित वर्गाचे मोठे आंदोलन झाले होते. त्या आंदोलनामध्ये काही लोकांनी त्यावर लघूशंका केल्या होत्या त्यामुळे हा संपूर्ण विषय नष्ट व्हावा या उद्देशाने गोमुत्राने संपूर्ण हुतात्मा स्मारक धुवून काढण्यात आले होते, त्यावेळी भुजबळ हे महापौर होते. यातील कडवटपणा मला येथे मांडावयाचा नाही. सीमावादाची भावना किती तीव्र आहे हेच मला येथे सांगावयाचे आहे. 1980 साली त्यावेळी बेळगावमधून 5 आमदार निवडून आले होते आणि आता तेथून फक्त एक आमदार निवडून येतो आहे. दिवसेंदिवस येथील मराठी माणसांची संख्या कमी होत चालली आहे. या ठिकाणच्या मराठी भाषिकांवर कानडीची सक्ती केली जात आहे. शाळेत कानडी भाषा शिकलीच पाहिजे अशा प्रकारचा आग्रह केला आहे. या ठिकाणी मराठी भाषिकांवर अन्याय चालला आहे . या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री म्हणाले आहे की, कर्नाटकाशी इ ागडणा-या बेळगावच्या मराठी भाषिकांच्या भावनेपासून, त्यांच्या आग्रहापासून आम्ही तसूभरही ढळलो नाहीत. 50 वर्षापासून येथील जनता महाराष्ट्राकडे डोळे लावून बसली आहे असे असतांना आम्ही येथे आपापसात बारीकसारीक गोष्टीवर चर्चा करीत बसायचे? माझ्याजवळ माननीय मुख्यमंत्री महोदयांचे सीमावादाच्या यासंदर्भातील वर्तमान पत्राची कात्रणे आहेत. बेळगाव प्रकरणी कर्नाटकाला मुख्यमंत्र्यांचे निषेधाचे पत्र आपण दिलेले आहे त्याचाही उल्लेख कात्रणामध्ये आहे, आपण सांगितले आहे की, "मी जे पत्र लिहिले आहे त्याच्यावर मी ठाम आहे, त्यापासून मी तसूभरही मागे येणार नाही. सीमा प्रश्नाच्या संदर्भात राज्यसरकार केंद्रसरकारकडे पाठपुरावा करणार" असे हेडींग आहे. "विलासरावांवर कुरघाडी करण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न" असाही उल्लेख आहे. आपली भूमिका त्यांनी खोडून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

मी संसद सदस्य असताना आम्ही शिवसेनेच्या सर्व खासदारांनी संसदेमध्ये जेव्हा बेळगावचा प्रश्न आला होता, तेव्हा आम्ही संसदेचे कामकाज एक दिवसासाठी बंद पाडले होते. त्यावेळी मी महाराष्ट्राच्या खासदारांची बैठक घेतली. मी सर्व खासदारांना सांगितले की, बेळगावसंबंधीचा प्रश्न येत आहे. केंद्रात बेळगावसंबंधी आपण सर्वांनी एक भूमिका मांडू या. कर्नाटकचा, तामिळनाडूचा, पश्चिम बंगालचा प्रश्न असला की, त्या त्या राज्यातील सदस्यांकडे पक्षीय भेद नसतो. सगळे खासदार एक होतात. पण महाराष्ट्रामध्ये असे होत नाही. महाराष्ट्रातील सर्व खासदार एकमुखाने आवाज देत नाहीत. लोकशाहीमध्ये आवाज देणे हा मूलभूत अधिकार आहे. तो मूलभूत अधिकार आपण वापरत नाही. म्हणून महाराष्ट्राला न्याय मिळत नाही. या विषयी मी माननीय मुख्यमंत्र्यांना सूचना केली होती की लोकसभेचे अधिवेशन चालू आहे. राज्यातील सर्व पक्षाचे मिळून 48 खासदार संसदेमध्ये जात आहेत, त्यांच्या पक्षप्रमुखांना सांगावे की, उद्या हरकतीच्या मुद्याद्वारे, झीरो अवर मध्ये हा प्रश्न उपस्थित करा आणि पहिल्यांदा निषेध करा. महाराष्ट्रातील सगळया खासदारांनी एकत्रितपणे आवाज उठविला असता तर या प्रश्नाला कलाटणी मिळाली असती. पण असे घडले नाही. बीजेपी, शिवसेना, काँग्रेस व अन्य राजकीय पक्ष निरनिराळया पातळीवर स्वत:चे आंदोलन करतात. हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर मुख्यमंत्र्यांनी तो स्वत:च्या नेतृत्तवाखाली घ्यावा. या प्रश्नासाठी सगळा महाराष्ट्र एकत्र करा. सगळे आमदार, खासदार, नगरसेवक, यांनी एका आवाजात हा प्रश्न उपस्थित केला पाहिजे. तेवढा जोर आपण केंद्राकडे लावला तर केंद्राला सुध्दा विचार करावा लागेल. अजून किती वर्ष बेळगावला न्यायापासून वंचित ठेवणार आहात ? आपण लोकशाही पध्दती स्वीकारली आहे, तर मग लोकांच्या विनंतीला मान का देत नाही ? गेल्या 35 वर्षातील सर्व निवडणुकांमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीला विजय मिळालेला आहे. असे असताना त्यांना लोकशाहीच्या माध्यमातून न्याय का मिळू शकत नाही ? हा माझा प्रश्न आहे. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करायला पाहिजे. बेळगाव शहर कुठे रहावे,तालुका कुठे रहावा, गाव कुठे रहावे हा प्रश्न अत्यंत गौण आहे. त्यावर नंतर देखील चर्चा करता येऊ शकते. मूळात बेळगावच्या जनतेची इच्छा आहे की, महाराष्ट्रामध्ये सामील व्हावे. बेळगावमधील लहान मुलांना जरी विचारले तरी ते महाराष्ट्रात कधी घेता असा प्रश्न उपस्थित करतात. त्यावेळी एस.एम.जोशी होते. त्यांनी अनेक भाषणे केली आहेत. बेळगावमध्ये जेथे जेथे निवडणुकीसाठी आम्ही जात होतो, तेथे तेथे लहान मुलांची एक टीम पुढे यायची आणि हात जोडून सांगायची की, आम्ही तुम्हाला मानतो, तुमचे पाय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

धरतो, आम्हाला कर्नाटकच्या सगळया त्रासातून वाचवा. आम्हाला महाराष्ट्रात घेऊन जा. मघाशी श्री.जितेंद्र आव्हाड यांनी महाराष्ट्राची लोकसंख्या 8 कोटी असल्याचे सांगितले. पण आज आपल्या महाराष्ट्राची लोकसंख्या 10कोटी आहे. यात परप्रांतातील लोक देखील असतील. पण ते इथे स्थायिक झालेल आहेत. त्यांना आपण मराठी मानतो. जे स्वत:ला मराठी समजतात त्यांनीच येथे रहावे, अशी देखील आमची भूमिका आहे. जे तसे समजते नाहीत, त्यांनी या राज्यातून संपत्ती गोळा करण्याची भूमिका थांबवावी. महाराष्ट्रातून जो महसूल जमा होतो, तो महाराष्ट्राच्या विकासासाठी वापरला पाहिजे, अशी देखील भूमिका मी संसदेमध्ये मांडली होती. श्री.लालूप्रसाद यादव, श्री.मुलायमसिंह यादव यांनी सांगितले होते की, "मराठी लोग बिहारी लोगों को मुंबई में जीना मुश्किल करते हैं, तो मैंने तुरंत पाइंट ऑफ आर्डर के माध्यम से कहा कि लालू जी आप वहां के मुख्यमंत्री थे. आपने वहां का राज चलाते समय केन्द्रीय सरकार की ओर से जो पैसा आपको इंसानों के लिए मुहैया कराया जाता है वह आप हजम करते हो. इंसानों की बात तो मैं समझ सकता हूं लेकिन जानवरों की घास के लिए जो पैसा दिया जाता है उसको भी आप हजम करते हो यानी पैसा हजम करना आपकी नीति है. इसलिए मुंबई की जनता आपसे नाराज है और बिहार के जानवर भी मुंबई में आ जाते हैं उनकी परवरिश भी हमें करनी पड़ती है." असा प्रश्न मी त्यावेळी त्यांना विचारला होता. हे सर्व पोटतिडिक आहे म्हणून मी सांगत आहे. आमची संघटना या प्रश्नाकडे जीवनमरणाचा प्रश्न म्हणून पहात आहे. महाराष्ट्र शासनाने आमच्या लोकांवर गोळया घातल्या आहेत. लाठया-काठयांनी आम्हाला झोडलेले आहे. पोलिस लॉकअपमध्ये, तुरूंगात बंद केले आहे. हे सगळे सीमावादासाठी सहन केले आहे. हा सीमावाद मिटावा अशी बेळगाव कारवारवासियांची इच्छा आहे. ती पूर्ण होऊन त्यांनी इथे यावे असे आम्हाला देखील वाटते. याचा अर्थ आम्ही असा नाही की, कर्नाटक आमचा शत्रू आहे. शेवटी कर्नाटक असो, आंध्र प्रदेश असो, तामिळनाडू असो, तेथील जनता ही या देशाची नागरिक आहे. या देशातील नागरिकांमध्ये आपापसात संघर्ष व्हावा व मुडदे पडावेत अशी भावना आमची नाही. लोकशाहीच्या माध्यमातून आपण कोर्टामध्ये जाण्याचा निर्णय घेतला. कोर्टामध्ये आपण जास्तीत जास्त ताकद वापरा. महाजन अहवालासारखे होऊ देऊ नका. महाजन अहवालामध्ये जी कृत्ये घडली ती आम्हाला सगळी माहीत आहे. त्यावर मी बोलत नाही. कारण It is a dead body.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

ती विचारात घेण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र सरकारने पुन्हा ती चूक करु नये. आपण जे वकील नेमाल ते अतिशय चांगले असले पाहिजेत. त्यांच्या पाठिशी सगळी ताकद उभी केली पाहिजे. अतिशय जिद्दीने सुप्रीम कोर्टामध्ये ही केस लढून ती जिंकली पाहिजे हे मला तुम्हाला सांगायचे आहे. लोकांच्या अनेक आशा या सरकारवर अवलंबून आहेत. महाराष्ट्रातील जनता तुमच्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे. बेळगावच्या महापौरांच्या तोंडाला काळे फासले आणि त्यांचा अपमान केला, या सर्व गोष्टी घडत आहेत त्याचे एकमेव कारण म्हणजे आम्ही संघटीत नाही. आमचा आवाज संघटीतपणे उभा राहत नाही. आम्ही एकत्रितपणे प्रश्न मांडीत नाही. आम्ही एकत्र नसल्यामुळे या सर्व लोकांचे फावले आहे. म्हणून माझी सर्वांना विनंती आहे की मग तो कॉंगेस पक्ष असो, भाजप असो, राष्ट्रवादी पक्ष असो वा इतर कोणताही पक्ष असो सर्वांनी हा आपला विषय आहे असे समजावे. याठिकाणी चर्चा करण्याची सुध्दा आवश्यकता नाही. माननीय मुख्यमंत्री आपण एकत्रितपणे पुढे जाऊ या. शेवटी हे तुम्हालाच करावयाचे आहे. कारण आज तुम्ही मुख्यमंत्री आहात. तुमच्या पाठीमागे आणखी कोण उभे राहिले आहे हे मला माहीत नाही. ती काळजी तुम्ही घ्यावी. कारण बाहेरची हवा पाहून तसे वाटायला लागले आहे. मी त्या विषयामध्ये जात नाही. तुमच्या सगळ्या कृत्यांना यश मिळो एवढीच माझी परमेश्वर चरणी प्रार्थना आहे. आपल्याला सोनियां गांधीकडे जावे लागले तर त्यांच्याकडे जाऊया. माननीय अटलबिहारी वाजपेयी यांचेकडे जायचे असेल तर त्यांचेकडे जाऊया. ज्यांच्याकडे जायचे आहे त्यांच्याकडे सर्वांनी जाऊन हा प्रश्न मार्गी लावू या एवढी नम्र विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, काल याठिकाणी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी हा प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या यावर प्रथम चर्चा करावी असा आग्रह सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी धरला आणि आम्ही देखील ते मान्य केले. त्यानंतर आज याठिकाणी ही चर्चा होत आहे. मी काही मागचा इतिहास सांगणार नाही. सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. ते उपस्थित राहिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी फक्त दोनच गोंष्टीची येथे चर्चा करणार आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मागील सर्व इतिहास सांगितला आहे. संयुक्त समितीचा कार्यकर्ता म्हणून मी राजकारणात आलो. माझ्या आणि मेजर सुधीर सांवत यांच्या घरामध्ये समितीचे राजकारण होते. मेजर सुधीर सावंत यांचे वडील या सदनाचे तसेच विधाससभेचे सदस्य होते. त्यांच्या वडिलांच्या वेळेला मी आमच्या मोडक्या जीपमधून प्रचारासाठी गेलो होतो. त्यावेळी माझे वय अकरा वर्षे होते. पण आता त्यांचे विचार कसे बदलले हे मला कळलेले नाही. कारण त्यांनी केलेल्या वक्तव्यावर दुर्दैवाने मला हरकत घ्यावी लागली हे मी माझे दुर्दैव समजतो. काँगेस पक्षाचे श्री.गुरुदास कामत, त्याच पक्षाचे निरीक्षक श्रीमती मार्गारेट अल्वा आणि आपल्या राज्याचे राज्यपाल हे सर्व कर्नाटक राज्यातील आहेत. कदाचित त्याचा प्रभाव त्यांचेवर पडला की काय ? अशी मला शंका आली.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपाल आणि श्रीमती मार्गारेट अल्वा यांचा उल्लेख केला तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : जे या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यांचा उल्लेख कामकाजातून काढून टाकावा.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपला निर्णय अंतिम आहे. परंतु मी मेजर सावंत यांच्याबद्दल काहीही अपशब्द वापरलेले नाहीत. समितीच्या राजकारणाचा प्रभाव जसा माझ्यावर पडला होता तसा कर्नल सावंत यांच्यांवर पडला होता. मेजर सावंत आणि मी सातत्याने राजकारणामध्ये बरोबरीने काम केले. या ठिकाणी त्यांच्याकडून बेळगावचे विभाजन करा हे ऐकून दुर्दैव वाटते. जर याप्रकरणी त्यांचा पाठिंबा ठाम असेल तर त्यापेक्षा मोठा आनंद नाही.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपला मुद्दा मांडतांना माझ्याबद्दल आरोप करण्याचा प्रयत्न केला किंवा मिस-रिप्रेझेंटेशन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तो आरोप रेकॉर्डवरुन काढून टाकावा. यामध्ये मी ठाम असण्याचा प्रश्नच नाही, आम्ही यावर ठामच आहोत. लहानपणापासून आम्ही तेच करीत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी वैयक्तिक चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती : जर तो मजकूर आक्षेपार्ह असेल तर तो तपासून नंतर काढण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मेजर सावंत यांचा अपमान व्हावा अशी माझी इच्छा नाही. ही चर्चा सभागृहात का उपस्थित झाली ? तर, बेळगावच्या महापौरांनी बेळगांव महाराष्ट्रामध्ये विलीन करावे असा ठराव केला आणि ते बेंगलोरला गेले. ज्यावेळी ते त्या ठिकाणी गेले त्यावेळी एकीकरण समितीचे माजी आमदार श्री.डी.वाय.पाटील आणि श्री.शिवाजी सिंदकर यांच्याशी त्यांची भेट झाली. श्री.सिंदकर यांच्याशी मी दूरध्वनीद्वारे बेळगावबाबत चर्चा केली. बेळगांवमध्ये पूर परिस्थितीमध्ये झालेल्या नुकसानीसाठी मदत मागण्यासाठी महापौर मंत्रालयात गेले असता, त्यांना त्या ठिकाणी काळे फासून, त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. या घटनेचे पडसाद बेळगांव शहरामध्ये ताबडतोब उमटले आणि बेळगांव शहर बंद होऊन, आंदोलन करण्यात आले. 8-10 दिवसांपूर्वी त्या आंदोलनात त्या ठिकाणचे नगरसेवक श्री.सतीश चव्हाण गेले आणि त्या आंदोलकांवर जो लाठीचार्ज झाला त्यामध्ये त्यांना हार्ट ॲटॅक येऊन, त्यांचे निधन झाले. हे आंदोलन करण्यामध्ये आणि महापौरांना काळे फासण्यामध्ये पुढाकार कोण घेत होते ? महोदय, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी मुंबईमध्ये ज्या शेट्टी नावाच्या गृहस्थाचे डान्स बार बंद केले तो शेट्टी महापौरांना काळे फासण्यासाठी होता. हा शेट्टी त्या ठिकाणी पुढाकार घेऊन बेळगावातील महाराष्ट्रीयन लोकप्रतिनिधींशी असे चाळे करण्याचे काम करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आज बेळगांवमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका सुरु आहेत. परंतु एकीकरण समितीचे कार्यकर्ते त्या ठिकाणी मते मागण्यासाठी जाऊ शकत नाहीत. काही कार्यकर्त्यांवर तर कलम 307 अन्वये खटले दाखल झाले आहेत आणि त्या शेट्टीवर नॉमिनल गुन्हा दाखल केला जातो आहे. तक्रार करण्यासाठी मराठी माणूस पोलीस स्टेशनमध्ये गेला तर त्या ठिकाणी पोलीस त्याची फिर्याद घेण्यास तयार नाहीत. मी या चर्चेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना बेळगाववासियांच्या वतीने विनंती करु इच्छितो की, हा प्रश्न तुम्ही मानीय पंतप्रधानांसमोर घेऊन जा, सर्व पक्षांनी मिळून हा प्रश्न त्यांच्याकडे घेऊन जाण्यास आम्ही तयार आहोत. हा प्रश्न लवकरात लवकर सोडवला नाहीतर त्या ठिकाणचे संपूर्ण नियंत्रण आपल्याला केंद्र सरकारच्या अखत्यारित ठेवावे लागेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेथील वातावरण बघितल्यानंतर बेळगांवमध्ये मराठी माणूस यापुढे ताठ मानेने फिरु शकणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, येथील आवाज एकमुखाने गेला पाहिजे.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ....

त्या भागाची कशी वाटणी करावयाची आणि का करावयाची हा मुद्दा या ठिकाणी नाही.मेजर सुधीर सावंत आणि आपण सगळेजण या प्रश्नाच्या बाबतीत ठाम आहोत आणि एकत्र आहोत.हे आपण संपूर्ण देशाला दाखवून दिले पाहिजे.सभापती महोदय, या ठिकाणी या ठरावावर बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, सीमा भागातील मराठी माणूस हा जगला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की,आणीबाणी आली नसती तर मी राजकीय कार्यकर्ता झालो नसतो. सीमा भागातील लोकशाही जीवत ठेवण्याची जबाबदारी केन्द्र सरकारची आहे त्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राच्या मत्रिमंडळाने आणि या दोन्ही सभागृहाने एकमुखाने केन्द्र सरकारकडे मागणी केली पाहिजे की, त्याभागातील लोकशाही जिवंत ठेवून तेथील मराठी माणसाला आपले मत ठामपणे व नि:पक्षपातीपणे देता आले पाहिजे अशा प्रकारची स्थिती बेळगावमध्ये निर्माण झाली पाहिजे.त्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि संपूर्ण महाराष्ट्रवासियांनी बेळगावच्या जनतेच्या मागे ठामपणे उभे राहिले पाहिजे अशी विनंती करुन मी माझे विचार संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त): सभापती महोदय,या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.बेळगाव ,कारवार हा मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात विलीन होण्यासाठी तेथील जनता आसूसलेली आहे. त्यांच्या प्रश्नामध्ये महाराष्ट्राने लक्ष घालण्याच्या बाबतीत वर्षानुवर्षे आश्वासने आणि वचने दिलेली आहेत. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड आणि इतर सन्माननीय सदस्यांनी येथे प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, गेल्या वर्षी मी हुतात्मा दिनानिमित्त बेळगाव येथे गेलो होतो. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अध्यक्षांनी आणि इतर पदाधिका-यांनी मला तेथे येण्यासंबंधीचे निमंत्रण दिले होते. त्यामुळे मी त्या ठिकाणी गेलो होतो. हुतात्मा दिनाच्या कार्यक्रमानंतर जी सभा झाली होती त्यावेळी 20 ते 25 हजार लोक बेळगावच्या चौकात जमा झाले होते. तेव्हा महाराष्ट्राच्या व सहयाद्रीच्यावतीने मी आश्वासन दिले होते की, "बेळगाव आणि अन्य जिल्हयात जे मराठी भाषिक आहेत.त्यांच्या मागे हा महाराष्ट्र पहाडासारखा उभा राहील." बेळगावच्या महानगरपालिकेतील महापौरांनी ठराव आणल्याबद्दल तेथील मुख्यमंत्र्यांनी निषेध केला असता, राज्य सरकारने निषेध केला असता तर ते मी समजू शकलो असतो. परंतु जो ठराव आणला होता तो यापूर्वी त्यानी आणलाच नव्हता असे नाही. यापूर्वीसुध्दा त्यांनी तशा प्रकारचा ठराव केला होता. गेली कित्तेक वर्षे ही महानगरपालिका मराठी भाषिकांच्या हातामध्ये राहिलेली आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या प्रभावाखाली बेळगावची महानगरपालिका राहिली आहे. यापूर्वी सुध्दा त्यांनी वेळोवेळी अशा प्रकारचे ठराव पास केलेले आहेत. आता जो ठराव करण्यात आला होता तो पहिला आणि शेवटचा आहे असे नाही. यापुढे सुध्दा मोठया संख्येने मराठी भाषिक त्या महानगरपालिकेमध्ये निवडून आले आणि असाच जर प्रयत्न त्यांनी केला तर त्याला कोणीही विरोध करु शकणार नाही. शासनसुध्दा त्यांना विरोध करु शकणार नाही कारण लोकशाहीच्या प्रक्रियेतून ही मंडळी त्या ठिकाणी निवडून आलेली आहेत.या देशात जी नवीन नवीन राज्ये निर्माण झालेली आहेत त्यांच्यामध्ये कोठेही बॉर्डर डिस्प्युट राहिलेले नाहीत. फक्त दोनच बॉर्डर डिस्प्युट राहिलेले आहेत. जम्मू आणि काश्मिरचा प्रश्न 1947 पासून रेंगाळत राहिलेला आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत आपण परराष्ट्राबरोबर चर्चा करीत आहोत. तसेच हा प्रश्न सोडविण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. त्या भागातील

3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

लाखो माणसे दहशतवाद्यांच्या कारवायांमुळे शहीद होत आहेत त्यामुळे त्यांचे कुटुंब उदध्वस्त झालेले आहे.देशातील इतर राज्यात अशा प्रकारचे तंटे राहिलेले नाहीत. सीमा भागातील मराठी भाषिकांना त्यांच्या मागणीमुळे महाराष्ट्रात यावयाचे आहे. त्याकरता महाराष्ट्राने तेथील लोकांना आपल्या राज्यात आणावयाचे आहे आणि त्यासंबंधीची कार्यवाही करावयाची आहे. या बाबतीत गेल्या 45 वर्षापासून आपण झगडत आहोत. मध्यंतरी गोव्याचा एक प्रश्न निर्माण झाला होता.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी ...

त्यावेळी श्री.दयानंद बांदोडकर हे गोव्याचे मुख्यमंत्री होते. तेव्हा कोकणी-मराठी असा वाद निर्माण केला गेला होता. पण बांदोडकरांसह गोव्यातील बहुसंख्य जनता ही महाराष्ट्रात सामील होण्यास उत्सुक होती. पण तेव्हा एक रेफरंडम् घेण्यात आला, सार्वमत अजमाविण्यात आले आणि मग काय झाले हे आपण पाहतो आहोत. आज गोवा हे केंद्रशासित न राहता एक स्वतंत्र राज्य झालेले आहे. त्यामुळे तेथे जो सीमेचा प्रश्न होता तोही निकालात निघाला. सभापती महोदय, मी या ठिकाणी या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि राज्य सरकारचे अभिनंदन करू इच्छितो. बेळगावच्या महापौरांचा अपमान करण्याचा आणि बेळगाव महापालिका बरखास्त करण्याचा जो काही प्रकार त्या ठिकाणी घडल्यानंतर राज्य सरकारच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना इ ाल्या प्रकाराचा निषेध करणारे पत्र लिहिले, कडक शब्दामध्ये त्यांनी ते पत्र लिहिताना त्यात म्हटले की, 'आपण जी काही कारवाई तेथे केली आहे ती निषेधाचीच होती'. म्हणजे राज्य सरकार मार्फत त्यांनी पहिली ही कारवाई केली. त्यांनी वारंवार सांगितले की, उद्या राजकारणामध्ये काय अडचणी येतील त्या येवोत, पण हा प्रश्न दिल्लीपर्यंत घेऊन जाऊ, माननीय पंतप्रधानांपुढे देखील हा प्रश्न नेला पाहिजे. त्यांच्या समोर हा प्रश्न मांडला पाहिजे. सभापती महोदय, पुन्हा पुन्हा हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकार करणार असेल तर आज त्यांना माहिती झाले आहे की, महाराष्ट्र सरकारच्या वतीने सुप्रीम कोर्टामध्ये प्रकरण नेण्यात आले आहे. आजवर एवढी सर्व चर्चा करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला पण प्रश्न सुटला नाही. त्यामुळे सुप्रीम कोर्टाकडे आता हे प्रकरण गेलेले आहे. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी या ठिकाणी त्यांचे काही मत व्यक्त करण्याचा प्रयत्न केला असता या ठिकाणी सर्व सदस्यांकडून ज्या भावना व्यक्त झाल्या त्यामुळे कर्नल सावंत यांनी नाराज होण्याचे कारण नाही. त्यांना नाराज करण्याचा येथील कोणाचाही हेतू नव्हता. परंतु ते बोलत असताना त्यांची जी काही मते असतील, वाक्ये असतील ती उच्चारण्यापूर्वी त्यांचे काही तरी मिसअंडरस्टँडींग झाले असावे. त्यांनी जे काही मत येथे व्यक्त केले त्यानंतर ज्या काही भावना येथे अन्य सदस्यांकडून व्यक्त झाल्या त्यातून त्यांना नाउमेद करण्याचा हेतू अजिबात नव्हता हे मी त्यांना आवर्जून सांगू इच्छितो. परंतु असा जिव्हाळ्याचा प्रश्न असताना, भावनेचा प्रश्न असताना ....

..... 3एन 2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय कुलकर्णी साहेब, त्यावेळी आपण देखील घोषणा देत आमच्याबरोबर मध्ये आला होता, आमच्याबरोबर आपणही घोषणा देत होता, याची आठवण ठेवा.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : ते सारे लक्षात घेऊनच मी आमच्या मित्रांना सांगू इच्छितो की, असे भावनात्मक प्रश्न सोडवित असताना, त्याबाबत सभागृहामध्ये चर्चा करीत असताना आपण प्रत्येक शब्द जपून वापरला पाहिजे. ज्या ज्यावेळेस असे भावनिक प्रश्न असतील, राज्याचे जिव्हाळ्याचे प्रश्न असतील त्यावेळी त्याबाबत आपले वैयक्तिक मत सभागृहामध्ये मांडण्याऐवजी सामूहिक मत काय आहे, सामूहिक भावना काय आहेत आणि आपण आपले मत व्यक्त करताना त्यातून सामूहिक भावना काय निर्माण होऊ शकतात हे लक्षात घेऊन आपण आपले शब्द वापरले पाहिजेत. ...

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, परत परत हा विषय वेगळ्या पद्धतीने येथे मांडला जातो आहे. माझ्यावर हेतूपुरस्सर आरोप करण्यात येतो आहे. यातील एकच मुद्दा महत्त्वाचा होता. शहराच्या महापालिकेने एक ठराव संमत केला आणि त्यावरून सरकारने ती महापालिकाच बरखास्त केली. कर्नाटक सरकारने हे जे पाऊल उचलले आहे ते निश्चितच निषेधार्ह आहे. पण...

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी जे काही बोलले त्यावर आपल्याला स्वत:ला काही सांगावयाचे आहे काय ?

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, परत परत माझे नाव या संदर्भात घेऊन बोलू नये.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ज्या घटना बेळगावमध्ये घडल्या आहेत., उदा. तेथील महापौरांच्या तोंडाला काळे फासण्याचा प्रयत्न केला गेला. तेथील गुंड प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन महापौरांना काळे फासणार असतील तर त्याच्या काही प्रतिक्रिया निश्चितच उमटणार आहेत आणि त्याप्रमाणे त्या महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागामध्ये उमटल्यादेखील, पण याही पेक्षा अधिक गंभीर प्रतिक्रिया उमटल्या असत्या. अशा प्रकारे राजकारण करून तेथील मराठी जनतेला अवमानित करण्याचा प्रयत्न केला जात असेल तर त्याचा मी येथे निषेध करतो. हा बेळगाव-कारवारचा प्रश्न आहे. कदाचित यातून कित्येक लोकांचे भवितव्य, मग त्यामध्ये राजकीय भवितव्य देखील अवलंबून आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीने या संदर्भात घेतलेली भूमिका योग्य अशीच आहे. आज तेथे एक आमदार या समितीचा निवडून आला असेल पण यापूर्वी या महाराष्ट्र एकीकरण समितीचे 7-7 आमदार निवडून आलेले आहेत. ..

(यानंतर श्री.सरफरे ..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

संपूर्ण बेळगाव जिल्हयात जे 7 आमदार आहेत ते महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने निवडून आले आहेत. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता आपण जर मराठी जनतेचा, मराठी भाषिकांचा अवमान करणार असाल तर महाराष्ट्र शासनाने व या सार्वभौम सभागृहाने त्याचा निषेध केला पाहिजे. याठिकाणी मांडलेल्या ठरावाच्या निमित्ताने मी मागणी करतो की, "हे सार्वभौम सभागृह या कृतीचा व कृत्याचा निषेध करीत आहे" अशाप्रकारचा शब्दप्रयोग ठरावामध्ये समाविष्ट करावा. एवढे बोलून व या ठरावाला पाठींबा देऊन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी हा प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी, त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. जेव्हा बेळगाव महानगरपालिकेने एकमताने बेळगाव महाराष्ट्रामध्ये विलीन करण्यासंबंधी एकमुखी प्रस्ताव मंजूर केला त्यानंतर महानगरपालिकेचे सन्माननीय महापौर व इतर सदस्य त्या राज्यात गेले तेव्हा त्यांच्या तोंडाला काळे फासले व त्यांना मारहाण, धक्काबुकी करण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारचे जे गंभीर वातावरण तयार झाले आहे त्याचा मी पहिल्यांदा तीव्र शब्दामध्ये निषेध करतो. या ठिकाणी सांगितले पाहिजे की, योगा योगाने त्या दिवशी काही कामानिमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेलो होतो. त्या दिवशी संध्याकाळी ती बातमी आली, त्या क्षणी एक सेकंदाचा वेळ न घालविता माननीय मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना पाठवावयाचे पत्र डिक्टेट केले. व त्यासंबंधी "हे कर्नाटक सरकारचे लोकशाही विरोधी कृत्य आहे". अशाप्रकारची आपली निषेधाची भावना, आपली प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, त्याच क्षणाला त्यांनी दुसरे पत्र माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंगजी यांना तात्काळ पाठविले. व महाराष्ट्राच्या भावना अतिशय ठोसपणे, प्रामाणिकपणे, गंभीरपणे मांडल्या त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कारण तमाम 10 कोटी मराठी जनतेच्या भावना त्यांनी आपल्या शब्दामधून व्यक्त केल्या. हे मला या सदनाला सांगितले पाहिजे. आपण म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या या दोन्ही सभागृहांमध्ये यापूर्वी अनेक वेळा हा ठराव एकमुखी पारीत करुन तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. बेळगाव महानगरपालिका ही कित्येक वर्षे नगरपालिका असतांना तिचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले. या ठिकाणी सांगितले पाहिजे की, पुण्याच्या नवरोसजी वाडीया या महाविद्यालयामध्ये मी शिकत होतो त्यावेळी बेळगावचे काही मित्र माझ्याबरोबर शिकत होते. त्यापैकी एक श्री.सुभाष जाधव हे आज हयात नाहीत. ते पूर्वी नगरपालिकेचे सदस्य होते व महानगरपालिका निर्माण झाल्यानंतर ते पुन्हा निवडून आले व बेळगाव महानगरपालिकेचे पहिले महापौर झाले. माननीय मुख्यमंत्र्यांना ते जवळून ओळखत होते. तेव्हापासून आतापर्यंत मराठी भाषिकांचे बहुमत या महानगरपालिकेमध्ये आपल्याला सातत्याने पहायला मिळत आहे. आणि म्हणून त्यांनी लोकशाही पध्दतीने ठराव संमत केला. तो केल्यानंतर महापौरांचा अवमान करुन त्यांच्या तोंडाला काळे फासून त्यांना मारहाण केली व कर्नाटक सरकारने ती महानगरपालिका बरखास्त केली. हे लोकशाहीविरोधी कृत्य आहे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी व महाराष्ट्रातील सर्व नेत्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. उल्हास पवार...

त्यावर आपली भावना व्यक्त केली. मी याठिकाणी एकच सांगतो की, कर्नाटकचा काही भाग कासरगौड हे गाव केरळमध्ये आहे. त्यासंबंधी सुध्दा त्याठिकाणी वाद सुरु आहे. केरळमध्ये असलेली कासरगौड ही नगरपालिका कर्नाटकमध्ये विलीन केल्याबद्दल कर्नाटक सरकारने त्यांचे अभिनंदन केले. त्याच पध्दतीने बेळगाव महानगरपालिकेने एकमुखाने ठराव पारित केला असतांना त्या ठरावाचा निषेध करुन महापौरांच्या तोंडाला काळे फासून त्यांना मारहाण केली व त्यानंतर दिलगीरी व्यक्त केली. त्याच क्षणी बेळगाव महानगरपालिकाही बरखास्त करण्यात आली. सभापती महोदय, महानगरपालिका किंवा नगरपालिका बरखास्त करण्यासंबंधी काही नियमावली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

ज्या गोष्टी घडल्या म्हणजे महानगरपालिका बरखास्त करता येते, त्या सर्व नियमांची पायमल्ली करुन असत्य आणि खोटे आरोप दाखवून आणि बेळगाव महानगरपालिकेने ठराव केला असे निमित्त करुन ती बरखास्त करण्यात आली. त्याचा आपण सर्वांनी एकमुखी निषेध केला पाहिजे. पहिले महापौर, माननीय श्री.सुभाष जाधव, आज ते हयात नाहीत. सुदैवाने मी त्यावेळी आमदार असताना माझ्या आमदार निवासातील 602 क्रमांकाच्या रुममध्ये बेळगावच्या सीमा भागातील सर्व आमदार सातत्याने मुक्कामासाठी असावयाचे. मग ते माननीय बळवंतराव सायनाक असतील, चव्हाण असतील,त्यांच्या अगोदरचे बाळा सुखटणकर यांनाही मी पाहिलेले आहे. ते आज हयात नाहीत. अशी अनेक माणसे, असे अनेक दिग्गज नेते या प्रश्नासाठी लढले. त्याचा उल्लेख माननीय श्री.य.दि.फडके यांनी केलेला आहे. मला माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर जेव्हा-जेव्हा बेळगावमध्ये एखाद्या कार्यक्रमाच्या निमित्ताने जाण्याचा प्रसंग आला आहे. आज कृष्णा पेंडसें यांचे वय 82 ते 84 वर्षे आहे. वृत्तपत्रामध्ये त्यांचा एक लेख आला होता, त्यात त्यांनी मनोगत व्यक्त केले होते. त्यांनी अशी भावना व्यक्त केली की, मी आज 84-85 वर्षाचा आहे. 55-56 पासून मी या लढयामध्ये सक्रीय आहे. आज वार्ध्यक्यामुळे माझे शरीर थकले आहे पण माझ्या पुढच्या तीन पिढया आज माझ्याकडे याचना करीत आहेत की, आपण केव्हा महाराष्ट्रात जाणार ? त्यांनी अतिशय खेदजनक, अतिशय वेदना देणारी अशी भावना कर्नाटक सरकारबद्दल आपल्या लेखातूनही व्यक्त केली आहे आणि ज्या ज्या वेळी ते भेटले त्यावेळीही व्यक्त केलेली आहे. या बेळगाव प्रश्नाबाबत बोलताना मला येथे सांगितले पाहिजे की, आपण याठिकाणी मराठी भाषिक असा उल्लेख अतिशय चांगल्या प्रकारे करीत आहोत. त्यावेळी माननीय महापौर श्री.सुभाष जाधव यांच्याबरोबर डेप्युटी मेअर श्री. सारडा होते. माननीय श्री.सारडा यांना त्यावेळी मारहाण झाली. त्यांचा पाय फॅक्चर झाला आणि त्यांना दवाखान्यामध्ये ॲडमिट करावे लागले. पुढच्या उपचारासाठी माननीय श्री.सुभाष जाधव, श्री.सारडा यांना घेऊन याठिकाणी आले. तसेच एक मुस्लीम नगरसेवक होते आणि त्यांनाही मारहाण झाली होती. कारण त्यांचेही हेच म्हणणे होते की, बेळगाव महाराष्ट्रात आला पाहिजे आणि शाहीर अमरशेख,यांच्याबद्दल सांगावयाचे तर त्यांचा बुलंद आवाज, या संयुक्त महाराष्ट्रासाठी कडाक्याच्या थंडीमध्ये संपूर्ण दिल्लीच्या पार्लमेंटभोवती शेकोटी पेटवून त्यांनी आपला डफ तापवला आणि त्यावेळी त्यांनी कवन गायले होते."संयुक्त महाराष्ट्र उगवतो माझ्या सरकारा, खुशाल कोंबडे

. . . .3पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

झाकून धरा." हे सगळे कोण आहेत ? तर ही सगळी मराठी भाषिक माणसे आहेत. सगळया धर्माची, सगळ्या जातीची परंतु मराठी भाषेवर अस्मिता ठेवणारे, मराठी भाषेवर प्रेम करणारे, मराठी भाषा आपली मानणारे आणि म्हणून हा बेळगाव कारवार,बिदर-भालकी, याठिकाणी सांगितले पाहिजे की, बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर भालकीसह डांग उंबरगाव संतपूर, नुकतेच स्वातंत्र्यसैनिक स्व.दादासाहेब बीडकर, यांचे वयाच्या 91 व्या वर्षी निधन झाले. त्यांना आणि स्व.दादासाहेब पोतनीस या दोघांनाही मी ज्या ज्या वेळी माननीय बाळासाहेब भारदे यांच्याबरोबर नाशिक येथे गेलो, तेव्हा सातत्याने भेटलो आहे. त्यांचे एकच काम आणि डांग उंबरगावला सगळी माणसे विसरली.स्व.दादासाहेब बीडकर आणि स्व.दादासाहेब पोतनीस आपल्या "गावकरी" दैनिकाचे संस्थापक संपादक होते. त्यांनी डांग उंबरगाव मध्ये जाऊन तेथील आदिवासींची सेवा करुन डांग आदिवासी सेवा मंडळाची स्थापना करुन शेवटच्या श्वासापर्यंत ते काम करीत राहीले आणि त्यासंदर्भात सातत्याने मागणी करत करतच गेले. पण आपण डांग उंबरगावला विसरुन गेलो. बिदर-भालकी आता लक्षात येत नाही. पण निदान बेळगाव, बेळगाव जिल्हा याठिकाणी लोकप्रतिनिधी आपले असताना, मला आठवते की, भालकी येथून माननीय एकांबेकर निवडून यावयाचे आणि ते आमच्या पंढरपूरचे वारकरी असल्यामुळे मला पंढरपूरला कायम भेटत असत. नंतर ते उप सभापती झाले. माननीय कदम हे कारवारमधून कित्येक वर्षे आमदार म्हणून, खासदार म्हणून निवडून येत होते. पण शेवटी ही सर्व माणसे थकली. आज त्याठिकाणी लोकशाहीच्या मार्गाने सर्व प्रक्रिया घडत असताना लोकशाहीचा घात करणारे, लोकशाहीची पायमल्ली करणारे असे जे कृत्य कर्नाटक सरकारने केलेले आहे. त्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो आणि या ठरावाचे समर्थन करतो आणि माझे मनोगत थांबवितो.

. . . .3 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी मी सुरुवातीलाच माननीय मुख्यमंत्र्यांचे राजकीय अभिनिवेष सोडून अभिनंदन करतो. साधारणपणे आपली स्तुती करण्याचा माझा उद्देश नाही. परंतु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांची भाषणे सोडली तर इतर कोणीही कधीही सीमा प्रश्नावर इतक्या ठामपणे बोलल्याचे माझ्या लक्षात नाही. मात्र आपण दुसऱ्या वेळेला ठामपणे सांगितले की, मी पत्र मागे घेणार नाही. मी पुन्हा सांगतो की, मी राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. परंतु केंद्रामध्ये काँग्रेस पक्ष सत्तेवर असताना जर त्या-त्या वेळेला काही निर्णय घेतले असते तर हे प्रश्न सुटले असते. आज माझ्यासारख्या कार्यकर्त्याला दु:ख होते. आमचा भारतीय जनता पक्षाचा कर्नाटकमधील कार्यकर्ता असे सांगणार की,बेळगाव आमच्या कडेच राहिले पाहिजे. महाराष्ट्रातील कार्यकर्ता सांगणार की, बेळगाव महाराष्ट्रात राहिले पाहिजे आणि आम्ही दोघे स्वंयंसेवक जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाणार तेव्हा असे सांगणार की बेळगाव महाराष्ट्रात राहिला काय किंवा कर्नाटकमध्ये राहिला काय? ही स्थिती या देशाला चांगली नाही. 1967 मध्ये लाल बहादूर शास्त्री यांनी एक ठराव केला होता. तुमच्या राज्यकर्त्यांनी, विशेषत: पंडित जवाहरलाल नेहरु हे अतिशय महान होते, त्यांच्याबाबत भाष्य करण्याइतकी माझी योग्यता आहे असे मी मानत नाही. पण त्या त्या वेळेला त्यांनी योग्य निर्णय घेतले नाहीत. राज्यकर्त्यांनी कधीही परिस्थितीपुढे नमावयाचे नसते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू..

त्यावेळेला अनेकांनी अब्राहम लिंकनना सांगितले की, गुलामगिरीच्या विरोधामध्ये बील आणलात तर सिव्हील वॉर होईल. तेव्हा लिंकननी सांगितले की, I will prefer civil war against slavery. 1967 साली लाल बहादूर शास्त्री यांनी बेळगाव, महाराष्ट्र ,म्हैसूर सीमा प्रश्नाबद्दल अतिशय सुंदर ठराव केला होता. (वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते.) सभापती महोदय, मी जास्त वेळ घेत नाही, मी दोन-तीन मिनिटामध्ये माझे बोलणे संपवितो. लाल बहादूर शास्त्री यांनी 1965 मध्ये एका सभेमध्ये भाषण केले. त्यानंतर त्यांनी दहा-बारा दिवसांनी बंगलोर येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनामध्ये ठराव मांडला. त्यांनी असे म्हटले की," AICC considers that it is imperative for us all to realise that in all such matters the interests of the country as a whole must receive precedence over all other considerations. It wishes to emphasise the need for the promotion of unity and harmony among the States through resolute and persistent endeavours." पुढे त्यांनी बेळगाव-कारवार आणि महाराष्ट्राच्या सीमेबद्दल म्हटलेले आहे की, "AICC considers that all efforts must be made to settle such disputes by mutual negotiations backed by sincere desire to find fair and equitable solutions. In cases where such efforts do not succeed, AICC recommends that the Government of India should set up appropriate machinery for a speedy and final settlement of the disputes." हे आपण केले आहे काय ? तसे केले असते तर आपल्याला दोन जागा कमी मिळाल्या असत्या. देशातील एक नागरिक बेळगावच्या महापौराला काळे फासतो, ही देशाची युनिटी आहे काय ? अनेक गोष्टीमुळे या देशात आपण एकत्र राहू शकणार नाही. भाषावार प्रांतरचना झाली, त्यावेळी त्या त्या भाषिकांनी आपल्या संकृतीच्या आधारावर आपला आर्थिक आणि सामाजिक विकास करावा,असा त्यामागे एक विचार होता.. पण भाषावार प्रांतरचना ही कधीकधी विद्वेषातून देखील निर्माण होते. त्यामध्ये आपली एकात्मता रहात नाही. आपण छोट्याछोट्या नद्यांसाठी भांडतो. श्री.महाजन कसे होते ? या श्री.महाजनांनी एका ठिकाणी महाराष्ट्रातील लोकांना "बेशरम" म्हटलेले आहे. 1955-57 च्या सुमारास त्यांनी एका लेखामध्ये म्हटलेले आहे की, "महाराष्ट्रीयांनी अमराठी भाषिकांवर मुंबईमध्ये अनन्वित अत्त्याचार केले आणि आता बेशरमपणे सीमा वादासाठी न्यायालयीन चौकशीची मागणी करत आहेत." ज्यावेळेला सेनापती बापट हे वर्षा

बंगल्यासमोर उपोषणाला बसले होते त्यावेळेला वसंतराव नाईक त्यांना समोरे गेले. "सिंहासन" या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मालिकेमध्ये त्याचे चांगले विडंबन केलेले आहे. त्यावेळेला श्रीमती इंदिरा गांधींनी सांगितले की, मी लोकेच्छा प्रमाण मानीन आणि निर्णय देईन. श्री.महाजनांनी आपला अहवाल दिला. ज्यावेळेला श्री.राजीव गांधी हे ऑल इंडिया कॉंग्रेसचे सेक्रेटरी होते. त्यावेळेला कर्नाटकामध्ये निवडणुकीच्या प्रचारासाठी ते गेले होते. त्या ठिकाणी त्यांनी असे म्हटले की, "तुम्ही आतापयर्यन्त निवडणुका जिंकल्या, पण यावेळी निवडणूक जिंकून दाखविली तर मी या प्रश्नामध्ये लक्ष घालीन." त्यानंतर निवडणूक जिंकली. बेळगाव, कारवार, निपाणी यांच्या संबधाने निर्णय घ्यायला पाहिजे होता. आताही मी अभिनंदन अशासाठी केले की, आपण सगळयांनी मिळून दिल्लीला जाऊ. न्यायालयामध्ये निवाडा जो काही होईल तो होईल. आपण लोकशाही प्रमाण मानता ना? राजाला कधी स्वत:चे मन नसते. प्रजेसाठी म्हणून त्याने निर्णय घ्यावयाचे असतात. थोडक्यात सांगायचे तर 50 वर्षाची पावले ओळखून सत्ताधिशांनी निर्णय घ्यायचे असतात. आईच्या पोटातून कोणी सत्तेचे मुकुट घेऊन जन्माला येत नाही. प्रत्येक गोष्ट आपण राजकीय अभिनिवेशाने, मतांकडे डोळा ठेवून करतो. त्याचे हे परिणाम आहेत . तुमचा पक्ष असेल किंवा माझा पक्ष असेल, आपण केव्हातरी लोकांसमोर जाऊ या. बेळगावच्या महानरपालिकेमध्ये तुमच्या नेतृत्वाखाली उपोषणाला बसू या. जे काही व्हायचे ते हाईल. ही महानगरपालिका पुन्हा रिस्टोर करुन श्री.मोरे यांना महापौर करावे. पुन्हा महानगरपालिका अस्तित्वात आणावी. श्रीमती सोनिया गांधींचा मी आदराने उल्लेख करतो. त्या सर्व शक्तीमान आहेत ना ? तर मग त्यांच्याकडे हा प्रश्न न्या. मग त्यांनी दोन्ही मुख्यमंत्र्यांना बोलवावे. आता तुमचे बहुमत आहे. आम्हालाही तुमचे सरकार पाडण्याची चिंता नाही, आवश्यकताही नाही. फार काळ सत्तेचा खेळ करणे बरे नाही. अनेक प्रश्न सोडविण्यासाठी लोकांनी पाच वर्षासाठी निवडून दिलले आहे. मी शेवटचा मुद्दा सांगतो महाराष्ट्रातील 51.4 टक्के कन्नड भाषिक गावे कर्नाटकामध्ये जोडली गेलेली आहेत. शिवाय 51.9 टक्के मराठी भाषिक असलेली गावे देखील कर्नाटकात गेली आहेत. वस्तुत: भाषावार प्रांतरचनेनुसार ही मराठी भाषिक गावे महाराष्ट्रात आली पाहिजेत. मला वाटते, महाजन अहवालावर आतापर्यन्त खूप चर्चा झालेली आहे. तेव्हा आता त्यावर अधिक न बोलणे योग्य ठरेल. पण आता बेळगावच्या महापौरांच्या तोंडाला काळे फासले, म्हणजेच पर्यायाने महाराष्ट्रादेखील अपमान झाला म्हणून हा प्रस्ताव आज येथे आला. बेळगावचे महापौर, प्रथम नागरिक, झाल्या अपमानाबद्दल येथे येऊन मुंबई मराठी पत्रकार संघामध्ये लहान मुलासारखे अक्षरश: रडत होते.

(यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

मला असे वाटते की, आपण केवळ सुकी सहानुभूती दाखवायला नको.हे अधिवेशन संपले की आपल्या नेतृत्वाखाली आम्ही सगळे दिल्लीला यावयास तयार आहोत. त्या ठिकाणी कर्नाटकातील आमच्या पक्षातील लोकांना काय वाटते याची महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टीला जराही चिंता नाही. या प्रश्नासंबंधी आम्ही पूर्णत: आपल्या बरोबर आहोत. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण केंद्रामध्ये जावे. प्रधानमत्र्यंकडे जावे आणि पहिल्यांदा तेथील महानगरपालिका रिस्टोअर करावी. जशी बिहारची विधानसभा बरखास्त केली आणि कोर्टाने तुम्हाला चपराक मारली. प्रत्येक वेळेला कोर्टाने चपराक मारल्यानंतर आपण गाल चोळत बसून पुन्हा माझे चुकले असे बोलण्याची काही गरज नाही. यासाठी या ठरावातील भाषा थोडी बदलावी. "आम्ही याचा निषेध करतो आणि लोकशाही माध्यमातून बहुमताने निवडून आलेली महानगरपालिका पुन्हा तेथे प्रस्तावित करावी अशी महाराष्ट्राची विधान परिषद मागणी करीत आहे. असा आमचा आग्रह आहे.लोकशाहीमध्ये असे आमचे आग्रहपूर्वक निवेदन आहे". अशा या अधिक दोन ओळी त्यामध्ये ॲड कराव्यात अशी माझी मागणी आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आणि श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावाला पाठिबा देण्यासाठी मी उभा आहे. अतिशय वेदना देणारी ही गोष्ट आहे. "ज्याचे जळते त्याला कळते." आमची सध्या अशीच अवस्था आहे की, "शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड." ते तेथे जिवानिशी जात आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे खरेच त्यांचे कौतुक करावयाला पाहिजे. एक विषय घेऊन 50 वर्षे ही माणसे लढत आहेत. त्यांची दुसरी पिढी तोच विषय घेऊन उभी आहे. सभापती महोदय, परवा या ठिकाणी हा विषय उपस्थित झाल्यानंतर मी सहज ग्रंथालयात गेलो आणि जुन्या सर्व दिग्गज सदस्यांची भाषणे शोधून ती वाचण्याचा प्रयत्न केला. मला ती सगळी भाषणे एवढया थोडया कालावधीत वाचता आली नाहीत. पण ती भाषणे वाचतांना मला अत्यंत वेदना झाल्या. कारण या प्रश्नाशी शिवसैनिक म्हणून 1969 पासून मी स्वत: निगडीत आहे. 1969 च्या आंदोलनात उतरलेला मी एक कार्यकर्ता आहे. मला आजही आठवते की, श्री. सदानंद ढवन असे आता त्या मैदानाचे नाव आहे. पूर्वी त्याला त्रिकोणी मैदान म्हणत असत. त्या त्रिकोणी मैदानामध्ये सन्माननीय शिवसेना प्रमुखांची सभा झाली आणि त्या सभेनंतर ताबडतोब आंदोलन सुरु झाले. 69 हुतात्म्यांचा उल्लेख माननीय सरपोतदारदादांनी केला. तो प्रश्न जीवंत ठेवण्याचे काम शिवसेनेने केलेले आहे हे विसरु नका. त्या प्रश्नाचे क्रेडीट घेण्यापेक्षा राजकारणाच्यापलिकडे जाऊन आपण हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा. एक म्हण अशी आहे की, "राधा घुसळी डेरा रीता." राधा घुसळते आहे पण डेरा रीता आहे. आम्ही या ठिकाणी वारंवार शब्द, भावना, राग, संताप प्रगट करीत आहोत. बेळगावमध्ये उतरल्यानंतर बोर्डसुध्दा मराठीतून लावलेला दिसत नाही. मैलाचे जे दगड लावलेले असता ते सुध्दा मराठीतून लावलेले दिसत नाहीत. तेथे मराठी माणसाचे कसे खच्चीकरण करता येईल हे सुरुवातीपासून पहिले गेले आहे. सभापती महोदय, मला आज एका प्रसंगाची आठवण होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना त्यासंबंधीची माहिती असेल. संयुक्त महाराष्ट्र समितीचे श्री. राजाभाऊ माने निवडणुकीसाठी उभे होते. त्यांच्या विरोधात त्याठिकाणी 300 उमेदवार उभे करण्यात आले होते. त्यातील काही उमेदवार असे होते की, ते कधी गचकतील याचा भरोसा नव्हता. याचे कारण काय ? तर ही निवडणूक पुढे जावी. अशाही अवस्थेमध्ये श्री. राजाभाऊ माने त्याही वेळी निवडून आले. आज या ठिकाणी श्री. गुरुनाथ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

कुलकर्णींनी यांनी सहज उल्लेख केला पण आपले म्हणणे बरोबर आहे. सात सदस्यांवरुन आपण तीन सदस्यांवर आलो आहोत. मराठी माणसाचे ठरवून खच्चीकरण चालू आहे. मराठी माणसांच्या बदल्या तेथून बाहेर केल्या जातात. दुकानावरसुध्दा मराठी पाटी लावू दिली जात नाही. आणि आता तर त्या ठिकाणी पोलिसी अत्याचार प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. श्री जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी उल्लेख केला. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी हात जोडून विनंती आहे. या ठिकाणी केवळ निषेध करुन थांबू नये. तेथे पोलीस अत्याचार चालू आहेत. कलम 307 खाली गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. म्हणजे पुन्हा हा प्रश्न घेऊन कोणी उभे राहू नये. हिंमत दाखवायची नाही, ताकद दाखवाची नाही. प्रश्न मांडायचा नाही. महात्मा गांधींचे नाव घेऊन आपण सांगता. Truth is God असे महात्मा गांधी म्हणत असत. सत्य हा इश्वर आहे. It does not matter whether I live or die. लोक माझ्या सोबत आहेत किंवा नाहीत याची परवा मी करीत नाही. जे सत्याचे वचन आपण नेहमी सांगत असता. तेथील सरकार असत्य वागत आहे. निदान या प्रश्नावर तरी त्याला कसे ठेचायचे हा विचार आपण केला पाहिजे. सभापती महोदय, मला आणखी फक्त दोन मिनिटे वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो. 1956 मध्ये या राज्याची पुर्नरचना झाली. तुम्ही म्हणाल तुमचा त्यावेळी जन्म सुध्दा झाला नसेल. म्हणून मी जाणीवपूर्वक सांगत आहे. फक्त दोन-चार मुद्दे मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. 1956 मध्ये या राज्याची पुर्नरचना झाली. तेव्हाच मुंबई राज्यातील काही गोष्टी म्हैसूर राज्यात गेल्या. तेव्हा कै. वल्लभभाईपंतांनी सांगितले की, आपण झोनल काऊन्सिल करणार आहोत त्यावेळी आपण पाहू. पुन्हा झोनल काऊन्सिलमध्ये गडबड झाली आणि म्हैसूर पुन्हा दुस-या झोनमध्ये गेले. तेथे घोंगडे भिजत पडले. मग 1960 चे आंदोलन झाले. 1962 ला आंदोलन झाले. 1962 ला पुन्हा लढाई झाली. 1965 ला लढाई झाली. 1965 ला पुन्हा सप्टेंबरमध्ये लढाई झाली. या मधल्या काळात सातत्याने ए.आय.सी.सी.च्या जेवढया बैठका झाल्या त्या बैठकांमध्ये ठरविण्यात आले.

यानंतर श्री. खर्चे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. अरविंद सावंत .....) पुढे सुरु.

सन 1970 मध्ये मेमोरंडम तयार झाला, सन 1972 मध्ये आक्रमण झाले. अशा प्रकारे ज्या ज्या वेळी देशावर आक्रमण झाले, देशाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला त्या त्या वेळी सीमा भागातील मराठी बांधवांनी हे आंदोलन थांबविले आहे, कारण शेवटी देशावर संकट आले त्यापुढे हा प्रश्न महत्वाचा नाही म्हणून हे आंदोलन थांबविले गेले. जवाहरलाल नेहरु गेल्यानंतर हा प्रश्न भिजत पडला होता, पुन्हा सन 1969 मध्ये हाच सीमा प्रश्न पुन्हा उचलला गेला. नंतर शास्त्रीजी, इंदिरा गांधी व निजलिंगप्पा हे सगळे नेते एकत्र बसून देखील हा प्रश्न अजून भिजतच पडलेला आहे. 27 जुलै, 1962 मध्ये पुन्हा देशावर संकट आले म्हणून हे आंदोलन थांबविण्यात आले. त्यानंतर सन 1966 मध्ये ऐआयसीसीची बैठक मुंबईमध्ये झाली. त्या बैठकीत इंदिरा गांधींनी या प्रश्नावर तोडगा काढण्याबाबत सांगितले परंतु महाराष्ट्राबद्दल सहानुभूती असल्याचे चित्र दिसल्याबरोबर कर्नाटकचे आंदोलन सुरु झाले आणि त्यावेळपासून अद्यापही हा प्रश्न सुटलेला नाही. त्यानंतर कोर्टात गेलो तरी देखील हा प्रश्न सुटला नाही. आज आपण हा संवेदनाजनक प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे, लोकशाही मुल्यांवर आपला विश्वास आहे, त्या मुल्यांवर विश्वास ठेवूनच आता सोनियाजींना, अटलबिहारींना, राष्ट्रपतींना भेटून तोडगा का काढत नाही ? आज त्या भागातील मराठी माणूस कुठल्या परिस्थितीत जगत आहे ही व्यथा त्यांच्यासमोर का मांडत नाही ? आज तेथील मोहन पाटील यांची आठवण प्रकर्षाने येते. त्यांची आई जिल्हापरिषदेची अध्यक्ष होती. त्या मोहन पाटीलची गोळया घालून हत्या करण्यात आली, त्यांची आई म्हणते की, मी माझा मुलगा सीमा प्रश्नासाठी दिला. इतका हा विषय गंभीर आहे म्हणून यावर बोलावे तितके थोडेच आहे. म्हणून आमची विनंती आहे की, या प्रश्नाच्या बाबतीत तेथील जनतेचे सार्वमत घ्या, आज आपण 7 वरुन 3 वर आलो आहोत आणि अशा प्रकारे जाणीवपूर्वक विभाजन करुन मराठी माणसाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न होत आहे, मराठी माणसाला बाजूला काढले जात आहे. महाजन समितीने तर अत्यंत भयानक असा अन्याय केलेला आहे. या ठिकाणी डांगचा उल्लेख करण्यात आला परंतु मी त्यासंदर्भात असे सांगू इच्छितो की, स्व. वसंतराव नाईक यांनी आपल्या भाषणात त्यासंबंधी उल्लेख केला होता. आम्ही त्यांना डांग दिला तसेच उमरगांव या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या निवडणूका होत्या.

काही सन्माननीय सदस्य : असे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : मी आपल्याला यासंदर्भातील लेखी पुरावे सुध्दा देऊ शकतो.

सभापती : सन्माननीय सदस्यांना माझी सूचना आहे की, जर आपल्या वाक्यात संदिग्धता असेल अथवा शंका असेल तर ते वाक्य रेकॉर्डवर राहू नये हेच योग्य आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, त्याला माझा आक्षेप नाही परंतु मी एवढयासाठीच सांगतो की, स्व. वसंतराव नाईक यांनी त्याबद्दलची भूमिका घेतली होती आणि सांगितले होते की, महाराष्ट्र हे लोक भावनांचा आदर करणारे राज्य आहे व त्याप्रमाणे आपण डांग आणि उमरगांव हे प्रदेश दिले परंतु अशाच प्रकारे लोक भावनेचा आदर या बेळगांव, कारवार, निपाणीच्या बाबतीत का दाखविला जात नाही, हा खरा प्रश्न आहे. हा ठराव चांगला आहे व मी त्याला मनापासून पाठिंबाही देतो पण हा प्रश्न निव्वळ महानगरपालिके पुरताच मर्यादित ठेवून चालणार नाही हेही मी या निमित्ताने सुचवित आहे. बेळगांवचा महापौर श्री. मोरे, एक दलित तरुण मुंबईला आल्यानंतर पत्रकार परिषदेसमोर ढसाढसा रडला, हे आजही आठवते. त्यांना महापौराच्या खुर्चीवर पुन्हा सन्मानाने बसविले पाहिजे. अशा प्रकारचे प्रयत्न माननीय मुख्यमंत्र्यांनी करावेत अशी माझी विनंती आहे, तसेच ती महानगरपालिका पुन्हा प्रस्थापित कशी करता येईल, याचाही विचार करावा, अशीही या निमित्ताने माझी विनंती आहे. त्या भागातील मराठी जनता, महापौर पुन्हा ताठ मानेने कसे उभा राहतील यासाठी प्रयत्न करावेत, आम्ही सर्व आपल्याला साथ देऊ अशी खात्री देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो महत्वाचा ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. सर्वप्रथम महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी या विषयावर आपली जी ठाम भूमिका मांडलेली आहे व बेळगावच्या सर्व मराठी बांधवाचा प्रश्न ते तडीस लावणार आहेत, त्यामुळे त्यांचेही मनापासून अभिनंदन करते. देशाला काळिमा फासणारी घटना मध्यंतरीच्या काळात घडून गेलेली आहे. बेळगावच्या महापौरांना केवळ काळे फासले असे नसून आपण सर्वांनी ही बातमी टी.व्ही. वर बघितलेली आहे. एका महापौराला काळे फासणे वेगळे परंतु बेळगावच्या महापौरांचे कपडे काढून त्यांच्या तोंडाला काळे फासण्यात आले. तसेच काळे फासले जात असतांना टी.व्ही. न्यूजच्या चॅनलला सुध्दा त्यांनी शूटींग करण्यासाठी बोलावले होते. आम्ही महापौराचे काय करु शकतो हे दाखविण्यासाठीच त्यांनी हे केलेले आहे. टी.व्ही.वर हे दृष्य आम्ही जेव्हा बघितले तेव्हा सर्व मराठी जनतेच्या मनाला फार वाईट वाटले. महापौरांना काळे लावले जात होते तेव्हा ते मीडिया समोर तोंड लपवित होते. अध्यक्ष महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न या ना त्या कारणाने सतत चर्चेत राहिला आहे. हा प्रश्न जगतही नाही आणि मरतही नाही अशा अवस्थेत आजही आहे. सीमाभागातील बांधव आजही मरणयातना भोगत एकाकी पडला असून आपण इकडे मराठी अस्मितेच्या नावाने कोरडे अश्रू ढाळत आहोत. कर्नाटक सरकार महाराष्ट्राच्या उदासिनतेचा फायदा घेऊन सीमाबांधवावंर अमानुष अत्याचार आणि अन्याय करीत आहे. मराठी प्रांतातच आज मराठीची पिछेहाट होत असतांना बेळगावकर मात्र मराठीच्या अस्मितेसाठी संघर्ष करीत आहेत. हा खरे तर इंग्रजीमागे धावत सुटलेल्या महाराष्ट्रासाठी एक धडाच आहे, असे मी मानते. कर्नाटक सरकारने माणुसकीच्या मर्यादा सोडल्या असल्यामुळे आता निर्णायक लढयाची गरज निर्माण झाली आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, मराठी अस्मिता जगविण्यासाठी या ठिकाणचे लोक गेल्या 40-45 वर्षापासून स्वत:वर अत्याचार करुन घेत आहेत. त्यांनी अजूनपर्यंत लोकशाही जिवंत ठेवलेली आहे. परंतु कर्नाटक सरकारने आपल्या मर्यादा सोडून दिलेल्या आहेत. आता महाराष्ट्राने सीमावासीय बांधवाच्या मागे ठामपणे उभे राहण्याची वेळ आलेली आहे. या सभागृहाच्या सर्व सदस्यांनी सीमावासीय बांधवासाठी एकत्र येऊन दिल्लीपर्यंत आवाज उठविला पाहिजे एवढेच या निमित्ताने सांगते आणि माझे दोन शब्द पूर्ण करते. जय हिंद, जय महाराष्ट्र.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदास्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जो महत्वाचा ठराव या ठिकाणी मांडलेला आहे त्याला सहमती दर्शविण्यासाठी मी उभी आहे. बेळगाव,कारवार,निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झ ालाच पाहिजे, असा नारा बेळगाव महापालिकेने देऊन हा भाग महाराष्ट्रात विलीन व्हावा असा ठराव केल्यामुळे कर्नाटक सरकारने बेळगाव महानगर पालिका बरखास्त करण्याचा आदेश दिला. या ठिकाणी बेळगाव महानगरपालिकेच्या महापौरांना कशा प्रकारे काळे फासण्यात आले याबाबत आताच सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. महापौरांना काळे फासल्यामुळे कर्नाटकात आता लोकशाही शिल्लक राहिली आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

कर्नाटकच्या लोकांनी महापौरांना काळे फासलेले नसून लोकशाहीला काळे फासलेले आहे. अखिल भारतीय स्तरावर काम करीत असताना माझा अनेक लोकांशी संपर्क येतो. आज बेळगावमध्ये मराठी बांधवांची गळचेपी होत आहे. तो कर्नाटकच्या टाचेखाली चिरडला जात आहे. रस्ते, पाणी, शाळा याबाबत नेहमी दुय्यम भूमिका घेतली जाते. तेथील मराठी भाषिकांना सहजासहजी नोकरी मिळत नाही. नोकरी मिळाली तर त्याची नियुक्ती दूर अंतरावर केली जाते. जेणे करून मराठी माणसाने राजीनामा देऊन घरी बसावे. अशी सीमा भागातील मराठी बांधवांची दुरावस्था आहे. अशावेळी माननीय मुख्यमंत्री आणि आपण सर्वांनी बेळगाववासियांच्या पाठिमागे खंबीरपणाने उभे राहिले पाहिजे. सन 1966 साली सीमा प्रश्नासाठी महाजन आयोग नेमला होता. त्यावेळी महाजन आयोगाने कर्नाटक राज्याच्या बाजूने निर्णय दिला व तो निर्णय अन्याय करणारा ठरला. सदर प्रश्न सोडविण्यासाठी माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी देखील प्रयत्न केले. त्यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना देखील चर्चेसाठी बोलाविले. परंतु, त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली नाही. त्यांचा नकारात्मक प्रतिसाद होता. आपण सर्वांनी पक्षीय भेद विसरून एक झाले पाहिजे. आपण केंद्र सरकारकडे गेले पाहिजे. राष्ट्रपती, पंतप्रधान यांना भेटले पाहिजे. आपण ठामपणे मागणी केली पाहिजे की, बेळगाव महापालिकेची बरखास्ती ताबडतोब रद्द झाली पाहिजे. पुन्हा महापौरांना त्यांच्या खुर्चीवर बसविले पाहिजे. हा जो वर्षानुवर्षे भिजत पडलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न आहे, तो ताबडतोब सोडवला पाहिजे. माननीय मुख्यमंत्रीजी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. आपण सगळेजण ठामपणाने निर्णय घेऊ या. जे घृणास्पद कृत्य कर्नाटक लोकांनी महापौरांबाबत केले आहे, त्याचा सगळेजण मिळून धिक्कार करू या. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सीमा भागात जन्मलो, मराठीत शिकलो आणि काही भवितव्य नाही म्हणून महाराष्ट्रात आलो. आजही आमचे गाव सीमा भागात आहे. आम्ही सर्व लोक गाव सोडून शहरामध्ये राहत आहोत. काही वर्षाने तेथे काहीच राहणार नाही अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. मी जास्त बोलणार नाही. कारण हा प्रश्न सुटावा अशी आमची इच्छा आहे. या विषयासंबंधीची बरीच टिपणे मी काढली होती. आम्ही लहानपणापासून बॅ.नाथ पै यांची भाषणे ऐकली आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सुटेल हे लोक विसरून गेले होते. परंतु, बेळगाव महापौरांच्याबाबतीत जे घडले त्यामुळे पुन्हा तेथील मराठी बांधवांची आशा पालवली आहे. महाराष्ट्रातील लोकांना राग येईल अशी चूक कर्नाटक राज्याने केली आणि त्यामुळे सीमा प्रश्न सुटेल असे वाटू लागले. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना निषेधाचे पत्र पाठविल्यामुळे मी पहिल्यांदा आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनदंन करतो. त्यावेळी आम्हाला वाटले की, महाराष्ट्रामध्ये बेळगावमधील मराठी बांधवांची बाजू घेणारे कोणी तरी आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापूरे.....

मला सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे अभिनंदन करायचे आहे कारण त्यांनी या प्रश्नावर नेमके बोट ठेवून विचारले की, आज आमची परिस्थिती काय आहे ? हा प्रश्न कोर्टामध्ये सुटतो की केंद्रामध्ये सुटतो की अन्य कोणाकडून सुटतो हे आज आम्हाला सांगता येत नाही. आमची इच्छा आहे की, माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हा प्रश्न येत्या वर्षभरात सुटावा आणि मला महाराष्ट्रीयन म्हणून अभिमान वाटावा अशी परिस्थिती निर्माण व्हावी अशी मी प्रार्थना करतो. याठिकाणी मोठी मंडळी बसलेली आहेत. तुम्ही सगळी मंडळी राजकीय पक्षाचा अभिनिवेष काही विसरलेला नाहीत. आपण आपल्या पक्षाने काय केले हे येथे सांगितले. कोपरखळी मारली, त्यामुळे गोडवा निर्माण झाला, एकी निर्माण झाली की दुरावा वाढला असा प्रश्न मला पडला. जर सीमा प्रश्न सर्वांना आपला प्रश्न वाटत असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी एका ओळीचा ठरावा मांडवा, तो सभागृहाने एकमताने संमत करावा आणि तसा संदेश बाहेर जावा अशी मी सर्वांना विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड व इतर अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, साधर्म्य कसे असते ते पहा. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आज ही चर्चा उपस्थित केली. श्री.शरद पवार यांनी दिनांक 16 मार्च 1980 रोजी हा प्रस्ताव मांडला होता. सन 1980 पासून 2005 पर्यंत हा प्रश्न प्रलंबित आहे. श्री.शरद पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावाला ॲड.दत्ता पाटील यांनी अनुमोदन दिले होते आणि याठिकाणी श्री.जयंत पाटील यांनी अनुमोदन दिलेले आहे. आपण हे साधर्म्य पहावे. श्री.शरद पवार यांचे शिष्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि ॲड.दत्ता पाटील यांच्या तालमीत तयार झालेले श्री.जयंत पाटील यांनी आता हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या सर्वांची मनोमनी एकच इच्छा आहे की, हा प्रश्न लवकर सुटावा. सभापती महोदया, शिवसेना पक्षाने काय केले किंवा बाकीच्या पक्षाने काय केले याची सर्व माहिती सभागृहाला आहे. प्रश्न असा आहे की, बेळगावमध्ये जो प्रकार घडला तो निंद्य आहे. माननीय मुख्यमंत्री हा प्रश्न कोणत्या मार्गाने सोडवितात याकडे आज महाराष्ट्रातील सर्व जनतेचे लक्ष लागलेले आहे. सभापती महोदय, ॲड.दत्ता पाटील त्यावेळी असे म्हणाले होते की,

"Parliament by law-

(a) from a new State by separation of teritorry from any State or by uniting two or more States or parts of States by uniting any teritorry to a part of any State;

(b) increase the area of any State;

(c) diminish the area of any State;"

This law is suggestive of everything.

जर हा प्रश्न सोडवयावयाचा असता तर पार्लमेंटचे तत्कालीन सदस्य हे करु शकले असते. पण ग्यानब्याची मेख कुठे आहे हे आपण सर्वांनी पाहिले पाहिजे. महाराष्ट्रात मराठी माणूस राहतो. पण तो जर एखाद्या बरोबर मराठीत बोलला आणि समोरुन जर कोणी हिंदीमध्ये बोलला तर तो हिंदीमध्ये बोलतो.आपण त्याला मराठी बोलण्याचा आग्रह धरीत नाहीत. इथेच ग्यानबाची मेख आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

आपण येथील बोर्ड मराठी भाषेत असला पाहिजे असे सांगतो पण तो बोर्ड जर कन्नड भाषेमध्ये असेल तर त्यास आपण विरोध करीत नाही. सर्व पक्षीय त्यास विरोध करीत नाहीत. महाराष्ट्रीयन मराठी माणसाला भारतभर जातीयवादी म्हटले जाते आणि त्यानीच हा वाद निर्माण केला आहे. हा लढा 50 वर्षे सुरु आहे. ज्यावेळी ही घटना घडली त्यानंतर आपण जागे झालेलो आहोत का ?

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

नाही. आम्ही हा लढा सदैव चालू ठेवला आहे. त्या त्या काळात ज्या काही अडचणी आल्या त्यावर आपण मात केली आहे आणि आजही तशा अडचणींवर मात करावयाची आहे. या प्रश्नाबाबत शिवसेना पक्षाचे कार्याध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली आम्ही राज्यपाल महोदयांना भेटलो. त्यावेळी आम्हाला वाटले हाते की, कदाचित ते हा प्रश्न सोडवतील, परंतु दुर्दैवाने त्यांच्याकडून याबाबत काहीच घडले नाही. आता महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे आमचे डोळे लागले आहेत, निदान ते तरी आम्हाला घेऊन दिल्लीत जातील आणि हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मदत करतील. मला वाटते सर्वांचे प्रेशर पाहून, निदान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तरी हा प्रश्न निश्चितच सोडवतील. बेळगाव, निपाणी, बिदरसह संपूर्ण महाराष्ट्राची आपण अपेक्षा करुया आणि तात्काळ बेळगावची महानगरपालिका रिस्टोअर करण्यात यावी, एवढेच या निमित्ताने सांगून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्या चर्चेला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

या ठिकाणी अनेक वक्त्यांनी निरनिराळे मुद्दे मांडले. बेळगांव महानगरपालिकेचे महापौर श्री.विजय मोरे आणि उपमहापौर श्री.प्रकाश शिरोळकर यांच्यावर जो हल्ला झाला आणि त्यांच्यावर जी परिस्थिती उद्‌भवली त्याचा निषेध करुन, तो कर्नाटक सरकारला थेट कळविल्याबद्दल मी सर्वप्रथम माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आणि महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करु इच्छितो. बेळगांव महानगरपालिका पुन्हा रिइन्स्टेट करा अशी माझी मागणी आहे. 40 लाख मराठी माणसांच्या भावना लक्षात घेऊन ती महापालिका पुन्हा रिइन्स्टेट होणे गरजेचे आहे. मराठी भाषिकांना योग्य न्याय आणि समानतेची वागणूक त्या ठिकाणी मिळाली पाहिजे. सभापती महोदय, त्या भागातील लोकांना कन्नड भाषेचे कम्पलसरी शिक्षण घ्यावे लागत आहे. याची परिणती अशी आहे की, 45-46 वर्षांपासून हा प्रश्न सुटत नाही. मराठी माणूस सहिष्णू आहे, आपल्याला सहिष्णुता सोडावयाची नाही. ज्याप्रमाणे कन्नड लोकांना महाराष्ट्रात वागविले जाते त्याचप्रमाणे मराठी भाषिकांना सुध्दा इतर राज्यामध्ये वागणूक मिळावयास पाहिजे, ही आपली रास्त भूमिका आहे. मराठी माणसाच्या पाठीमागे महाराष्ट्र राज्य खंबीरपणे उभे आहे हे या प्रकारातून दिसले आहे. याचा जेवढा आनंद आम्हाला झाला आहे, त्यापेक्षा जास्त आनंद ज्यावेळी बेळगावची महापालिका रिइन्स्टेट होईल त्यावेळी होईल. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र सरकारला विनंती करीन की, मराठी माणूस आणि मराठी भाषिक जो महाराष्ट्राबाहेर आहे त्याच्यावर होणारा अन्याय दूर करणे गरजेचे आहे. 78 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा स्वागताध्यक्ष या नात्याने आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, ज्यावेळेला बेळगांव येथे 1946 मध्ये साहित्य संमलेन झाले होते, त्यावेळी कै.वसंतदादा पाटील त्या ठिकाणी उपस्थित होते. त्यांनी सुध्दा असाच ठराव त्या ठिकाणी केला होता. प्रत्येक साहित्य संमेलनामध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रश्न सुटावा असा ठराव होतो. आपले सभागृह सार्वभौम आहे. मराठी माणसाचे प्रतिबिंब अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये पडत असते. त्यादृष्टीने मुख्यमंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालावे. सोलापूर येथील अधिवेशनामध्ये आम्ही याबाबतचा ठराव करणारच आहोत.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ...

मराठी माणसाची अस्मिता आणि माय मराठीवरील प्रेम जास्तीत जास्त वृध्दिंगत करण्यासाठी या विषयामध्ये जास्तीत जास्त लक्ष घालण्यात यावे. सध्या हा विषय सुप्रीम कोर्टात गेलेला आहे असे असले तरी सुध्दा महाराष्ट्र शासनाने याबाबतीत जास्तीत जास्त पाठपुरावा करुन हा प्रश्न सोडविला पाहिजे.गेल्या अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे.हा प्रश्न निश्चितपणे सुटेल परंतु महाराष्ट्राला ही मागणी सोडता येणार नाही.सीमा भागातील मराठी भाषिकांवर अन्याय होत आहे तो दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबध्द आहे. कर्नाटक सरकारने जो निर्णय घेतलेला आहे त्याचा मी निषेध करतो. बेळगाव महानगरपालिका पुन्हा रिइन्स्टेट करावी आणि त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यानी लक्ष घालावे अशी मी त्यांना विनंती करतो तसेच या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे(विधान सभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, या विषयाच्या इतिहासामध्ये मी जाणार नाही परंतु भारतातील कायदा व सुव्यवस्था पाहणारे केन्द्रीय गृह मंत्री हे महाराष्ट्रातील आहेत. तेव्हा माननीय केन्द्रीय गृहमंत्र्यांनी या बाबतीत काय केले आहे हा विषय या सदनाचा जरी नसला तरी मराठी भाषिक महापौराची धिंड काढण्याचा प्रकार कर्नाटक मध्ये घडतो तेव्हा असा गुन्हा करणा-या गुन्हेगारावर काय कारवाई कर्नाटक पोलिसांनी केलेली आहे हे महाराष्ट्राचे सुपुत्र असणा-या केन्द्रीय गृह मंत्र्यांनी विचारणा करावयास पाहिजे होती. त्याबद्दल माहिती मिळणे हा आमचा अधिकार आहे. मराठी भाषिकांवर अन्याय करण्याचा प्रकार सातत्याने सीमा भागात होत आहे तेव्हा सीमा भागातील मराठी भाषिकांना केन्द्रीय गृहमंत्र्यांनी संरक्षण मिळवून दिले पाहिजे.ही आमची भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय केन्द्रीय गृह मंत्र्यांपर्यन्त पोहोचवली पाहिजे. दोघेही जण एकाच जिल्हयातील असल्यामुळे सहजगत्या ते ही भावना त्यांच्याकडे पोहोचू शकतील असे मला वाटते. आपण सर्वजण भूतकाळात रमलो आहोत परंतु भविष्यातील टापांचा आवाज आपण ऐकत नाही असे मला वाटू लागले आहे. माननीय राज्यपालांना आपण अंत:करणपूर्वक स्वीकारलेले आहे. माननीय राज्यपालांकडे शिवसेनेच्या सर्व आमदारांनी अशी मागणी केली होती की, या बाबतीत माननीय राज्यपालांनी आपली भूमिका स्पष्ट करावी.

माझी अशी अपेक्षा आहे की, केन्द्रीय गृहमंत्र्यांकडें आमची भावना पोहोचविण्याची जबाबदारी ज्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांवर आहे. त्याप्रमाणे माननीय राज्यपालांनी सुध्दा या सदनातील आमच्या अपेक्षा आणि आकांक्षा तसेच न्याय्य मागण्या केन्द्र सरकारकडे पोहोचवाव्यात. या संदर्भात ताबडतोबीने करण्यासारख्या काही गोष्टी आहेत. त्याबाबतीत मी येथे उल्लेख करु इच्छिते. सीमा भागातील मराठी भाषिक विद्यार्थी शिकण्यासाठी महाराष्ट्रात येऊ इच्छितात त्यांना मायग्रेशन सर्टिफिकेट ताबडतोब मिळावे यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मायग्रेशन सर्टिफिकेट देण्यासाठी अकरावीसाठी 20 जानेवारी आणि 12 वी साठी 5 जानेवारी अशी मुदत दिलेली असते. परंतु या मुलांना मे महिना अखेर पर्यन्त दाखले मिळत नाही. दाखले उशिरा दिले तर प्रत्येक दिवसासाठी पाच रुपये या प्रमाणे या मुलांना दंड भरावा लागतो. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, मायग्रेशनचे सर्टिफिकेट उशिरा आल्यामुळे त्यांना जो दंड भरावा लागतो तो दंड माफ करण्याची भूमिका राज्य सरकार घेऊ शकते काय ? ही भूमिका सरकारने

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ....

घ्यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय.त्याचबरोबर या भागातील ग्रामपंचायतीच्या बाबतीत मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. बेळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी आम्ही जेव्हा शिवसेनेचा प्रचार करण्यासाठी बेळगाव येथे गेलो होतो तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सूचना केली होती. मराठी भाषिकांनी मराठीतून नावे लिहिलेली आहेत परंतु त्यांना योजना राबवावयाच्या असतील तर त्यांनी कानडीतून अर्ज लिहिल्याशिवाय ते योजना मागू शकत नाही अशी परिस्थिती आहे. सीमा भागातील प्रश्न सुटेल. तो लवकर सुटावा अशी आपली अपेक्षा आहे व त्याकरता आपण अविरत लढत राहू. परंतु त्या गावासाठी योजनांची माहिती देणे तसेच विद्याथ्याना जो दंड भरा वा लागतो तो दंड माफ करुन या विद्यार्थ्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधीच्या बाबतीत जर आपण काही पॅकेज दिले नाही तर महाराष्ट्राची भूमिका ही मावशीची होती. आईची नव्हती, दाईची होती. मावशीसुध्दा मुलांना जगवत असते. परंतु दाईच्या भूमिकेतून जर आपण या तरुण पिढीकडे पाहिले तर आज ना उद्या केव्हा तरी त्यांचे धैर्य खच्ची होईल व ही तरुण पिढी पुढच्या काळात महाराष्ट्राला दूषणे दिल्याशिवाय राहणार नाही.म्हणून आईने प्रेमाने मायेचा हात त्यांच्यावर फिरवावा आणि सीमा भागातील तरुणांसाठी काही विकासाच्या योजनां देण्याच्या बाबतीत जरुर विचार करावा असे मला सांगावयाचे आहे. तसेच बेळगावच्या महापौरांची ज्यांनी अवहेलना केली आहे त्या गुन्हेगारांवर काय कडक कारवाई केली आहे याची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या मार्फत सदनाला मिळाली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करुन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून मी माझे भाषण संपविते.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रात आजवर आपल्या पोटाची वितभर खळगी भरण्यासाठी जे जे लोक यू.पी., बिहार, बंगाल, एम.पी., गुजरात वगैरे राज्यांतून आले त्या सर्वांना आपण सामावून घेतले आहे. सभापती महोदय, ज्यावेळेस संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, लढाई होत होती तेव्हा आम्ही 18-20 वर्षाचे तरूण होतो. ती लढाई आम्ही पाहिली आहे. अशा वेळी तरूणांचे रक्त हे फडफडून उठत असते. त्याप्रमाणे आमचेही रक्त फडफडले होते. मी देखील त्यावेळी लाठ्या खाल्या आहेत. त्यावेळेस मधु दंडवते, कॉ. डांगे, आचार्य अत्रे असे आमचे नेते होते आणि त्यांनी आपल्या मराठा वृत्तपत्रातून हा लढा जोराने लढविला होता. त्या लढ्यामध्ये महार-मांग, चमार पासून ब्राह्मणापर्यंतच नव्हे तर सर्वच जाती धर्माचे लोक सामील झाले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली पण आमच्या मराठी भाषिक बांधवांचे काही विभाग महाराष्ट्रात सामील होण्याचे राहून गेले. सभापती महोदय, स्वराज्य स्थापनेच्या शेवटच्या पर्वामध्ये छत्रपती शिवाजी महाराजे म्हणतात की, रायगडाचे राज्य राजारामाच्या हाती देऊन, कर्नाटकामध्ये शंभूराजांना पाठवू. म्हणजे तेव्हा पासूनचा हा प्रश्न आहे. आता आम्हाला दु:ख याचे होत आहे की, त्या ठिकाणी मराठी मातीतील माणूस असेल, दलित समाजातील माणूस असला तरी त्याच्या तोंडाला काळे फासले जाणार असेल तर ते काळे महाराष्ट्राच्या तोंडाला फासले जात आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे आणि म्हणूनच आमच्या मुख्यमंत्र्यांनी हा प्रकार झाल्याबरोबर त्याचा निषेध करणारे पत्र तेथील मुख्यमंत्र्यांना पाठविले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवादच देतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक सामील झाले होते आणि लढ्यामध्ये 105 हुतात्मे झाले त्याचीच आठवण ठेवून माननीय मुख्यमंत्र्यांनी हे निषेधाचे पत्र पाठविले. आमच्या मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुखांनी आतापर्यंत अनेक प्रश्न सोडविले आहेत आणि हा प्रश्न देखील त्यांच्याच कारकीर्दीमध्ये जरूर सुटला जाईल असा मला विश्वास वाटतो. तेव्हा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जो ठराव आणला आहे त्याला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

****

..... 3वाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख (मुख्य मंत्री) : माननीय सभापती महोदय, या सदनामध्ये एका अतिशय महत्त्वपूर्ण विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडकीने, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी स्वत: सहमत आहे. आजच्या या चर्चेचा विषय तसा मर्यादित आहे. सीमा प्रश्न का सुटला नाही. त्याला इतका विलंब का लागला, त्याला कोण जबाबदार आहे वगैरे तपशिलामध्ये जाण्याची मला इच्छा नाही. कारण आपण सगळ्यांनी त्याबाबत वारंवार चर्चा केली आहे. आपापल्या परीने सगळ्यांनीच यासाठी प्रयत्न केले पण त्या प्रयत्नांना यश आले नाही. तेव्हा एक हायपॉवर कमिटी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आपण नियुक्त केली आणि तयामध्ये विरोधी पक्षनेते सदस्य आहेत. मागील काळामध्ये या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्र्यांना भेटण्याचाही आपण प्रयत्न केला. त्यांनी दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना बोलावून घेऊन यातून काही सन्मान्य तडजोड निघते काय या दृष्टीनेही आपण प्रयत्न केला पण त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या समितीच्या शिफारशी वरूनच सरकारने निर्णय केला की, हा प्रश्न आता सुप्रीम कोर्टाकडे दिला पाहिजे आणि त्याप्रमाणे आपण केले आणि आता सुप्रीम कोर्टामध्ये त्याचा पाठपुरवा करून, लौकरात लौकर त्याच्या तारखा लागाव्यात म्हणून श्री.हरिष साळवे नावाचे जे एक नामवंत वकील आहेत त्यांना आपण महाराष्ट्राची बाजू मांडण्यासाठी नियुक्त केले आहे.

(यानंतर श्री. सरफरे ..... 3झेड 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

आणि या संबंधात सुप्रिम कोर्ट जो निर्णय देईल तो आम्ही मान्य करणार आहोत. दुर्दैवाने बेळगावमध्ये एक घटना घडली, महानगरपालिकेने ठराव पारित केल्यानंतर तेथील महापौरांना अतिशय वाईट पध्दतीने वागणूक दिली, त्यांच्या तोंडाला काळे फासले गेले ही घटना निषेधार्ह आहे. म्हणून मी तातडीने कर्नाटकच्या माननीय मुख्यमंत्र्यांशी स्वत: बोललो व त्यांना सांगितले की, अशा प्रवृत्तीविरुध्द आपण ताबडतोबीने शासन केले पाहिजे, त्यांच्याविरुध्द ताबडतोबीने कारवाई केली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री त्या सीमा भागामध्ये स्वत: गेले व तेथील सीमावासियांबरोबर ते स्वत: बोलले व त्यांना यासंबंधी कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर दुर्दैवाने महानगरपालिका बरखास्त करण्याची घटना घडली. मुंबईला मला भेटण्यासाठी जेव्हा सीमावासियांचे शिष्टमंडळ आले त्यामध्ये महापौर आजी व माजी आमदार, महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य उपस्थित होते. त्यांनी यासंबंधीच्या भावना आपल्यापुढे मांडल्यानंतर माननीय प्रधानमंत्र्यांची भेट घेण्यासाठी तुमच्यासहीत सर्वपक्षीय शिष्टमंडळ घेऊन जाऊ असे मी त्यांना सांगितले. आज फक्त एवढाच प्रश्न आहे की, लोकशाही पध्दतीने निवडून आलेली एखादी संस्था एक ठराव संमत केला या नावाखाली बरखास्त केली जाते हे योग्य नाही. आणि म्हणून लोकांनी निवडून दिलेली ही संस्था पुन्हा पुर्नजीवित झाली पाहिजे हीच आपली सर्वांची भावना आहे. त्यापेक्षा वेगळी भावना असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, शेवटी हा दोन राज्यांचा प्रश्न असल्यामुळे व यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मी माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांना भेटलो आणि त्यांना सांगितले की, आपण यामध्ये हस्तक्षेप केला पाहिजे. याबाबत दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना बोलावून मराठी भाषिकांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही, आपण सीमाभागामध्ये पूर्णपणे सुरक्षित आहोत असे त्यांना वाटले पाहिजे अशाप्रकारची कार्यवाही आपण करावी. व ती कार्यवाही करण्यासाठी कर्नाटक सरकारला भाग पाडावे अशाप्रकारची विनंती मी माननीय केद्रीय गृहमंत्र्यांकडे केली. माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी माझी विनंती मान्य केली. त्यांचेकडून आपल्याला वेळ मिळाल्यानंतर दोन्ही राज्याचे मुख्यमंत्री हे त्यांच्याकडे जातील. आज त्या भागातील लोकांना संरक्षण देण्याची गरज आहे. एखादी घटना घडल्यानंतर त्याची प्रतिक्रिया इतरत्र तात्काळ उमटायला सुरुवात होते व त्यामधून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. आणि म्हणून त्या भागात रहाणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्या राज्याची आहे, ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

जबाबदारी कोणत्याही राज्याला टाळता येणार नाही. त्याकरिता माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी हस्तक्षेप करुन दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन किमान कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही, मराठी भाषिकांवर अन्याय होणार नाही अशाप्रकारचे वातावरण त्या परिसरात निर्माण होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे माननीय प्रधानमंत्र्यांना भेटण्यासाठी सर्व पक्षीय शिष्टमंडळ घेऊन जावयाचे आहे त्यासाठी आपल्याला त्यांचीही वेळ घ्यावी लागेल. या प्रश्नावर आपणा सर्वांच्या एकच भावना असल्यामुळे एकत्रितपणे हा विषय आपल्याला मांडावयाचा आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेष असणार नाही. सीमावासियांसह व तेथील प्रमुख लोकांसह आम्ही आपणास भेटू इच्छितो, आणि आमची भावना आपल्यासमोर मांडू इच्छितो. अशाप्रकारची विनंती माननीय प्रधानमंत्र्यांना मी केली आहे. सुरु असलेले लोकसभेचे अधिवेशन संपल्यानंतर कदाचित त्यांचेकडून आपल्याला वेळ दिली जाईल. त्यावेळी आपण सर्वजण त्यांना भेटण्यासाठी जाऊ. त्यावेळी सीमाभागातील प्रमुख नेत्यांना बरोबर घेऊ. त्यांना संरक्षण मिळण्यासंबंधीच्या प्रश्नासंबंधी आपण चर्चा करु. कारण या प्रश्नामध्ये सध्यातरी आपल्याला काही अपेक्षित नाही. शेवटी हा विषय कोर्टामध्ये गेला आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या मेरिटवर चर्चा करण्याचे कारण नाही. आपल्यासमोर एकच प्रश्न आहे तो म्हणजे लोकशाही पध्दतीने निवडून आलेली संस्था बरखास्त केली आहे हे अयोग्य आहे, ही संस्था पुनर्जीवित केली पाहिजे, ती करावी अशी आपली विनंती राहील, आणि आहे व इतर काही गोष्टी घडल्या आहेत, अनेक ठिकाणी तेथील लोकांवर कलम 307 खाली गुन्हे दाखल करुन त्याठिकाणी दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. त्यामुळे बेळगाव अनेक दिवस बंद राहिला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख . . . .

म्हणून त्या भागातील लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे याच एका मुद्याच्या संदर्भात शासनाच्यावतीने आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु आणि या कामामध्ये आपल्या सर्वांचे आम्हाला सहकार्य मिळेल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. म्हणून याठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला आमचा पाठिंबा आहे आणि सभागृहाने एकमताने हा प्रस्ताव मंजूर करावा अशा प्रकारची मी या सदनाला विनंती करु इच्छितो. तसेच या ठरावावरील चर्चेच्या निमित्ताने हे सर्व सभागृह, सर्वोच्य सभागृह सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठिमागे खंबीरपणे उभे आहे हा विश्वास त्यांच्यापर्यंत पोचविण्याची आवश्यकता आहे आणि तसा तो आपण सर्वांनी पोचवावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

(सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

. . . .4 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 11 मिनिटांनी,गुरुवार, दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही